# वांगे अमर रहे

गंगाधर मुटे

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

प्रकाशन क्रमांक : ११२

**वांगे अमर रहे** । गंगाधर मुटे
**Wange Amar Rahe** by Gangadhar Mute

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© गंगाधर मुटे
आर्वी छोटी - ४४२३०७,
तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
मो. ९७३०५८२००४
Email : gangadharmute@gmail.com

मुद्रक
सुरज सुगन, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
सरदार

अक्षरजुळणी
जनशक्ती वाचक चळवळ

मुद्रितशोधन
विवेक देशमुख, औरंगाबाद.

प्रथमावृत्ती
२२ जुलै २०१२

ISBN -978-81-923259-5-8

**मूल्य १३० रु.**

आदरणीय शरद जोशी यांना

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| एक | शेतकरी पात्रता निकष | ७ |
| दोन | भारतीय सणांचे अनर्थशास्त्र | १० |
| तीन | वांगे अमर रहे! | १५ |
| चार | कुऱ्हाडीचा दांडा | १८ |
| पाच | हत्या करायला शिक | २१ |
| सहा | श्याम्याची बिमारी | २७ |
| सात | गंधवार्ता एका प्रेताची | ३१ |
| आठ | शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर तज्ज्ञांची मुक्ताफळे | ३७ |
| नऊ | भोंडला, हादगा, भुलाबाईची गाणी : महिलांच्या व्यथा | ४१ |
| दहा | भुलाबाईची गाणी : ग्रामीण संस्कृतीचे वास्तवदर्शन | ५० |
| अकरा | गाय, वाघ आणि स्त्री | ५५ |
| बारा | कुलगुरू साहेब आव्हान स्वीकारा! | ६० |
| तेरा | अण्णा सेवाग्रामला या! दारूने आंघोळ करू... | ६५ |
| चौदा | सत्तास्थळ हेच भ्रष्टाचाऱ्यांचे सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र | ६९ |
| पंधरा | आता गरज पाचव्या स्तंभाची | ८० |
| सोळा | शेतीची सबसिडी आणि पगारी अर्थतज्ज्ञ | ८६ |
| सतरा | कृषी विद्यापीठांना अनुदान कशाला हवे? | ९२ |
| अठरा | प्रक्रिया उद्योग आणि शिक्षणपद्धती | ९६ |
| एकोणीस | वर्धापनदिनाच्या निमित्ताने | १०२ |
| वीस | बरं झालं देवबाप्पा... | १०५ |
| एकवीस | कापसाची दशा, दिशा आणि दुर्दशा | १११ |
| बावीस | गरिबी निर्मूलनाची क्षमता केवळ शेती व्यवसायातच | ११९ |
| तेवीस | असा आहे आमचा शेतकरी | १२२ |

# शेतकरी पात्रता निकष

मायबोली या संकेतस्थळावर मला एक प्रश्न विचारण्यात आला की ''एखाद्या माणसानं कधीच शेती केली नसेल आणि त्याला शेती करायची असेल तर कुठले मुद्दे विचारात घ्यावेत? म्हणजे आर्थिक, मानसिक, शारीरिक आणि कायदेशीर सर्व बाबींबद्दल तुमचा अनुभव/मते सांगा प्लीज!'' अशा तऱ्हेच्या प्रश्नाला उत्तर तरी काय द्यावे?

कारण या प्रश्नाचे उत्तर माझ्यासाठी फारच अवघड आहे. असा प्रश्न मला आजवर कोणी विचारलाच नव्हता. ईधर से बाहर निकलना है तो रास्ता आसान है, अंदर आने के लिए रास्ता तो है ही नहीं !

शेती सोडून जे अन्यत्र गेले त्यांच्या आयुष्याचे सोने झाले. याउलट जे बाहेरून शेतीत आले ते गेले, कामातूनच गेले, मातीमोल झाले. हे जर मला माहीत असेल तर मी काय माहिती द्यावी? आम्ही कवी माणसं. कविता करताना पतंगाला सहज अग्निज्योतीवर उड्डाण करायला सांगतो आणि प्रेमाच्या आहुतीची महती गात गात कविता पूर्ण करतो; पण जित्याजागत्या जीवाला शेती करायला लावणे म्हणजे खोल डोहात बुडण्यासाठी आमंत्रित करण्यासारखे आहे, हे मला पक्के ठाऊक आहे, तरीपण उत्तर द्यायचा मी माझ्यापरी प्रयत्न करणार आहे.

या प्रश्नाचे दोन विभाग पडतात.

**शेती कशासाठी करायची?**

अ) हौसेखातर शेती- (उपजीविकेसाठी अन्य सोर्स आहेत अशांसाठी)

हौसेखातर शेती करायची असेल तर कशाचीच अडचण नाही. घरात दोन पिढ्या जगतील एवढी संपत्ती असेल, पुढारीगिरी करून माया जमविता येत असेल किंवा घरातले कोणी सरकारी नोकरीत असून पगाराव्यतिरिक्त माया जमविण्याचा अंगी कौशल्यगुण असेल तर त्यांच्यासाठी काळ्या पैशाला पांढऱ्यात रूपांतरित करण्यासाठी शेती एक वरदानच ठरत आली आहे.

**ब) उपजीविकेसाठी शेती-** उदरभरणासाठी शेती ( उदरभरण हाच शब्द योग्य. लाईफ बनविणे, करिअर करणे, जॉब करणे यांसारखे शब्दसुद्धा येथे फालतू आहेत.) करायची असेल तर मग गंभीरपणे विचार करावा लागेल. त्यासाठी काय काय हवे आणि काय काय नको अशा दोन याद्या कराव्या लागतील.

**प्रथम आर्थिक खर्चाची यादी करू.**

**अंदाजे किंमतीसह :**

| | | |
|---|---|---|
| १) १० एकर शेतजमीन | = | २०,००,००० |
| २) बांधबंदिस्ती | = | २०,००० |
| ३) विहीर पंप | = | १,५०,००० |
| ४) शेती औजारे | = | ३०,००० |
| ५) बैलजोडी | = | ६०,००० |
| ६) बैलांचा गोठा | = | १,००,००० |
| ७) साठवणूक शेड | = | १,००,००० |

-----------------------------------------

एकूण अंदाजे भांडवली खर्च = रुपये २४,६०,०००

सर्वसाधारणपणे अंदाजे रुपये २५,००,००० एवढी भांडवली गुंतवणूक करावी लागेल.

**शारीरिक गरजा**

१) त्वचा जाडीभरडी असावी. सहजासहजी काटा रुतायला नको.

२) रंग घट्ट असावा. शक्यतो डार्क ब्लॅक.

३) गोरा, निमगोरा, गव्हाळी वगैरे रंग इकडे घेऊन येऊ नये. चार-सहा महिन्यांतच रंग बदलण्याची हमखास शक्यता. त्यासाठी एक उन्हाळा पुरेसा आहे.

४) पायांना चपलेची सवय नसावी. चिखलात चप्पल चालत नाही.

५) शरीरात रक्त जास्त नको. जेमतेम असावे, कारण काटा रुतला तर भळभळा वाहायला नको.

६) हाडे कणखर आणि दणकट असावीत.

७) शरीरात चपळता असावी. बैल पळाल्यास बैलाच्या पळण्याच्या वेगाने धावून पकडता येणे शक्य व्हावे.

८) ५०-६० किलो वजन २-४ किलोमीटर वाहून नेण्याची क्षमता असावी.

**मानसिक गरजा**

१) बीपीचा आजार नकोच. नाहीतर शेतीत पहिल्याच वर्षी जर घाटा-तोटा आला तर लगेच 'रघुपती राघव राजाराम' हे गीत घरासमोर वाजंत्रीसह वाजण्याची शक्यता.

'राम नाम सत्य है!'

२) हांजीहांजी करण्याची सवय हवी. कारण इथे पुढाऱ्यावाचून बरीच कामे अडतात. आर्थिक पाठबळ नसल्याने जागोजागी हांजीहांजी केल्यावाचून गत्यंतर नसते.

३) मिनतवारी करणे हा अंगभूत गुण असावा, कारण प्रत्येक ठिकाणी उधारीपाधारीशिवाय इलाज नसतो.

४) आत्मसन्मान वगैरे वगैरे अजिबात नको. कुणीही अरे-कारे, अबे-काबे म्हणून दोन शिवा हासडल्या तर वैषम्य वाटायला नको. शेतकऱ्यांसोबतची सर्वांची बोलीशैली ठरलेली आहे. ७० वर्षांच्या शेतकऱ्याला १२ वर्षांचा व्यापारी पोरगासुद्धा याच भाषेत बोलत असतो.

५) मुलाबाळांना उच्चशिक्षण द्यायच्या महत्त्वाकांक्षा नकोत. नाहीतर अपेक्षाभंग व्हायचा.

६) चांगले जीवनमान जगण्याची हौस नसावी. अनेक पिढ्या उलटूनही तसे शक्य होत नाही.

७) थोडाफार मुजोरपणा हवा. सावकार, बँका कर्जवसुली करण्यास आल्या तर- 'पुढच्या वर्षी देतो, होय देतो ना, पळून गेलो काय, होईन तवा देईन, नाही देत जा होईन ते करून घे' अशी किंवा तत्सम उत्तरे देता आली पाहिजेत. तरच चार वर्षे पुढे जगता येईल.

८) मनाचा हळवेपणा अजिबात नको. जर का तुम्ही संवेदनाक्षम-हळव्या मनाचे असलात तर चार लोकांत झालेली फटफजिती सहन न झाल्याने गळफास लावून घ्यायचे. म्हणून मुजोरपणा हवा हळवेपणा अजिबातच नको.

९) पंखा, कुलर, फ्रीज, टीव्ही वगैरेंची आवड नको. दिवसभर शेतात काम झाले की आलेला शीण-थकवा एवढा भारी की खाटेवर पडल्याबरोबर ढाराढूर झोप लागत असते.

१०) विचार करण्याची प्रवृत्ती नको, नाही तर चिंतारोग व्हायची भीती.

**कायदेशीर गरजा :**

कायदेशीर ज्ञान नसले तरी चालते. खिशात पैसे असल्यास हवा तेवढा सल्ला वकील मंडळींकडून घेता येतो.

माझ्या मते जर कोणाला नव्याने शेती करायची (गावरान भाषेत 'जिरवून घ्यायची') हौस असेल तर त्यांनी एवढा विचार नक्कीच करायला हवा.

देशाच्या पोशिंद्याची ही चार प्रश्नांची कहाणी अठरा उत्तरी सुफळ संपूर्णम्..!

पोशिंद्याचा विजय असो.!!

■■

# भारतीय सणांचे अनर्थशास्त्र

त्या दिवशी भल्या पहाटेच चक्रधर माझ्याकडे आला होता. त्याला माझ्याकडून प्रवासी बॅग हवी होती पंढरपूरला जायला. असा अचानक चक्रधर पंढरपूरला जायची तयारी करतोय हे ऐकून मी उडालोच. आदल्या दिवशीच माझे त्याच्याशी बोलणे झाले होते. एका खासगी कीटकनाशक कंपनीच्या कार्यक्रमाला चलतोस का म्हणून विचारले तर म्हणत होता की त्याला निदान एक पंधरवडा तरी अजिबात फुरसत नाहीच. शेतीची आंतरमशागत करायचीय, फवारणी करायचीय, निंदण-खुरपण करायचेय. अर्थात तो खोटे बोलत नव्हता. त्याचे शेत माझ्या शेतापासून थोड्याच अंतरावर असल्याने मला त्याच्या शेतीची आणि शेतीतील पिकांची इत्थंभूत माहिती होती.

चक्रधर शेती करायला लागल्यापासून पहिल्यांदाच त्याच्या शेतीत इतकी चांगली पीक परिस्थिती होती. यंदा त्याने छातीला माती लावून साऱ्या गावाच्या आधीच कपाशीची धूळपेरणी उरकून टाकली होती. पावसानेही आपला नेहमीचा बेभरवशाचा खाक्या सोडून चक्रधरला साथ दिली आणि त्याची कपाशीची लागवड एकदम जमून गेली. नशीब नेहमी धाडसी लोकांनाच साथ देत असते याची प्रचिती यावी असाच हा प्रसंग होता. त्यामुळे हुरूप आलेला चक्रधर दमछाक होईपर्यंत शेतीत राबायला लागला होता. त्याला विश्वास होता की यंदा आपली इडापिडा टळणार आणि सावकाराच्या पाशातून मुक्ती मिळणार. भरघोस उत्पन्न आले आणि कर्मधर्म संयोगाने जर भावही चांगले मिळाले तर ते अशक्यही नव्हते. त्यामुळे कीटकनाशक कंपनीच्या कार्यक्रमाला येत नाही म्हटल्यावर मलाही फारसे नवल वाटले नाही.

पण आता चक्रधर असा अचानक पंढरपूरला जायची तयारी करतोय हे मला अनपेक्षित होते. नेमके काय गौडबंगाल आहे हे जाणून घ्यायची माझ्या मनात उत्सुकता निर्माण झाली. मी प्रथम त्याच्या हातात प्रवासी बॅग दिली, प्रवासाला शुभेच्छा दिल्या. येताना माझ्यासाठी पांडुरंगाचा प्रसाद घेऊन ये, अशी विनंती केली आणि मग हळूच विचारले,

''चक्रधर, असा अचानक कसा काय बेत आखला बुवा पंढरपूरचा?''

''आरं, मी कसला काय बेत आखतो पंढरीचा? तो पांडुरंगच मला बोलवायला आलाय ना स्वत:हून'' चक्रधर.

''स्वत:हून थेट पांडुरंगच आला तुला निमंत्रण द्यायला?'' आश्चर्याने डोळे विस्फारून मी विचारले.

''हं मग? इच्छा त्या पांडुरंगाची. दुसरं काय?'' चक्रधर निर्विकारपणे सांगत होता.

''अरे, पण मी तर ऐकलंय की पांडुरंग निर्गुण-निराकार आहे. शिवाय तो बोलत पण नसतो.'' या विषयातील आपले तुटपुंजे ज्ञान उगाळत मी बोललो.

''तसं नाही रे, पंढरीचा विठोबा स्वप्नात आलाय तो त्या रावसाहेबांच्या!'' माझ्या प्रश्नाचा उबग आल्यागत चक्रधर बोलत होता; पण आता मला संवाद थांबवणे शक्य नव्हते. माझी उत्कंठा शिगेला पोचली होती.

''रावसाहेबांच्या स्वप्नात? रावसाहेब आणि तुला, दोघांनाही बोलावलं होय?'' मी प्रश्न फेकलाच.

''आरं बाबा, तसं नाही रे. आत्ता पहाटेपहाटे विठोबा-रुक्मिणी दोघंबी रावसाहेबांच्या स्वप्नात आलेत आणि रावसाहेबांना आदेशच दिला की चक्रधरला तातडीने पंढरीला पाठवून दे. बिचारे रावसाहेब धावतपळत माझ्याकडे आलेत आणि म्हणालेत की तू आत्ताच्या आत्ता सकाळच्या गाडीने तातडीने पंढरपूरसाठी निघ. मी पैशांची अडचण सांगायच्या आधीच रावसाहेबांनी माझ्या हातावर जाण्यायेण्याला पुरून उरतील एवढे पैसे पण ठेवलेत. लई मायाळू माणूस आहे बघा आपले रावसाहेब.'' माझ्या प्रश्नाच्या सरबत्तीला वैतागलेल्या चक्रधरने एका दमात सगळे सांगून टाकले आणि झपाझप पावले टाकत निघून गेला.

पंढरीची वारी करून चक्रधर जेव्हा परतला तेव्हा सारे काही बदललेले होते. फवारणीअभावी कपाशीची वाढ खुंटून झाडं खुरटले होते. मशागत व खुरपणीअभावी तणांची बेसुमार वाढ झाली होती. आल्याआल्या मशागत सुरू करावी तर पाऊस सुरू झाला होता. पाऊस नुसताच सुरू झाला नव्हता तर ठाण मांडून बसला होता. आकाशातील ढग पांगायचे नावच घेईनात. म्हणजे झाले असे की जेव्हा उघाड होती आणि मशागत करण्यायोग्य स्थिती होती तेव्हा चक्रधर पंढरपुरात होता आणि आता चक्रधर शेतात होता तर पावसामुळे मशागतीचे काम करणे अशक्य झाले होते. शेवटी तणाची वाढ एवढी झाली की शेतात जिकडेतिकडे गवतच गवत दिसत होते. कपाशी गवताखाली पूर्णपणे दबून गेली होती. त्यामुळे जे व्हायचे तेच झाले. एका वर्षात सावकाराच्या म्हणजे रावसाहेबाच्या कर्जाच्या पाशातून मुक्त व्हायची गोष्ट

दूरच, उलट कर्जबाजारीपणाचा डोंगरच वाढत जाणार होता.

रावसाहेब सावकार मात्र आनंदी होते. स्वप्न पडल्याची मारलेली थाप त्यांना मस्तपैकी कामी आली होती. ऋणको जर स्वयंपूर्ण झाला तर धनकोची दुकानदारी कशी चालेल? त्यासाठी ऋणको नेहमी कर्जात बुडूनच राहावा, हीच धनकोची इच्छा असते. त्यासाठीच नाना तऱ्हेच्या क्लृप्त्या लढविण्याचे कार्य धनकोद्वारा अव्याहतपणे चाललेले असते.

मी जेव्हा ही गोष्ट अनेकांना सांगतो तेव्हा त्यांना सावकाराचाच राग येतो. कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याचीही भाषा केली जाते, मात्र शेतीच्या ऐनहंगामातच पंढरपूरची यात्रा का भरते, याचे उत्तर कोणीच देत नाही. पंढरीच्या पांडुरंगाच्या भक्तवर्गामध्ये शेतकरी समाजच जास्त आहे. ज्या वेळी शेतकऱ्यांनी आपल्या शेतीतच पूर्ण वेळ लक्ष द्यायची गरज असते नेमकी तेव्हाच आषाढी किंवा कार्तिकीचा महिमा का सुरू होतो? याचा धार्मिक किंवा पुराणशास्त्रीय विचार करण्यापेक्षा तार्किक पातळीवर विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

संपूर्ण भारतवर्षात शेतीचा हंगाम सर्वसाधारणपणे जून महिन्यामध्ये सुरू होतो आणि डिसेंबरमध्ये मुख्य हंगाम म्हणजे खरीप हंगाम संपतो. विचित्र गोष्ट अशी की, भारतातील सर्व मुख्य सण याच काळात येतात. जूनमध्ये हंगाम सुरू झाला की शेतीच्या मुख्य खर्चाला सुरुवात होते. आधीच कर्ज काढून शेती करणाऱ्याला हे सण आणखीच कर्जात ढकलायला लागतात. या सणांच्या खर्चातून शेतकऱ्याला बाहेर पडताच येणार नाही, अशी पुरेपूर व्यवस्था झालेली आहे, हेही ठळकपणे जाणवते. या काळात येणाऱ्यात सर्व सणांचे त्या-त्या सणानुरूप करावयाच्या पक्वान्नाचे मेनू ठरलेले आहेत. नागपंचमीला करंजी, लाडू, चकल्या कराव्या लागतात. रक्षाबंधनाला राखी बांधायला भावाने बहिणीकडे किंवा बहिणीने भावाकडे जायचेच असते. मग एकाचा खर्च प्रवासात होतो तर दुसऱ्यांचा पाहुणचार करण्यात. पोळा आला की बैलाला सजवावेच लागते. घरात गोडधोड रांधावेच लागते. त्यातही एखाद्या चाणाक्ष काटकसरी शेतकऱ्याने पोळ्यानिमित्त घरात पंचपक्वान्न करून खाण्यापेक्षा तेवढ्याच पैशात शेतामध्ये दोन रासायनिक खताची पोती घालायचे ठरवले तरी ते शक्य होत नाही. कारण या दिवशी शेतकऱ्याने आपल्या घरी गडीमाणूस जेवायला सांगणे, हा रितीरिवाज लावून दिला गेला आहे. परका माणूस घरात जेवायला येणार असल्याने पंचपक्वान्न करणे टाळताच येत नाही. अशा तऱ्हेने शेतकऱ्याला खर्चापासून परावृत्त होण्याचा मार्गच बंद करून टाकला गेला आहे. शिवाय पोळा हा तीन दिवसांचा असतो. वाढबैल, बैल आणि नंदीपोळा. हे तीन दिवस बैलांच्या खांद्यावर जू देता येत नाही. जेव्हा उघाड असते आणि शेतात औतकाम करणे शक्य असते, त्यावेळेस

पोळा असल्यामुळे काम करता येत नाही. पोळा संपला आणि जर लगेच पाऊस सुरू झाला तर मग पावसामुळे काम करता येत नाही. कधी कधी या तऱ्हेने आठवडा किंवा चक्क पंधरवडा वाया जातो. मग त्याचे गंभीर परिणाम पिकांना भोगावे लागतात.

हरितालिका, ऋषिपंचमी, मंगळागौर, कान्होबा, महालक्ष्मी-गौरीपूजन, श्रावणमास याच काळात येतात. आखाडी व अखरपख (सर्वपितृदर्श अमावास्या) या सणांचा मारही खरीप हंगामालाच सोसावा लागतो. गणपती बाप्पा आले की ठाण मांडून बसतात. शारदादेवी, दुर्गादेवी यांचे नवरात्र करायचे नाही म्हटले तर त्यांचा प्रकोप होण्याची भीती मनात घर करून बसली असते. शिवाय यांना यायला आणि जायला गाजावाजा व मिरवणूक लागते. बाप्पांना दहा-पंधरा दिवस मोदक पुरवावेच लागतात. बदाम, नारळ, खारका द्याव्याच लागतात. दुर्गादेवीची ओटी भरावीच लागते. ते संपत नाही तोच दसरा येतो, दसऱ्याची नवलाई संपायच्या आधीच भुलोजी राणाच्या आठवणीने व्याकुळ झालेल्या भुलाबाई येतात. भोंडला, हादग्याला जुळूनच कोजागरी येते.

शेतीचा हंगाम अगदी भरात असतो. ज्वारी हुरड्यावर, कपाशी बोंडावर आणि तुरी फुलोऱ्यावर येण्याला सुरुवात झालेली असते. पीक पक्व व्हायला, बाजारात जायला आणि शेतकऱ्याच्या घरात पैसा यायला अजून बराच अवकाश असतो आणि तरीही आतापर्यंत डबघाईस आलेल्या शेतकऱ्याचे कंबरडे मोडण्यासाठी मग आगमन होते एका नव्या प्रकाशपर्वाचे. दिव्यांची आरास आणि फटाक्याच्या आतषबाजीचे. एकीकडे कर्ज काढून सण साजरे करू नये म्हणून शेतकऱ्याला वारंवार आवाहन करणाऱ्या शहाण्यांचे पीक येते मात्र दुसरीकडे हे सर्व सण शेतकऱ्यांच्या दारासमोर दत्त म्हणून उभे ठाकत असतात. दिवाळी जसा प्रकाश आणि आतषबाजीचा सण आहे तसाच पंचपक्वान्न व वेगवेगळे चवदार पदार्थ करून खाण्याचा सण आहे. शेतकऱ्याने जरी सण साजरा करायचे नाही असे ठरवले तर शेजाऱ्याच्या घरातून खमंग वास  येत असताना शेतकऱ्याच्या मुलांनी काय जिभल्या चाटत बसायचे? दिवाळीला नवे कापड परिधान करायचे असते. नवीन कापड खरेदीसाठी पुन्हा कर्ज काढायचे किंवा कापड दुकानातून उधारीवर खरेदी करायची. लक्ष्मीपूजनासाठी स्पेशल दिवस नेमला गेला आहे. शेतीत पिकविलेला कोणताच शेतमाल जर विक्रीस गेला नसेल तर शेतकऱ्यांच्या घरात लक्ष्मी तरी कुठून येणार? मग लक्ष्मीपूजन तरी कोणत्या लक्ष्मीचे करायचे? शेतकरी ज्या लक्ष्मीचे पूजन करतो, ती लक्ष्मी उसनवारीची असून तिचे मालकी हक्क सावकार किंवा बँकेकडे असतात. त्याच्या घरावर झगमगणाऱ्या आकाशदिव्यांचे कॉपीराईट्स जनरल स्टोअरवाल्याच्या स्वाधीन आणि घरात तेवणाऱ्या दिवावातीतील तेलाचे सर्वाधिकार किराणा दुकानदाराकडे असतात. शेतीचे आणि या सर्व सणांचे खर्च भागवण्यासाठी शेतातील उभे पीक

शेतकऱ्याच्या घरात पोहोचायच्या आधीच गहाण झालेले असते. या सर्व सणांनी शेतकऱ्याला पुरेपूर कर्जबाजारी करून त्याच्या कमरेला धडुतंही शिल्लक ठेवायचे नाही, असा निर्धारच केलेला असतो.

आणि सर्वांत महत्त्वाची आणि उफराटी बाब अशी की डिसेंबरमध्ये माल बाजारात जायला लागला आणि शेतकऱ्याच्या घरात पैसा यायला लागला की सणांची मालिका खंडित होते. गाढवाच्या शिंगाप्रमाणे सण नावाचा प्रकार गायब होतो. डिसेंबरनंतर जे सण येतात ते निव्वळच बिनखर्चिक असतात. 'तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला' असे म्हणत तिळगुळाच्या भुरक्यावरच तीळसंक्रांत पार पडते. बारा आण्याच्या रंगांमध्ये होळीची बोळवण केली जाते. तांदळाची खीर केली की अक्षय्यतृतिया आटोपून जाते. खरीप हंगामात येणारी श्रीकृष्ण जन्माष्टमी घराघरात साजरी केली जाते; मात्र उन्हाळ्यात येणारी रामनवमी व हनुमान जयंती केवळ मंदिरांतच साजरी केली जाते आणि शेतकऱ्यांना पदरचा खडकूही खर्च न करता फुकटातच प्रसाद खायला मिळतो. म्हणजे असे की शेतकऱ्याच्या घरात जेव्हा त्याच्या कमाईचा पैसा येतो, तेव्हा त्याने त्या पैशाने सण वगैरे साजरे करण्याची अजिबात सोय नाही. स्वत:च्या मिळकतीतून नवीन कपडे खरेदी करायचे नाहीत. स्वत:च्या मिळकतीच्या पैशाने गोडधोड-पंचपक्वान्ने करून मुलाबाळांना खाऊ घालायची नाहीत. बहिणीने भावाच्या घरी किंवा बापाने पोरीच्या घरी जायचे नाही. केवळ आणि केवळ माल विकून पैसा आला की त्याने किराणा, कापड दुकान, कृषी सेवा केंद्रांची उधारी फेडायची. बँका किंवा सावकाराची कर्जफेड किंवा व्याजफेड करायची आणि पुढील हंगामातील शेतीसाठी नव्याने कर्ज घ्यायला तयार व्हायचे. अजबच तऱ्हा आहे या कृषिप्रधान म्हणवणाऱ्या देशातील सणांच्या संस्कृतीची.

सणांच्या निर्मितीमागचे ऐतिहासिक महत्त्व विशद करणारे पुराणशास्त्री काहीही म्हणोत, परंतु शेतीमधल्या मिळकतीचा संचय शेतकऱ्याच्या घरात होता कामा नये, शेतकरी कायमच कर्जबाजारी राहावा हा उद्देश स्पष्टपणे डोळ्यांसमोर ठेवूनच सणांची व रितीरिवाजांची निर्मिती अगदी प्राचीन काळापासून नियोजनबद्धपणे केली गेली आहे, हे उघड आहे. ज्या हंगामात शेतीमध्ये शेतकऱ्याने स्वत:ला झोकून देऊन कामे करायची असतात त्याच काळात इतक्या सणांचा बडेजाव शेतीव्यवसायाला उपयोगाचा नाही. उत्पादनासंबंधी आवश्यक तो खर्च करावयाच्या काळात सणासारख्या अनुत्पादक बाबीवर अनाठायी खर्च करणे शेतीव्यवसायाला कधीच फायदेशीर ठरू शकणार नाही. सणांचे अनर्थशास्त्र शेतीच्या अर्थशास्त्राला अत्यंत मारक ठरले आहे, ही खूणगाठ मनाशी बांधूनच पुढील वाटचाल होणे अत्यंत गरजेचे आहे.

■■

# वांगे अमर रहे!

कॉलेज संपवून शेती करायला गेलो तेव्हा गावातील इतरांकडे नाही ते ज्ञान आपल्याकडे आहे असा माझा दृढ समज होता आणि त्याच अविर्भावात मी शेतीला सुरुवात केली. सर्व जगाच्या लेखी मूर्ख असलेल्या या शेतकऱ्यांना स्वानुभवाने शहाणे करण्यासाठी भरघोस उत्पन्न घ्यायचे ठरविले. दोन महिन्यांत नगदी पैसा मिळवून देणारे पीक म्हणून वांग्यांची निवड केली आणि पाच एकरांत वांग्यांची लागवड केली. सर्वस्व पणाला लावून मेहनत केली. मेहनत फळास आली. भरघोस पीक आलं. अन्य शेतकरी घेतात त्याच्या एक-दोन नव्हे तर चक्क पाच-सहा पट उत्पादन मिळालं आणि इथेच माझे ग्रह फिरले.

माझी वांगी बाजारात गेली आणि स्थानिक बाजारात वांग्यांचे भाव गडगडले. पाच रुपयाला पोतं कुणी घेईना. वाहतूक, हमाली, दलाली वजा जाता जो चुकारा मिळाला ते पैसे बसच्या तिकिटालाही पुरले नाहीत. शेतात घेतलेली मेहनत आणि वांगी फुकटात गेली. असे का झाले? काहीच कळत नव्हते. प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे माझ्या नजरेत इतर शेतकरी अडाणी, मूर्ख असल्याने त्यांच्याशी सल्लामसलत करण्याचा प्रश्नच नव्हता. शेवटी निष्कर्ष निघाला की मार्केटमध्ये गरजेपेक्षा जास्त माल गेल्यामुळे भाव पडले. कारण ग्राहकाला जेवढी गरज असेल तेवढीच तो खरेदी करील. माझी वांगी खपावी म्हणून ग्राहक पोळी, भात, भाकरीऐवजी नुसतीच वांग्याची भाजी खाऊन पोट थोडेच भरणार आहे? स्थानिक बाजारात गरज, मागणीपेक्षा जास्त माल गेल्याने ही स्थिती झाली त्याला जबाबदार मीच होतो. इतर शेतकऱ्यांनी सायकलवर आणलेली अर्धा पोतं वांगीसुद्धा माझ्यामुळे बेभाव गेली होती. सायकलवर अर्धा पोतं वांगी आणून उदरनिर्वाह करणारे माझ्यामुळे अडचणीत आले.

झाली चूक पुन्हा करायची नाही म्हणून दुसऱ्या खेपेस वांगी आदिलाबादला न्यायचे ठरवले. माझ्या गावाहून १५० कि.मी. अंतरावर मोठी बाजारपेठ असलेले आंध्र प्रदेशमधील आदिलाबाद शहर. ६० पोती वांगी न्यायची कशी? स्पेशल

वाहनाचा खर्च परवडणार नव्हता म्हणून माल बैलबंडीने हायवे क्र. ७ पर्यंत नेला. रायपूर-हैदराबाद जाणाऱ्या ट्रकला थांबवून माल भरला. तिथे हमाल किंवा कुली नव्हताच त्यामुळे मीच ट्रक ड्रायव्हरच्या मदतीने माल चढविला. ६० पोती प्रत्येकी वजन ५०-५५ किलो. अनुभव नवा होता. मजा वाटली (?) शेतकरी कम हमाल. टू इन वन.

आदिलाबाद गाठले. तिथल्या मार्केटची गोष्टच न्यारी. मार्केटमध्ये पाय ठेवायला जागा नव्हती. वांगेच वांगे. अत्र तत्र सर्वत्र वांगेच वांगे. जिकडे तिकडे चोहीकडे, वांगेच वांगे गडे, आनंदी आनंद गडे.

मार्केट वांग्यांनी भरलं होतं. त्या संदर्भात एका शेतकऱ्याला विचारलं,

'यंदा हवामान वांग्यांसाठी फारच अनुकूल असल्याने वांग्यांचं भरघोस उत्पादन आलंय.' तो शेतकरी.

'भाव काय चाललाय?' माझा प्रश्न.

'सकाळच्या लिलावात पाच-सहा रुपये भाव मिळाला.' तो शेतकरी.

'किलोला की मणाला?' माझा प्रश्न.

'किलोला? अरे यंदा किलोला विचारतो कोण? पोत्याचा हिशेब चालतो.' तो शेतकरी.

'म्हंजे? पोतंभर वांग्याला पाच-सहा रुपये?' माझा प्रश्न.

'पोतंभर वांग्याला नाही, पोत्यासहित पोतंभर वांग्याला.' तो शेतकरी.

'रिकाम्या पोत्याची किंमत बाजारात १५ रुपये असताना पोत्यासहित पोतंभर वांग्याला पाच-सहा रुपये?' मी मलाच प्रश्न विचारत होतो. हे कसं शक्य आहे?

'१५ रुपये किमतीच्या रिकाम्या पोत्यात ५०-५५ किलो वांगी भरली की वांग्यासहित पोत्याची किंमत घटून ५ रुपये एवढी होते' हे समीकरण मला कुणी शाळा-कॉलेजात शिकवलंच नव्हतं.

विश्वासच बसेना, पण समोर वास्तव होतं.

'आता लिलाव केव्हा होईल?' माझा प्रश्न.

'इथे नंबरवार काम चालतं. मी काल आलो, माझा नंबर उद्या येईल कदाचित.' तो शेतकरी.

'तोपर्यंत वांगी नाही का सडणार?' माझा प्रश्न.

यावर तो काहीच बोलला नाही. मूक होता. डोळे पाणावले होते. एवढ्या मेहनतीने पिकवलेले वांगे सडणार म्हटल्यावर त्याचा जीव कासावीस झाला होता.

आता माझ्याही मनात कालवाकालव व्हायला लागली.

आपला नंबर तीन दिवस लागला नाही तर अर्धी वांगी नक्कीच सडणार. डोळ्यांदेखत

वांगी सडताना पाहणं मानसिकदृष्ट्या पीडादायक ठरणार होतं. मी मनातल्या मनात गणित मांडायला सुरुवात केली. तीन दिवसांत किमान अर्धी वांगी नक्कीच सडणार. उरलेली ३० पोती गुणिले ५ वजा तीन दिवस जेवणाचा, निवासाचा खर्च बरोबर उणे पंधरा (-१५) म्हणजे वांगी विकण्यासाठी मला जवळून १५ रुपये खर्च करावे लागणार होते.

काय करावे मला सुचत नव्हतं, डोकं काम करीत नव्हतं. माझं सर्व पुस्तकी ज्ञान उताणं झोपलं होतं.

आता पुढे काय?

निर्णय घेतला. एकदा डोळे भरून त्या वांग्यांकडे पाहिलं. गुलाबी-गुलाबी, तजेल आणि टवटवीत. कुणाचीही दृष्ट लागावी अशी. ते दृश्य डोळ्यांत साठवलं, एका झटक्यात वांग्यांकडे पाठ फिरविली आणि गावचा रस्ता धरला. गावाजवळ आलो तेव्हा दिवस उतरणीला आला होता आणि आता मला एका नव्या समस्येने ग्रासले होते. गावातील शेतकरी मला यासंदर्भात विचारतील, त्यांना उत्तर काय द्यायचे? मूर्ख शेतकऱ्यांच्या नजरेला नजर भिडविण्याचे धाडस विद्याविभूषित शहाण्याकडेही उरले नव्हते. मग एका चिंचेच्या झाडाखाली विसावलो. तेथेच टाईमपास केला. गावातील सर्व लोक झोपी गेले असतील याची खात्री झाल्यानंतरच गुपचूप चोरपावलाने गावात प्रवेश केला.

आजही मला दिसतात ते वांगे...

गुलाबी-गुलाबी, तजेल आणि टवटवीत. कुणाचीही दृष्ट लागावी असे, अजूनही न सडलेले आणि माझ्या दृष्टिपटलावर अमर झालेले.... !!

■■

# कुऱ्हाडीचा दांडा

काही दिवसांपूर्वी मला माझ्या मित्राने एक बातमी सांगितली. महाराष्ट्र शासनाने कृषिनिष्ठ, शेतीभूषण म्हणून गौरविलेला शेतकरी प्रचंड कर्जाच्या ओझ्याखाली दबून आता भूमिहीन झाला आहे. खरे तर ही दु:खद बातमी. ज्याच्या कुणाच्या नशिबात हा भोग आलाय, त्याच्याबद्दल हळहळ आणि मनात सहानुभूती निर्माण करणारी बातमी; पण ही बातमी ऐकताना मला मात्र अजिबात दु:ख झाले नाही किंवा ऐकल्यावर माझ्या मनाच्या कोणत्याच कोपऱ्यात तीळभरही सहानुभूती निर्माण झाली नाही, उलट ही बातमी मला आनंदच (असुरी?) देऊन गेली. अशा वेळी मनाला दु:खाऐवजी आनंद वाटायला लागत असेल ते काही चांगुलपणाचे लक्षण नाही, हे माहीत असतानाही मला माझा आनंद आवरता येईना आणि मी त्या आनंदाला आवर घालण्याचा प्रयत्नही केला नाही.

शेतीच्या सबंध इतिहासात १९८०च्या सुमारास प्रथमच शेतकऱ्यांमध्ये त्यांच्या न्याय्य हक्कांबद्दल जनजागृती व्हायला लागली होती. एकदा कुत्र्याची शेपटी सरळ होईल; पण शेतकऱ्यांची संघटना होणार नाही, असे म्हणणाऱ्यांच्या नाकावर टिच्चून लाखालाखांच्या संख्येने शेतकरी संघटित व्हायला लागला होता. त्याला शेतीच्या दुर्दशेचे कारण समजायला लागले होते. शेतकऱ्यांच्या गरिबीचं कारण तो अडाणी आहे, आळशी आहे, अमुकतमुक जातीचा आहे, तो कष्ट करण्यात वा नवे तंत्रज्ञान आत्मसात करून ते प्रत्यक्ष शेतीत वापरण्यास कमी पडतो किंवा देवानेच त्याच्या नशिबात गरिबी लिहिली आहे अथवा त्याच्या आईने देवाला दगड-धोंडे मारलेत, म्हणून देवाने त्याच्या तळहातावर दारिद्र्याची रेघ ओढली आहे, यांपैकी कोणतेही कारण शेतकऱ्याच्या दुर्दशेला, गरिबीला अथवा कर्जबाजारीपणाला कारणीभूत नसून शेतीमालास रास्त भाव मिळू नये म्हणून सरकार जे अधिकृत धोरण राबवते यातच खरेखुरे शेतीच्या दुरवस्थेचे कारण दडले आहे, हे शेतकऱ्याला कळायला लागले होते. परिणामी शेतकरी रस्त्यावर उतरायला लागला होता. रेल्वे अडवायला लागला होता.

जेव्हा एकीकडे लढवय्ये शेतकरी शेती तोट्याची आहे, असे सांगत 'भीक नको हवे

घामाचे दाम', 'शेतमालास उत्पादन खर्चानुसार रास्त भाव मिळालेच पाहिजेत', 'हातात रूमनं, एकच मागणं' म्हणत रस्त्यावर उतरत होते, पोलिसांच्या लाठ्या खात होते, छातीवर बंदुकीच्या गोळ्या झेलून हौतात्म्य पत्करत होते, नेमके त्याच वेळी काही कृषिनिष्ठ, शेतीभूषण शेतकरी शासनाशी घरोबा करून आम्ही एकरी ५७ क्विंटल ज्वारी पिकवली, एकरी ३५ क्विंटल कापूस पिकवला असे सांगत शेतीची दुर्दशा घालवण्यासाठी आमच्यासारखे अधिक उत्पादन काढा आणि समृद्ध व्हा असा इतरांना सल्ला देत शासकीय तिजोरीतून जेवढ्या अनुदानात्मक सवलती मिळवता येतील तेवढ्या मिळवत ऐष करत होते आणि शेतकरी चळवळीचा घात करून शेतकरी आंदोलनाला सुरुंग लावत होते.

या कृषिनिष्ठ, शेतीभूषणांनी खरंच शेतकरी समाजासाठी रचनात्मक भरीव कार्य केले असते किंवा खरेच कमी खर्चात विक्रमी उत्पादन घेतले असते तर मला आक्षेप असण्याचे काहीही कारण नव्हते, उलटपक्षी या कृषिनिष्ठांचे अनुकरण करून इतर शेतकऱ्यांनाही स्वत:चा विकास करून घेण्यास प्रेरणा मिळाली असती; पण तसे काही झाले नाही. कारण मुळातच हे शेतीभूषण म्हणजे शेतीत अचाट पराक्रम गाजविलेले योद्धे नाहीत, शेतीविषयक ज्ञानाचे महामेरूही नाहीत आणि यांच्या कार्यामुळे शेतीविषयाला नवी दिशा मिळाली आहे असेही काही नाही. कारण कृषिनिष्ठ, शेतीभूषण वगैरे पुरस्कार मिळणे आणि कमी खर्चात विक्रमी उत्पादन काढणे किंवा शेतकरी समाजासाठी रचनात्मक भरीव कार्य करणे या बाबींचा एकमेकाशी अर्थाअर्थी काहीही संबंध नाहीये. हे अधिक स्पष्ट होण्यासाठी शासनाद्वारे पीकस्पर्धा कशा राबविल्या जातात याचा शोध घेणे गरजेचे आहे.

इच्छुकाने प्रथम पंचायत समितीमध्ये जायचे. त्यासाठी स्थानिक पुढाऱ्याशी लागेबांधे असणे गरजेचे. मग संबंधित कर्मचाऱ्याला स्थानिक पुढाऱ्याचा संदर्भ देऊन त्याच्याशी संगनमत करून योजना आखायची. स्पर्धेसाठी किमान १०-२० शेतकऱ्यांनी स्पर्धेत भाग घेणे गरजेचे असते, त्याशिवाय स्पर्धा कशी होणार? म्हणून आपणच डमी/दुय्यम १०-२० शेतकऱ्यांचे ७/१२, ८-अ गोळा करून त्यांच्या नावाचे फॉर्म भरायचे. त्यानंतर जी काही अधिकृत/अनधिकृत फी असेल ती भरायची. एकदा त्याला योग्य ती फी पोचली की त्यानंतर पुढील कार्ये अगदी रीतसरपणे तो कर्मचारीच पार पाडतो. म्हणजे असे की इतर शेतकऱ्यांना स्पर्धेत भाग घेता येऊ नये म्हणून स्पर्धेसाठी अर्ज दाखल करायची अंतिम तिथी उलटेपर्यंत तो अंतिम तारखेचा सुगावाच इतरांना लागू देत नाही. अशा तारखा वृत्तपत्रात जाहीर होत नाहीत. तरीही एखाद्याला सुगावा लागलाच आणि स्पर्धेत भाग घ्यायला आलाच तर कागदपत्रांच्या जंजाळात त्याला कसे लटकवायचे आणि नको त्या शेतकऱ्याला स्पर्धेपासून कसे कटवायचे यात तो कर्मचारी अगदीच

पारंगत असतो. एकदा एवढे सोपस्कार निर्विघ्न पार पाडले की पुढे सारा कागदी घोड्यांचाच खेळ असतो. मग पेरणी, मशागत, कापणी, वेचणी, मळणी आणि एकरी उत्पादनाचा आकडा हा साराच कागदोपत्री खेळ. एवढे सगळे ज्याला पुढाऱ्यांच्या आशीर्वादाने व कर्मचाऱ्याच्या संगनमताने कागदी घोडे नाचवता येते तो ठरतो पीकस्पर्धा विजेता. मग एक प्रस्ताव बनवायचा. शेतीक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याची लिखित बतावणी करून तो प्रस्ताव विहित प्रपत्रात पंचायत समिती कृषी विभागाकडे सादर करायचा. पंचायत समिती कृषी विभागाकडून सदर प्रस्ताव जि.प.कडे सादर केला जातो. जिल्हास्तरीय समितीकडून (शक्यतो छानसे हॉटेल किंवा ढाब्यावर बसून कोंबडीची तंगडी चघळत) पाहणी करून सदर प्रस्ताव शिफारशीसह विभागीय कार्यालयामार्फत कृषी आयुक्तालयास सादर केला जातो. या सगळ्या प्रोसेसमध्ये पुढाऱ्यांचा वरदहस्त लाखमोलाचा असतो. मग राज्यस्तरीय समितीकडून शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारासाठी शेतकऱ्यांची निवड केली जाते.

पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांचा मा. राज्यपाल महोदय यांचे हस्ते सन्मानपूर्वक सत्कार केला जातो. ज्याच्या आयुष्यात सुखाचा, आनंदाचा व सन्मानाचा दिवस कधीच उगवत नाही, त्याच्या आयुष्यात कोणत्या का निमित्ताने होईना; पण राज्यपालांच्या हस्ते सन्मान होण्याचा दिवस उगवत असेल तर कोणाला वाईट वाटण्याचे कारणच नव्हते; पण त्यामुळे सबंध शेतीव्यवसायाचा घात होतो, ही खरी बोच आहे. अशा शेतकऱ्यांकडे अंगुलिनिर्देश करून शासन 'यांच्यासारखे आधुनिक तंत्रज्ञान वापरा, भरघोस उत्पन्न घ्या आणि श्रीमंत व्हा' असे सांगायला मोकळे होते. यांच्या कर्तृत्वाच्या फोलपणाची जाणीव नसल्यामुळे बिगरशेतकरी समाजाचाही शेतीव्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो आणि अधिक मेहनतीने नव्या तंत्रज्ञानाचा वापर केला तर शेती हा प्रचंड फायद्याचा व्यवसाय आहे, असे जनमानस तयार होण्यास नको ती मदत होते आणि शेतीचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक किचकट व्हायला लागतात.

एखादा शेतीभूषण शेतकरी जर आज कर्जापायी शेतजमीन विकावी लागून भूमिहीन होत असेल तर शेती तोट्याचीच आहे, याचा तो अधिकृत पुरावाच ठरतो. त्या शेतकऱ्याने क्षणिक सन्मान मिळविण्यासाठी काळ्या मातीशी प्रतारणा करून जो आभासी देखावा निर्माण केला होता, शेती फायद्याची आहे हे दाखविण्यासाठी बनावट दस्तऐवज तयार करून इतरांच्या डोळ्यात धूळफेक केली होती, शेतकरी समाजाशी बेईमानी करून 'कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ' या उक्तीप्रमाणे वागण्याचे पाप त्याने केले होते, त्याचेच फळ आज त्याला भोगायला लावून नियतीने त्याच्यावर सूड उगवला आहे, असे खेदाने म्हणावे लागत आहे.

■■

# हत्या करायला शिक

'विद्येविना मती गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले' असे महात्मा जोतिबा फुले म्हणायचे. शेतकऱ्यांची मुलं शाळा-कॉलेजात शिकायला गेली की शिकून-सवरून शहाणी होतील आणि मग शिकून-सवरून शहाणी झालेली शेतकऱ्यांची मुले आपल्या घरातल्या, गावातल्या म्हणजे पर्यायाने शेतकरी समाजातल्या दारिद्र्याचा समूळ नायनाट करतील, असेही महात्मा फुलेंना वाटायचे.

विद्या आली की मती येईल, मती आली की नीती येईल, नीती आली की गती येईल, गती आली की वित्त येईल आणि वित्त आले की अस्मानी-सुलतानी संकटांशी लढण्याचे सामर्थ्यही आपोआपच येईल आणि शेतकऱ्यांचा दिवस उजाडेल असाच दुर्दम्य आशावाद जोपासत म. फुले जगले.

म. फुले गेल्याला शंभरावर वर्षे लोटली. वाहत्या काळाच्या ओघात बऱ्याच उलथापालथी झाल्या. शिक्षणाचा प्रसार झाला. सर्वदूर शाळा निघाल्या. महाविद्यालयीन शिक्षणाची व्यवस्था झाली. भरीसभर म्हणून रात्रीच्या शाळाही निघाल्या आणि शूद्र शेतकऱ्यांची पोरं शिकून मोठी झाली. उच्चपदावर गेली. राजकारणात सत्तास्थानी विराजमानही झाली; पण एकंदरीत शेतकरी समाजाची दुर्दशा काही खंडित झाली नाही. शेतकऱ्यांची मूठभर पोरं गलेलठ्ठ पगार मिळवती झाली किंवा शेतकऱ्यांची मूठभर पोरं लाल दिव्याच्या गाडीत फिरायला लागली याचा अर्थ एकंदरीत संपूर्ण शेतीमध्येच समृद्धी आली असा कसा घेता येईल?

मग शिक्षणाने नेमके काय केले? याचा जरा शोध घेऊन बघितला तर मोठे मजेदार निष्कर्ष बाहेर यायला लागतात. झाले असे की शिक्षणाने विद्या आली. विद्येमुळे मतीही आली; पण मतीमुळे नीती येण्याऐवजी थेट गती आणि वित्त आले. नीती नावाचा मधला एक टप्पाच गहाळ झाला. शिवाय वित्त आले की लढण्याचे सामर्थ्यही आपोआपच येईल, असा जोतिबांनी केलेला कयासही शेतकरीपुत्रांनी-शूद्रपुत्रांनी उताणा - उपडा - तोंडघशी पाडला. शूद्राचा पोरगा जेवढा अधिक शिकला

तेवढा तो त्याच्या इतर शेतकरी बांधवांपासून दूर गेला आणि आत्मकेंद्रित झाला असेच समीकरण दृग्गोचर झाले. संपूर्ण देशात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरू झाले; पण हा उच्चशिक्षित शेतकरीपुत्र हादरला नाही, पाझरला नाही, विव्हळला नाही आणि पेटून वगैरे तर अजिबातच उठला नाही. शेतकऱ्याच्या जळणाऱ्या चिता पाहतानाही तो ढिम्मच्या ढिम्मच राहिला.

'एकजुटीची मशाल घेऊनी पेटवतील हे रान' या साने गुरुजींच्या ओळी साकार करण्याचा शिकल्या-सवरल्या-शहाण्या आणि बऱ्यापैकी वित्तप्राप्ती केलेल्यांनी कधी प्रयत्नच केला नाही किंवा चुकून कधी त्या मार्गालाही शिवले नाहीत. कदाचित यात त्यांचा दोषही नसावा. जळत्या घरात आगीचे चटके सोसल्यानंतर त्या घरातल्या एखाद्याला त्या पेटत्या घरातून जर बाहेर पडायची संधी मिळाली तर तो स्वत:चा जीव मुठीत घेऊन जिवाच्या आकांताने पळत सुटतो. पुन्हा मागे वळून त्या घराकडे पाहण्याच्या फंदात पडत नाही किंबहुना मागे वळून त्या घराकडे पाहण्याची त्याच्यामध्ये इच्छाशक्ती उरलेलीच नसते. कदाचित अशाच सामूहिक मानसिकतेतून शेतीच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी झगडण्याऐवजी आहे त्या व्यवस्थेत स्वत:ला समरस करून घेण्याच्या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून ही शिकली-सवरली शेतकऱ्यांची मुले 'अडवणूक त्या करणारांची उडवू दाणादाण' असे स्वप्नातही म्हणायला धजावली नसावीत.

'किसान-मजूर उठलेले, कंबर लढण्या कसलेले' असे दृश्य अनेक ठिकाणी पाहायला मिळते; पण लढण्यासाठी कंबर कसणाऱ्यांमधे अशिक्षित आणि अर्धशिक्षित लोकांचाच जास्त भरणा असतो. उच्चशिक्षितांची संख्या मोजायला एका हाताची बोटेदेखील पुरेशी ठरतात किंवा तितकेही नसतात आणि असलेच तर ते लढण्यासाठी नव्हे तर लढणाऱ्यांना हुसकावून लावण्यासाठी असतात, लाठ्या घालण्यासाठी किंवा गोळीबाराचे आदेश देण्यासाठी असतात आणि नेमका येथेच म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणातून क्रांती घडेल या तत्त्वाचा पराभव झाला असावा, असे समजायला बराच वाव आहे.

हे खरे आहे की एकूण लोकसंख्येपैकी दहा-वीस टक्के लोकांच्या आयुष्यात शाळा-महाविद्यालयीन शिक्षणाने आमूलाग्र बदल घडत असतो. स्वातंत्र्याच्या फळांची चवही चाखण्यात त्यांचाच हातखंडा असतो. आयुष्यही समृद्ध आणि वैभवशाली होत असते. त्यांच्या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याच्या कक्षाही नको तेवढ्या रुंदावायला लागतात; पण उरलेल्या सत्तर-ऐंशी टक्के जनतेचे काय? शेतीवर जगणाऱ्या शेतकरी-शेतमजुरांचे काय? त्यांना ना जगण्याची हमी, ना मरण्याची हमी. मरण येत नाही म्हणून जगत राहायचे एवढेच त्यांच्या हातात असते. ज्या देशात हजारो कोटी

रुपयांचे गैरव्यवहार सहज पचवले जातात त्याच देशातल्या शेतकऱ्यांना केवळ काही हजार रुपयांच्या कर्जापायी आत्महत्या करावी लागते. शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ का येते, या प्रश्नाचे तपशीलवार उत्तर शोधण्याची शिकून शहाणा झालेल्या आणि शेतकऱ्याच्या पोटी जन्म घेऊन उच्च शासकीय पदावर कार्यरत असणाऱ्या शुद्रपुत्रांना अजिबातच गरज वाटत नाही, हा इतिहास आहे.

**असे गैर ती आत्महत्या कधीही, म्हणे कास्तकारास समजावुनी**
**परी कारणांचा जरा शोध घ्यावा, अशी सुज्ञता दाखवेना कुणी**

आता शेतकऱ्यांच्या पोटी जन्म घेतलेली काही मुले उच्चशिक्षण घेऊन प्रशासनात उच्चपदावर पोहोचतील, काही मुले राजकारणात शिरून सत्तास्थानी विराजमान होतील त्यामुळे संपूर्ण शेतीव्यवसायाचे भले होऊन गरिबीचा आणि दारिद्र्याचा नि:पात होईल, अशी आशा बाळगणे यापुढे भाबडेपणाचे व मूर्खपणाचे ठरणार आहे. कुणीतरी प्रेषित जन्माला येईल आणि आपल्या घरात दिवे लावून जाईल, हा आशावादही चक्क वेडेपणाचा ठरणार आहे. ज्याचे जळते, त्यालाच कळते हेच खरे असून त्यावरील इलाजही ज्याचे त्यानेच शोधले पाहिजेत.

कवी इंद्रजित भालेराव म्हणतात,

**शिक बाबा शिक लढायला शिक**
**कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक**

शालेय शिक्षणातून मिळणाऱ्या विद्येवर विश्वास ठेवल्याने व त्यानुसार कृती केल्याने जर शेतकऱ्याचे काहीच भले होणार नसेल तर शेती कसणाऱ्या व शेतीवर जगणाऱ्या शेतकरीपुत्रांच्या-कुणब्याच्या पोरांच्या नव्या पिढीला स्वत:चे मार्ग स्वत:लाच शोधावे लागतील. जुन्या समजुती व विचारांना फाटा देऊन नव्या वास्तववादी व परिणामकारक विचारांचा अंगीकार करावाच लागेल. लढणे हाच जर एकमेव पर्याय उरला असेल तर कुणब्याच्या पोराने आता लढायला शिकलेच पाहिजे.

**लाजरेपणा बुजरेपणा बाजारात ईक**
**घेऊ नको फाशी बाबा खाऊ नको इख**
**मागं मागं नको पुढं सरायला शिक**
**आत्महत्या नको हत्या करायला शिक**

हत्या करणे हा शेतकरी समाजाचा धर्मच नाही. लाथेखाली तुडवू इच्छिणाऱ्यांशीसुद्धा अदबीने वागण्यातच त्याचे आयुष्य गेले. व्यक्तिगत जीवनात प्रसंग आला तर ज्या व्यवस्थेने त्याच्या आयुष्यात माती कालवली, त्या जुलमी व्यवस्थेला जाब विचारायचे सोडून स्वत:च आत्मग्लानी स्वीकारून विषाची बाटली घशात ओतली किंवा गळ्यात दोर लटकवून जीवनयात्रा संपविली. नेमका याच चांगुलपणाचा सर्वांनी

गैरफायदा घेतला. नक्षलवाद्यांचे नाव काढल्याबरोबर थरथरायला लागणारे प्रशासकीय अधिकारी निरुपद्रवी शेतकऱ्यांवर नेहमीच मर्दुमकी गाजवताना दिसतात. एका हातात एके ४७ रायफल व दुसऱ्या हातात हँड ग्रेनेड घेतलेले दोन तरुण बघून सरकारे हादरली. डोईवर लाल-पिवळा दिवा मिरवणारे माजघरात दडले. टीव्ही चॅनल आणि वृत्तपत्रे एकाच विषयावर रेंगाळले. जनजीवन ठप्प झाले. असे अनेकवेळा घडल्याचे इतिहास सांगतो. याउलट पाठीशी पोट जाऊन शरीराने कृश झालेले लाखो शेतकरी अहिंसक मार्गाने हात छातीशी बांधून हक्काची भाकर मागण्यासाठी जेव्हा रस्त्यावर उतरले तेव्हा मायबाप सरकारने त्यांच्या पाठीत गोळ्या घालून मुडदे पाडले. घालायच्याच असतील तर छातीवर गोळ्या घाला असे म्हणणाऱ्या शेतकऱ्यांची एवढी साधी इच्छादेखील पूर्ण केली नाही. शासन आणि प्रशासनाला जर बंदुकीचीच भाषा कळत असेल तर आत्मग्लानी व आत्महत्या निरुपयोगीच ठरतात, असे म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत इच्छा असो नसो, स्वत:ला बदलावेच लागेल. आत्महत्या नव्हे तर हत्या करायला शिकावेच लागेल.

**कोट्यवधी कर्ज घेती दलालांची पोरं**
**बुडविती त्याचा कधी करिती ना घोर**
**तुला टाळून जाणाऱ्याला अडवायला शिक**
**घेतलेली कर्जे सारी बुडवायला शिक**

जे जे आले ते शेतकऱ्यांच्या नरडीला नख लावूनच गेले. तलाठ्यापासून तहसीलदारापर्यंत, दलालापासून ते उद्योगपतीपर्यंत आणि गावच्या सरपंचापासून ते देशाच्या पंतप्रधानापर्यंत सर्वांनीच त्याने पिकविलेल्या मालास उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव देऊन शेतमालाची लयलूट करण्यासाठी हातभार लावला. त्यांच्या चुकीच्या धोरणाच्या फटक्यानेच शेतकऱ्यांचा संसार उदध्वस्त झाला. आता हेच बघा, यंदा डिसेंबरमध्ये कापसाचे भाव रु. ७०००/- प्रतिक्विंटल होते, ते काही सरकारच्या कृपेमुळे नव्हते. आंतरराष्ट्रीय बाजारात तेजी आहे म्हणून होते; पण केंद्र सरकारने मे महिन्यात कापसाच्या निर्यातीवर बंदी लादली आणि कापसाचे भाव रु. ३०००/- प्रतिक्विंटल एवढे कोसळले. मग शेतकऱ्याने एवढा तोटा कसा भरून काढायचा? कर्जे कशी फेडायची? मग तो कर्जबाजारी झाला तर त्याच्या कर्जबाजारीपणाला तोच एकटा दोषी कसा? त्यामुळे आता काही नाही, एकच सरळसोपा मार्ग आणि तो म्हणजे घेतलेली कर्जे सारी बुडवायला शिकणे. पिकलं तवा लुटलं म्हणून देणंघेणं मिटलं.

**उंटावून शेळ्या हाकी सरकार शहाणं**
**त्याच्यामुळं जीव तुझा पडला गहाण**

**तुझं ऐकत नाही त्याला झाडायला शिक**
**तूच दिली सत्ता त्याला पाडायला शिक**

शेतीला अवकळा येण्याला केवळ आणि केवळ शासनयंत्रणाच कारणीभूत आहे. शेतीचे प्रश्न सुटत नाहीत, कारण शेतकरी कधी शेतीच्या मुद्द्यांच्या आधारावर मतदानच करीत नाही. जाती-पाती, धर्म-पंथांच्या आधारावर मतदान करण्याचा या देशातल्या लोकशाहीला रोगच जडला आहे. निदान शेतकऱ्याने तरी यातून बाहेर यावे. जो शेतीचे प्रश्न सोडविणार नाही त्याला मतदानच करायचे नाही, मग तो उमेदवार त्याच्या जाती-धर्माचा का असेना, असा निश्चय करायलाच हवा. दिलेले आश्वासन पूर्ण न करणाऱ्याला निवडणुकीच्या मैदानात लोळवायलाच हवे.

**जातील हे दिस आणि होईलही ठीक**
**उद्या तुझा शेतामधी उधाणेल पीक**
**गाळलेल्या घामासाठी रस्त्यावर टीक**
**हक्कासाठी लढ बाबा मागू नको भीक**

प्रत्येक अवस्थेला अंत असतोच. कोणतीही व्यवस्था चिरकाल टिकत नाही. आजचा दिवस कालच्यासारखा असत नाही आणि उद्याचा दिवस आजच्यासारखा असत नाही. स्थित्यंतरे घडतच राहतात. त्याचप्रमाणे कोणतीही व्यवस्था निर्दोष असू शकत नाही. एका दोषास्पद व्यवस्थेकडून दुसऱ्या दोषास्पद व्यवस्थेकडे आपण वाटचाल करीत असतो; पण दुर्दैव हे की बळीराजाला पाताळात गाडल्यानंतर निर्माण झालेल्या सर्व व्यवस्थांमध्ये शेतकरी केंद्रस्थानी कधीच नव्हता. त्याला कधी शूद्र म्हणून हीनतेची वागणूक दिली तर कधी औद्योगिकीकरणाच्या उत्कर्षासाठी कच्चा माल म्हणून त्याची पिळवणूक केली गेली; पण हे आता थांबायला हवे.

हे शेतकऱ्याच्या पोरा, आता गाळलेल्या घामाची रास्त किंमत कशी वसूल करायची हेच तुला शिकायचे आहे. त्यासाठी ठाण मांडून बसायचे आहे आणि प्रश्न निकाली निघेपर्यंत तसूभरही न ढळता अंगीकार केलेल्या रस्त्यावर टिकायचेही आहे.

■■

# श्याम्याची बिमारी

श्याम्या म्हणजे एक रोखठोक आणि सरळसोट स्वभावाचा मनुष्य. मनात येईल तसे बेधडक व्यक्त होणे हे त्याचे गुणवैशिष्ट्य. कणाकणांतून ज्ञानार्जन करण्यासाठी त्याचा सदैव प्रयत्न चाललेला असतो आणि तरीही वाचनाच्या बाबतीत श्याम्या मात्र फारच अभागी मनुष्य आहे असे मला वाटते. अभागी या अर्थाने की साहित्यिक क्षेत्रात विपुल साहित्य उपलब्ध असूनही ते जास्तीत जास्त वाचण्याचे भाग्य त्याला फारसे लाभले नाही. कधी आर्थिक स्थितीमुळे पुस्तके विकत न घेऊ शकल्यामुळे तर कधी भौगोलिक स्थितीमुळे त्याच्या संचारप्रदेशात पुस्तके उपलब्ध नसल्यामुळे असे घडले असावे.

पण हे सत्य असले तरी पूर्णसत्य मात्र नाही.

खरे हे आहे की त्याला एक आजार आहे आणि तो आजार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. डाव्या हातात पुस्तक घेऊन वाचता-वाचताच उजव्या हाताने जेवण करताना किंवा समोरच्या माणसाशी बोलत असतानासुद्धा त्याची नजर पुस्तकावरच खिळून असल्याचेही मी अनेकदा बघितले आहे. त्याला वाचायला खूप आवडतं, खूप खूप आवडतं. विषयाचेही बंधन नाही, काहीही आवडतं. कथा, कादंबरी, कविता, गझल, लावणीपासून ते हिंदी उपन्यास वगैरे वगैरे... कशाचे काहीही बंधन नाही.

पण हाती घेतलेले पुस्तक त्याने शेवटापर्यंत वाचून काढले, असे मात्र फारसे घडत नाही. कधी कधी तो पुस्तक घेतो, वाचायला सुरुवात करतो; पण काही पाने वाचून झाली की त्याला असे वाटते की हे वास्तव नाहीच. या देशातल्या ७० टक्के जनतेचे हे चित्रण नसून या लेखाचा जनसामान्याच्या दैनंदिन जीवनाशी काहीही संबंध नाहीये. मग यात वेळ खर्ची घालून अनावश्यक काडीकचरा डोक्यात कोंबण्यात काय हाशील आहे? तो असा विचार करतो आणि पुस्तक फेकून देतो.

कधी कधी तो पुस्तक घेतो, वाचायला सुरुवात करतो पण काही पाने वाचून

झाले की त्याला असे वाटते की ज्या लेखकाने हे लिहिलेय तो लेखक, त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि आचरण त्या लेखात मांडलेल्या विचारांशी, भूमिकेशी प्रामाणिक किंवा सुसंगत नाही. मग जो विचार, भूमिका स्वत: लेखकाला जगता येत नाही त्या विचाराला, विचार तरी कसे म्हणावे? थोडा वेळ उत्तर शोधतो आणि उबग आल्यागत पुस्तक फेकून देतो.

तशी त्याला बालकवींची श्रावणमासी ही कविता फार आवडते कारण, त्यात जे श्रावण महिन्याचे वर्णन आले ती केवळ कवीची कल्पना नसून त्या कवितेतला अद्‌भुत आनंद त्याला श्रावण महिना सुरू झाला की प्रत्यक्षात अनुभवायला मिळतो.

**सरसर येते क्षणांत शिरवे,**
**क्षणांत फिरूनी ऊन पडे**

किंवा

**झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे**
**तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळेपिवळे ऊन पडे**

हे दृश्य केवळ श्रावण महिन्यातच पाहायला मिळते. इतर महिन्यात नाहीच. कवी, कविता आणि श्रावणमास एकमेकांशी एवढे एकरूप झालेत की त्यांना वेगवेगळे नाहीच करता येणार. त्याला असे वाटते की कवीने खूप परिश्रम घेतले असणार ही कविता लिहिण्यावर. संपूर्ण श्रावणमासाचे अवलोकन केले असणार, अभ्यास केला असणार आणि कवी श्रावणमासाशी तद्‌रूप झाला असणार, तेव्हा कुठे ही कविता आकारास आली असावी. कविता लिहून झाल्यावर एवढा प्रदीर्घ काळ लोटला; पण अजूनही श्रावण महिना त्याच कवितेचे अनुसरण करतो आणि तसाच वागतो जसे कवितेत लिहिले आहे.

याउलट ना. धों. महानोरांची 'या नभाने भुईला दान द्यावे' ही कविता तर सर्वांची आवडती कविता. उत्तुंग लोकप्रियता लाभलेली पण श्याम्याला नाहीच आवडत.

तो समर्थनार्थ जे पुरावे सादर करतो तेही जगावेगळे.

त्याच्या मते नभाने भुईला नेहमीच दान दिलेले आहे आणि भुईला दिलेल्या दानावर नभ अजूनही ठाम व प्रामाणिक आहे म्हणून तर ही सजीवसृष्टी टिकून आहे. देशाची लोकसंख्या चमत्कारिक गतीने वाढत असतानाही सर्वांना पोटभरून खायला पुरेल आणि सडायलाही शिल्लक साठा उरेल एवढे मुबलक अन्नधान्य या देशात पिकते. नभाचे दान आहे म्हणूनच असे घडते ना?

मग अतिरिक्त दानाची मागणी करणे याचा अर्थ मातीतून अधिक भरघोस उत्पन्न निघावे अशी अपेक्षा असणार. मग समजा नभाने या अतिरिक्त दानाची आराधना स्वीकारली, भरमसाठ उत्पादन आले आणि जोंधळ्याच्या ताटाला कणसांऐवजी

चांदणे, सूर्य आणि चंद्र जरी लगडले तरी त्याने काय घडणार आहे, असा श्याम्याचा सवाल आहे. कवीने ज्या शेतकरी समाजाच्या भल्यासाठी हे अतिरिक्त दान मागितले, त्या शेतकऱ्याच्या पदरात काय पडणार आहे? हाच लाखमोलाचा प्रश्न आहे, असे त्याला वाटते. शेतीमध्ये जोंधळ्याच्या ताटाला कणसांऐवजी चांदणे, सूर्य आणि चंद्र लगडायला लागल्याबरोबर प्रचलित व्यवस्थेनुसार कोणतेही सरकार चांदणे, सूर्य आणि चंद्राकडे शेतमाल याच दृष्टिकोनातून बघणार. अतिरिक्त उत्पादन येऊनही ग्राहकासाठी शेतमाल स्वस्तात उपलब्ध झाला पाहिजे या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने निर्यातबंदी लादणार आणि या सूर्य, चंद्र, ताऱ्यांना कांदाभजी किंवा आलुबोंडा यापेक्षा जास्त भाव मिळणार नाही याची पुरेपूर व्यवस्था करणार. कदाचित शासन रेशनकार्डावर अनुदानित किमतीत सूर्य, चंद्र, तारे उपलब्ध करून देईल. त्यामुळे गल्लोगल्लीत, कचराकुंडीत व नालीच्या प्रवाहात सूर्य, चंद्र, तारकांचे ढिगारे साचलेले दिसतील. त्यामुळे मुबलक पिकण्याचे आणि जोंधळ्याच्या ताटाला कणसांऐवजी चांदणे, सूर्य आणि चंद्र लागण्याचे कवीचे स्वप्न साकार होईल.

पण ज्या शेतकऱ्यांसाठी हिरीरीने एवढे मोठे दान मागितले त्याच्या पदरात काय पडणार आहे? शेतात सूर्य, चंद्र, तारे पिकवूनही ते जर मातीमोल भावानेच खपणार असेल तर त्याची दरिद्री आहे तशीच राहणार आहे हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे. त्याऐवजी कवीने 'या नभाने सरकारला अक्कलदान द्यावे, विजेच्या लखलखाटाने सरकारचे डोके ठिकाणावर यावे' जेणेकरून शेतकऱ्यांच्या दारापर्यंत विकाससूर्य पोहचेल अशी मागणी करणे जास्त सयुक्तिक नसते का ठरले? त्यातल्या त्यात कवी बिगर शेतकरी असता तर श्याम्याची अजिबात हरकत नव्हती; पण कवी दस्तूरखुद्द शेतकरी असल्याने ही बाब जास्तच गंभीर आहे, असे त्याला वाटते आणि असे त्याला वाटले की तो डाव्या हातचे पुस्तक उजव्या हातात घेतो आणि फेकून देतो.

'काळ्या (काया) मातीत मातीत' ही किती सुंदर कविता. महाराष्ट्रभर गाजलेली. सिनेमावाल्यांनादेखील भुरळ पाडून त्यांच्या सिनेमात समावेश करण्यास भाग पाडणारी.

पण श्याम्याला भुरळ पडेल तर तो श्याम्या कसला? त्याच्या मते विठ्ठल वाघांसारखे शेतकऱ्याच्या घरात जन्मलेले शेतकरीपुत्र कवी, शेतकऱ्यांच्या वेदना विकून मोठे कवी/साहित्यिक वगैरे झालेत, धन मिळवले, मान मिळवला; पण शेतकऱ्यांच्या पायातून सांडणारे लाल रगत (रक्त) थोडेफार थांबावे आणि कवीला (श्याम्यालादेखील) पडलेले हिरवे सपान (स्वप्न) प्रत्यक्षात खरे होऊन शेतकऱ्याच्या घरात आनंदीआनंद नांदावा यासाठी पुढे मग कवीने काहीच प्रयत्न केले नाहीत. ज्या सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे ही परिस्थिती उद्‌भवते, त्या सरकारशी दोन हात करून शेतकऱ्यांचे प्रश्न खंबीरपणे मांडण्याऐवजी सरकारकडून जेवढा काही

लाभ उपटता येईल तेवढा उपटण्यातच धन्यता मानली. त्याला हा चक्क बेगडीपणा वाटतो आणि असे त्याला वाटले की तो हातातले पुस्तक कपाळावर मारून घेतो आणि दूर भिरकावून देतो.

श्याम्याचे तर्कशास्त्र विचित्र असले तरी तो त्याच्या समर्थनार्थ जो युक्तिवाद करतो, तो मात्र खरेच बिनतोड असतो.

मी त्याला एकदा म्हटले की, श्याम्या तुला कलेचा आस्वाद घेताना त्यातील उपयुक्ततेचाच शोध घेण्याची सवय जडली आहे. कलेचा पैस किती मोठा असू शकतो याचा तुला अंदाज आलेला नाही. अरे Rita Mae Brown यांनी असे म्हटलेय की "Art is moral passion married to entertainment. Moral passion without entertainment is propaganda and entertainment without moral passion is television." त्यामुळे तुला कलेचा आस्वाद घेण्यासाठी तुझे मन मोठे करण्याची गरज आहे!

त्यावर श्याम्या उसळलाच आणि म्हणाला की कलेचा पैस किती मोठा असू शकतो याचा मला अंदाज आलेला नाही, असे मोघमपणे म्हणता येणार नाही. तसे असते तर मी पुस्तकाला हातच लावला नसता. माझे मूळ दुःख, या देशातल्या सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त असलेल्या आम जनतेचे साहित्यामध्ये विपरीत उमटणारे प्रतिबिंब, त्यांच्या समस्यांची सोडवणूक होण्यापेक्षा गुंतागुंत वाढविणारा आशय, त्यांच्या समस्यांकडे इतरांनी पाहण्याचा दूषित दृष्टिकोन, त्यात आढळणारा बेगडीपणा यात दडलेले असावे कदाचित.

श्याम्याच्या मते लेखनासाठी दोन पर्याय असू शकतात.

१) लिहिणाऱ्याने वाटेल तसे लिहीत राहायचे, ते इतरांवर लादत राहायचे आणि जर त्यांनी नाराजीचा, नावडल्याचा सूर काढला तर त्यांना कलेची कदर नाही अशी त्यांची संभावना करायची.

२) लिहिणाऱ्यांनी आत्मपरीक्षण आणि अभ्यास करून तळागाळातल्या जनसामान्यांचे जीवन कसे सुकर होईल, याचा वेध घेऊन लिहिण्याचे कसब अंगी बाणवण्याचा प्रयत्न करणे. जे काही लिहायचे, ते लिहिताना त्या लिखाणाचे समाजावर काय बरे-वाईट परिणाम होतील याचाही थोडाफार विचार करायचा. ज्वलंत विषय हाताळायचा असेल तर शक्य तेवढा त्या विषयाच्या आत खोलवर शिरायचा प्रयत्न करायचा आणि नंतरच लिहायचे.

दोनपैकी तुलनेत पहिलाच पर्याय सोयीचा व विनाकष्टाचा असल्यानेच कदाचित अनादीकाळापासून हाच मार्ग अवलंबला जात असावा, असे श्याम्याचे मत आहे.

शाम्याच्या विचारांना काही लोक एकांगी मानतात; पण शाम्याला हे मान्य नाही.

याउलट भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांना बगल देऊन केलेले लेखन किंवा सरकारची मर्जी राखण्यासाठी धडपड करून जाणीवपूर्वक केलेले लेखनच एकांगी मानायला हवे असे श्याम्याचे आग्रही मत आहे आणि म्हणून जेथे संधी मिळेल तेथे त्याचं सदैव एकच आणि एवढंच तुणतुणं वाजत असतं.

त्यातूनच त्याला बिमारी जडली.

नको तसा विचार करणे आणि त्याचा राग पुस्तकावर काढणे.

या प्रकाराला कोणता आजार किंवा विकार म्हणावे बरे?

■■

# गंधवार्ता एका प्रेताची

''दादाऽऽऽ, भाऊ गेला रेऽऽऽ''

असा आर्त टाहो कानावर आदळताच आपल्या कामात मग्न असलेला भरत खाड्कन भानावर आला. नजर उचलून पाहताच त्याला समोर जे दृष्य दिसलं ते पाहून तो हादरून गेला. काहीतरी भयानक विपरीत घडलंय याची जिवंत वार्ता घेऊन ती बातमीच त्याच्याकडे धावत येत होती.

भरत गव्हाणकर म्हणजे एक उच्चविद्याविभूषित आणि तेवढंच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व. बुद्धिमत्तेच्या बळावर काहीतरी वेगळं करून दाखवायचंच असा मनाचा पक्का निर्धार करून शहर सोडून गावात राहायला आलेला. चांगली महिन्याकाठी भरपूर वेतन आणि भत्ते देणारी शासकीय नोकरी सोडून दिली आणि शेतीमध्ये नवनवे प्रयोग करण्यास सुरुवात केली. त्याला इतिहास बदलायचा होता; पण इतिहास बदलला नाही उलट इतिहासाचीच पुनरावृत्ती झाली, इतिहासानेच त्याचे जीवन बदलून टाकले. गावात आजवर जे इतरांच्या बाबतीत घडत होतं तेच भरत गव्हाणकरच्या बाबतीत घडलं. शेतीतून काही वरकड मिळकत मिळविण्याऐवजी, बापा-आज्याने पोटास गांजवून जे काही नगदी चार पैसे, सोनं-नाणं लेकासाठी जमवून ठेवलं होतं, तेही शेतीत गमावून बसला होता. सर्व बँकांचा थकबाकीदार झाला होता. खासगी सावकारांनी त्याच्यासाठी दरवाजे केव्हाच बंद केले होते. थोडक्यात सांगायचं तर 'हातावर आणणे आणि पानावर खाणे' येथपर्यंत त्याची प्रापंचिक हालत हलाखीची झाली होती; पण नियतीचे वार सोसूनही न डगमगता त्यातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करणारा भरत तेवढ्याच ताकदीनिशी येणाऱ्या भविष्याशी समर्थपणे लढत होता. आर्थिक स्थितीने खचला असला तरी मनमिळाऊ स्वभावाने आणि लोकांच्या सुखदु:खात समरस व्हायच्या त्याच्या गुणविशेषामुळे मात्र गावात त्याला खूप मानमरातब मिळायला लागला होता व गावकरी त्याच्याकडे आदरभावाने पाहायला लागले होते.

शेतीची संपूर्ण कामे करून झाली की उरलेल्या वेळात रेडिओ, टीव्ही दुरुस्ती करून चार पैसे मिळवायचे असा त्याने नवा जोडधंदा सुरू केला होता. त्यामुळे दोन सांजेची गुजराण व्हायला थोडा हातभार लागला होता.

त्या दिवशीही तो असाच एक टीव्ही दुरुस्ती करीत बसला होता. संपूर्ण टेबलभर कंडेन्सर, कॅपॅसिटर, मल्टिमीटर, अस्ताव्यस्त पडले होते. बाजूलाच लालभडक झालेला तप्त गरम कैय्या (सोल्डरिंग मशीन) व २४० व्होल्टचा विद्युत प्रवाह इकडे तिकडे पळवत नेणारे अर्धवट अवस्थेत खुले असणारे अर्धनंगे वायर्स सभोवताली पसरले होते. भरत शांतचित्ताने टीव्ही दुरुस्त करण्यात मग्न झाला होता आणि तेवढ्यातच त्याच्या कानावर हा आर्त टाहो येऊन आदळला.

''दादाऽऽऽ भाऊ गेला रेऽऽऽऽ''

पिसाटल्यागत सुसाट वेगाने, जिवाच्या आकांताने टाहो फोडत शेवंता धावत आली आणि त्याला काही कळायच्या आतच त्याला बिलगली.

क्षणभर भरत हादरलाच. काहीतरी अघटित घडल्याच्या कारणापेक्षाही सभोवताली विखुरलेल्या जिवंत वीजप्रवाहाच्या खुल्या तारा हे हादरण्यामागचे प्रमुख कारण होते. टीव्हीमध्ये पिक्चर ट्यूब प्रकाशमान व्हावी म्हणून पॉवर सेक्शन भागात प्रचंड दाबाची विद्युतशक्ती तयार होत असते. नेमका तेथे जर मानवी स्पर्श झाला तर थेट मृत्यूच किंवा शरीराचा किमान एखादा अवयव/भाग कायम निकामी होण्याची हमखास खात्रीच.

शेवंता गळ्याला बिलगल्याने तिच्यासोबत त्याचाही तोल ढासळलाच होता. त्यामुळे शरीराचा कोणताही भाग कधी विद्युतप्रवाहाच्या संपर्कात येईल सांगता येत नव्हते. पण असे म्हणतात की आणीबाणीच्या क्षणी माणसाची विवेकबुद्धी शांत असली तर आलेल्या संकटावर मात करण्यासाठी संकट धावून येण्याच्या वेगापेक्षा जास्त वेगाने बुद्धी संरक्षणाचे शस्त्र शोधायला लागते आणि क्षणार्धात उपायाचे मार्ग सुचायला लागतात आणि तेच झाले. भरतने एकही क्षण न दवडता स्वतःचा तोल सावरून दोन्ही हाताने शेवंताला अलगद छातीपर्यंत उचलून घेतले आणि तिथून बाहेर आला. तोवर बाहेर पन्नास-साठ लोकांचा जमाव जमला होता. कुणीतरी धावत जाऊन ग्लासभर पाणी आणून शेवंताला पाजले; पण शेवंताच्या तोंडून भाऊ.. भाऊ... भाऊ... यापुढे शब्दच फुटेना.

''आवं तोंडानं सांग की काय झालं त्ये?'' एक आजीबाई समजावणीच्या स्वरात बोलली.

''जे व्हाचं आसन त्ये झालं... एकदा, आमालेबी माहीत होऊ दे ना, का झालं त्ये?'' सरस्वती काकू.

“ताई नुसते रडून काय होणार? थोडा धीर धरून सांगा की आम्हाला...” भरतची पत्नी अर्चना.

आता शेवंताने स्वत:ला सावरले होते, त्यामुळे थोडा वेळ स्तब्धता पसरली.

आणि शेवंता सांगायला लागली.

“मी वावरात कापूस वेचत व्हती. बाजूच्या रस्त्याहून एक फटफटी गेली. माह्या माहेरचा त्या फटफटीवर बसलेला मागचा माणूस म्होरच्याले डगऱ्याने सांगत व्हता की अर्जुन आणि त्येची बायको दोघेबी मेल्येत म्हून. म्या आइकलं अन् त्येला डगऱ्याने आवाज देह्ला; पण थे लई दूर निघून गेले व्हते.”

“अगं मग तो अर्जुन म्हणजे तुझाच भाऊ असेल कशावरून. दुसरा कोणीही असू शकते. तू तसं फारसं काही मनाला लावून घेऊ नकोस.” भरत समजावणीच्या स्वरात सांगायला लागला.

“म्याबी थेच म्हंते. उगच दोरीले साप म्हणून भुई कायले ठोपट्टे बाप्पा?”

सरस्वती काकूंनीही भरतचीच री ओढली.

“नाय नाय, माहा आत्मा गाही देत्ये की काय तरी इपरीत झालंच हाय, थे काय नाय. दादा तू लवकर फटफटी काहाड. आपल्याले लगबगीनं गेलं पाह्यजे.” एका हातात पदराचा शेव घेऊन डोळे पुसत शेवंता बोलत होती.

शेवंताचं माहेर सोनेगाव फारसं लांब नव्हतं. केवळ १३ कि.मी. अंतरावर. शेवंताचा भाऊ अर्जुन हा भरतचा वर्गमित्र. त्यामुळे सोनेगाव भरतच्या परिचयाचं गाव. भरतने डोळ्यांसमोर सोनेगावचं दृश्य उभं करून गावात दुसरा कोणी अर्जुन असावा काय, याचा शोध घेतला; पण या अर्जुनव्यतिरिक्त दुसरा कोणी डोळ्यांसमोर येईचना. म्हणून भरतच्या हृदयगतीचे ठोके जोरजोराने धोक्याची घंटा वाजवायला लागलेच होते. भरतकडे मोटरसायकल नाही आणि त्याला शेवंताला घेऊन लगोलग सोनेगावला जाणे आवश्यक आहे, हे ताडून सरपंच विश्वासदादांनी आपली होंडा आणून समोर उभी केली आणि चाबी भरतच्या हातात देत म्हणाले.

“भरतराव तुम्ही शेवंताला घेऊन निघा लवकर आणि पोचल्यापोचल्या आम्हास फोन करा.”

भरत आणि शेवंता सोनेगावात पोहोचले तेव्हा गावातली निस्तब्ध शांतता आणि गावकऱ्यांचे पाणी उतरलेले चेहरे पाहून भरतची हृदयगती अधिकच वाढायला लागली होती.

आणि हे काय? अर्जुनच्या घरासमोर गर्दी? ती घटनाच खोटी असेल किंवा दुसराच कोणीतरी अर्जुन असेल, अशी आतापर्यंत मनाची समजावणी करत स्वत:स सावरणाऱ्या शेवंताचा आता मात्र धीर सुटायला लागला होता. गर्दीतून वाट काढत

दोघेही कसेबसे अंगणात पोहोचले आणि ते दृश्य पाहून शेवंताने जिवाच्या आकांताने टाहो फोडला.

''भाऽऽऽऊ हे का केलं रेऽऽऽऽ?''

एखाद्या कठीण काळजाच्या माणसाचाही ऊर फुटावा असेच ते दृश्य.

गळ्यात दोर लटकावून अर्जुन बोरीच्या झाडाला झुलत होता. समोरच १५ फुटांवर अर्जुनची बायको नीलिमा दोन्ही हात पसरून उपडी निपचित पडली होती.

हे दृश्य पाहून भरतला भरून आलं. डोळ्यांतून टपटप आसवे गळाली. हे असे का झाले त्याला कळेना. अर्जुनला गळ्यास फास लटकवून झुलताना पाहून नीलिमा त्याच्या दिशेने धावली असेल आणि धावता धावताच भावनांचा उद्रेक होऊन अचानक हृदयगती थांबल्याने ती तेथेच पोटाच्या भारावर पडून गतप्राण झाली असावी, असा अंदाज त्याला आला; पण अर्जुनचे काय? त्याने असा टोकाचा निर्णय का घ्यावा. अर्जुन तसा वाघासारख्या निधड्या छातीचा. विद्यार्थिदशेपासूनच खूप उन्हाळे-पावसाळे सोसलेला. बिनापुस्तकाने वर्गात आला म्हणून गुरुजीने 'गेट आऊट' म्हणताच ''गुरुजी, मी काही वर्गात बेडबिस्तर घेऊन मुक्कामाला आलेलो नाहीये. पाच वाजले की जाणारच आहे. पण प्रथम मला हे सांगा की पैशांअभावी पुस्तक घेतले नाही हा काय मोठा गुन्हा ठरतो? तुम्ही मला अभ्यासाचे प्रश्न विचारावे, मी उत्तर देऊ शकलो नाही तर अवश्य 'गेट आऊट' होईन; पण पुस्तक नाही म्हणून 'गेट आऊट' हे मी मान्य करणार नाही' असे गुरुजींच्या डोळ्याला डोळे भिडवून सांगणारा अर्जुन आत्महत्या करेल, हे भरतच्या गळी उतरत नव्हतं; पण समोर वास्तव होतं.

''कालच तालुक्याला गेला होता. मुन्नीसाठी शाळेचा ड्रेस आणायला'' अर्जुनचा मित्र श्रीकांत सांगत होता.

''म्हणाला की आडत्याला उसनवार पैसे मागतो; पण त्याने दिलेच नसणार. तो तरी कसा देईन? यंदाचे सर्व पीक त्याला देऊनही कर्ज फिटलेच नव्हते. बँका आणि सावकाराची तर दमडीही चुकता करू शकला नव्हता. दुकानदाराने किराणा तर कधीचाच थांबवलाय. गेल्या वर्षी कोरडा आणि यंदा ओला दुष्काळ.''

अर्जुनला दोनच मुली, मुन्नी मोठी, आठवीत शिकत असलेली आणि शब्दाली लहान, जेमतेम अकरा महिन्यांची.

मुन्नीला ड्रेस एकच. तोच शाळेचा आणि तोच घरी वापरायचा. सातवीची शाळा सुरू झाली तेव्हा घेतलेला. मुन्नीने ड्रेसचे नाव काढले की तिला १५ ऑगस्ट सांगायचा, नंतर दिवाळी सांगायचा. दिवाळी उलटून गेली की २६ जानेवारी सांगायचा असाच नित्यक्रम चालला होता दीड वर्षांपासून आणि एवढे दिवस

निभावूनही नेले; पण आता ड्रेसच्या आयुष्यानेच दगा दिला. विहिरीचे पाणी भरतेवेळी घागर उचलताना चर्रकन उभी रेघ घेऊन छातीवर शर्ट फाटलं. तशी मुन्नी समजदार, सुईदोरा घेऊन तिने लगेच शिवून घेतलं; पण ते शर्ट तिला घराबाहेर पडू देईना. चारचौघीत मिसळू देईना, शाळेतही जाऊ देईना. तेव्हा अर्जुन म्हणाला होता, ''अगं मी नाहीतरी २६ जानेवारीला घेणारच होतो. आता २४ तारखेला तालुक्याला गेलो की आणतोच बघ.''

पण नियतीला हे मंजूर नसावे. सारे प्रयत्न विफल ठरले होते आणि तो तालुक्याहून रिकाम्या हाताने परतला होता.

हे सर्व कळलं आणि भरतचं हृदय भरून आलं. त्याला टाहो फोडावासा वाटला. धाय मोकलून गडाबडा लोळावंसं वाटलं; पण त्याची प्रतिष्ठा आडवी होऊन त्याला तसं करू देईना. क्षणभर त्याला वाटलं की हे सर्व खोट्या प्रतिष्ठेचे बुरखे टराटरा फाडून फेकून द्यावे आणि यथेच्छ रडून घ्यावे, अगदी मन हलके होईस्तोवर; पण त्याने परत एकदा स्वत:ला सावरले. भावनेवर ताबा मिळाल्याचे बघून हळूच श्रीकांतला विचारले, ''शब्दाली कुठाय?''

श्रीकांत काहीच बोलला नाही. बाजूच्या एका खोलीकडे चालायला लागला. शब्दाली... ११ महिन्यांची पोर ती. तिला नर्मदाकाकू मांजरीच्या पिलासोबत खेळवत होत्या. शब्दालीने त्या पिलाच्या मिशा धरल्या की ते पिलू मान हलवायचे आणि मनीम्याऊची मान हलताना पाहून शब्दाली खिदळायची.

हे दृश्य पाहून परत एकदा भरतच्या मनात कालवाकालव झाली. हिला सांगायला हवे की तिच्या डोईवरचे छप्पर उडून गेले आहे, ती अनाथ झाली आहे, पोरकी झाली आहे. आज शब्दाली दोन्ही पंखांनी उघडी पडली आहे. हे कुणीतरी शब्दालीला सांगावे असे त्याला वाटले; पण हे सांगायचे कसे?

शब्दांत सांगावे तर तिचे कान ग्रहण करण्याच्या योग्यतेचे नव्हते. डोळ्यांनी दाखवावे तर दृश्याचे पृथक्करण करून मेंदूस अर्थ पुरवण्याइतपत तिच्या जाणीवा पक्व नव्हत्या. मग तिला श्वसनेंद्रियामार्फत गंधवार्ता तरी कळली असावी का? जडदेहातून प्राण निघून गेला की मग केवळ प्रेतच उरत असते. प्रेताचे वय जसजसे वाढत जाते तसतशी प्रेतातून निघणाऱ्या गंधाची तीव्रताही वाढत जाते आणि त्या गंधाला स्वत:ची अशी एक ओळखही असते. मग तो गंध तरी शब्दालीपर्यंत वार्ता घेऊन आला असेल काय? नाहीच. कारण शब्दालीच्या जाणिवांची क्षमता एकतर या सर्व जाणिवांच्या अलीकडे किंवा पलीकडे तरी असणार. भरतला पुन्हा एकदा भरून आले आणि तो पुटपुटला, 'अरे कुणी तरी तिची आईबाबांसोबत शेवटची भेट करून द्या रे...' आणि आतापर्यंत खिदळत असलेली शब्दाली जोराने रडायला

लागली; पण तिच्या रडण्याचे कारण तिला आईबाबांच्या निधनाची वार्ता कळली म्हणून नव्हते तर भरतने मोठ्याने फोडलेल्या कर्णभेदी टाहोला दचकून घाबरल्यामुळे होते.

'अरे कुणी तरी शब्दालीची आईबाबांसोबत शेवटची भेट करून द्या रे...' असे भरत शब्दांत पुटपुटायला गेला आणि यावेळेस त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडण्याऐवजी एक कर्णभेदी टाहोच बाहेर पडला होता.

■■

# शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर तज्ज्ञांची मुक्ताफळे

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या समस्येवर सध्या बरीच चर्चा आणि ऊहापोह सुरू आहे. या समस्येची उकल करताना अनेक मान्यवरांनी शोधलेली कारणे आणि सुचविलेले उपाय बघितले तर 'शेतकरी मरतोय तर मरू द्या पण त्याच्या आत्महत्येची कारणमीमांसा करणे आणि उपाय सुचविणे बंद करा' अशा स्वरूपाची आत्मक्लेशी प्रतिक्रिया शेतकरी समाजमनात उमटल्याशिवाय राहत नाही. कारण शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या दु:खद वेदनांपेक्षा यांच्या प्रतिक्रिया अधिक वेदनादायी असतात.

शेतकरी आळशी किंवा कामचुकार आहे असे वाटते त्या सर्व मान्यवर तज्ज्ञांनी आयुष्यात एकदातरी सलगपणे काही दिवस शेतकरी समाजासोबत (पाटलाच्या वाड्यात किंवा राजकीय पुढाऱ्याच्या बंगल्यात नव्हे) घालवायला हवेत. त्याखेरीज शेतकरी कशाला म्हणतात, तो कसे जीवन जगतो आणि किती कष्ट करतो याचा अनुभव येणे अशक्य आहे. ४-५ तास किंवा अर्धा-एक दिवस शेतकऱ्याच्या झोपडीत घालवल्याने जर कुणाला शेतकरी समजला असे वाटत असेल तर खुशाल वाटू दे; पण हा देश आपण कोण्या कामचुकार, आळशी, अलायक तज्ज्ञांचा हातात सोपवला असा प्रश्न जर कोण्या ग्यानबाला पडला तर त्याच्याशी वाद घालता येईल, मुजोरीही करता येईल पण त्या ग्यानबाच्या प्रश्नाचे समर्पक निराकरण करता येईल?

झोप, जेवण आणि अन्य शारीरिक विधींसाठी लागणारा काळ सोडला तर उर्वरित वेळात शेतकरी काय करतो? स्विमिंग करायला जातो? क्रिकेट / सिनेमा बघायला जातो? बायकोला घेऊन बागेत फिरायला जातो? बिअरबारवर जातो? बारबालांचे नृत्य बघायला जातो की इतवारी / बुधवारपेठेत फेरफटका मारायला जातो? मान्यवर तज्ज्ञांनी पहिल्यांदा या प्रश्नांचे उत्तर शोधायला हवीत. (आणि जरी या प्रश्नांचे उत्तर होकारार्थी असले तरीही बिघडते कुठे? सर्व सुखांचा भोग घेणारी आमच्यासारखी भोगवादी मंडळी कुठे आत्महत्या करताहेत? आम्ही जिवंतच आहोत की अजून.)

औताच्या बैलाला वर्षातून फक्त १२० ते १४० दिवस तर शेतकऱ्याला मात्र

३६५ दिवस काम करावे लागते, बाप मेला सुट्टी नाही, बापाला तिरडीवर तसाच ठेवून बैलाचे शेणगोटा, चारापाणी करायला जावेच लागते. पोरगा तापाने फणफणत असेल किंवा अगदी गॅस्ट्रो जरी झाला तरीही पेरणी थांबवता येत नाही, हे सत्य तज्ज्ञ मंडळींना कधी कळेल?

तरीही या तज्ज्ञ मंडळींना शेतकरी आळशी आणि कामचुकार दिसत असेल तर त्यांनी खालीलप्रमाणे शास्त्रशुद्ध मार्गाचा अवलंब करून स्वतःची खातरजमा करून घ्यावी.

आत्महत्या झालेल्या शेतकऱ्याच्या घरी जाऊन;

१) प्रेताचे वजन करावे व शारीरिक उंची मोजावी. वजन व उंची यांचा रेशो काढावा. तो डॉक्टरला दाखवावा. मयत व्यक्ती सुदृढ की कुपोषित, कष्टकरी की कामचुकार याविषयी सल्ला घ्यावा.

२) मुखवट्याचा एक क्लोजअप फोटो घ्यावा. त्यावरून मरण्यापूर्वी त्याच्या चेहऱ्यावर काय भाव होते, मरण्यापूर्वी त्याची मानसिक स्थिती काय होती याचा शास्त्रीय दृष्टिकोनातून रिपोर्ट मागवावा.

३) त्याच्या घरातील नेसनीची वस्त्रे, अंथरून-पांघरून, भांडी-कुंडी यांची यादी बनवावी. त्यावरून मयत व्यक्ती काटकसरी की उधळखोर याचा अंदाज काढावा.

४) व्यसनाधीनतेमुळे शेतकरी आत्महत्या करतात असा काहींचा निष्कर्ष आहे. तसे असेल तर तो कोणती दारू पीत होता? गावठी, देशी की इंग्लिश याचा शोध घ्यावा. गावठी, देशी आणि इंग्लिश मद्याचे अनुक्रमे बाजारभाव माहीत करून घ्यावे. (मान्यवरांना गावठी, देशीचे भाव माहीत नसणार) दरडोई येणारा खर्च याचा तुलनात्मक तक्ता/गोषवारा बनवावा. बिगरशेतकरी मद्यप्यांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण आणि शेतकरी मद्यप्यांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण याची आकडेवारी गोळा करून तुलना करावी.

५) अज्ञानामुळे शेतकरी आत्महत्या करतात असा काहींचा निष्कर्ष आहे. तसे असेल तर बिगरशेतकरी पण अज्ञानी अशा अन्य समुदायातील लोक आत्महत्या का करीत नाहीत? किंवा बारामतीचे लोक फारच सज्ञानी आहेत काय?

६) वेडसरपणामुळे शेतकरी आत्महत्या करतात असा काहींचा निष्कर्ष आहे. वेडसर लोक आत्महत्या करतात? कुठले? अमेरिकेतील? ब्रिटनमधील? फ्रांसमधील की पाकिस्तानातील?

७) मनोरोगामुळे शेतकरी आत्महत्या करतात असा काहींचा निष्कर्ष आहे. त्यासाठी गावागावात मानसोपचार शिबिरे आयोजित करावी असे त्यांना वाटते; पण ग्यानबाला हे पटत नाही. एका दाण्यातून शंभर दाण्याच्या निर्मितीचा चमत्कार

घडवणारा व स्वत: अर्धपोटी राहून जगाला पोटभर खाऊ घालणारा शेतकरी मनोरुग्ण कसा काय असू शकतो? कदाचित वैफल्यग्रस्त असू शकतो. मग तो वैफल्यग्रस्त, नाउमेद का झाला याची कारणे शोधावी. ती कारणे सामाजिक की आर्थिक याचाही शोध घ्यावा. शेतात गाळलेला घाम, दामात का परिवर्तित झाला नाही याचाही शोध घ्यावा. याउलट पॅकेजची रक्कम गिळंकृत करणारे राजकीय पुढारी आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला मिळणाऱ्या शासकीय मदतीचा चेक काढण्यासाठी लाच खाणारी नोकरशाही मानसिक विकृतीने ग्रासली असून त्यांच्या भावनिक संवेदना बधीर झाल्या आहेत. तेच खऱ्या अर्थाने मनोरुग्ण असून त्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये, मानसोपचार शिबिरे आयोजित करावीत असे ग्यानबाला वाटते. शेतकऱ्याला आत्महत्या करायला भाग पाडणाऱ्या या व्यवस्थेचे शुद्धीकरण आणि मतपरिवर्तन होणे गरजेचे आहे, ज्याअर्थी शेतीविषयक ध्येय-धोरणांमध्ये मूलभूत बदल होताना दिसत नाहीत त्याअर्थी शेतीविषयक ध्येय-धोरणे आखणाऱ्याकडून शेतकरी आत्महत्यांबद्दल व्यक्त होणारी चिंता हा वरपांगी देखावा आहे. ज्याअर्थी शेतीला न्याय देणारी कृषीविषयक धोरणे आखण्यासाठी लागणारी कणखरता त्यांच्यामध्ये नाही त्याअर्थी तेही मानसिक दुर्बल असावेत असा ग्यानबाचा कयास आहे. त्यासाठी मंत्रालयामध्ये मानसोपचार शिबिरे आयोजित करावी असेही ग्यानबाला वाटते. जे ग्यानबाला उमजते ते या तज्ज्ञांना का उमजू नये? उमजत असेलही कदाचित; परंतु शेतकऱ्याला आत्महत्या करायला भाग पाडणाऱ्या या व्यवस्थेवर उदरनिर्वाह करणारी मंडळी सिंहासनाच्या इच्छेविरुद्ध काही निष्कर्ष काढतील ही अशक्य कोटीतील बाब आहे, असेही ग्यानबाचे स्पष्ट मत आहे.

८) पॅकेजमुळे आत्महत्या थांबत नाहीत, असा काहींचा निष्कर्ष आहे; परंतु ते पॅकेजच्या स्वरूपावर अवलंबून आहे. कॅन्सरच्या रोग्याला पॅरासिटामॉलचे पॅकेज द्यायचे. रोगी बरा झाला नाही अथवा दगावला की रोगी अज्ञानी होता, त्याने औषधे घेण्यात कुचराई केली, असा काहीसा बावळट निष्कर्ष काढण्याचा हा प्रकार आहे. त्याऐवजी पॅकेजच्या मूळ स्वरूपातच गफलत झाली, रोगाचे निदान करण्यात, औषधांची निवड करण्यात चूक झाली हे कबूल करण्यासाठी लागणारी मानसिक औदार्यता आमच्यामध्ये केव्हा येणार हाच खरा लाखमोलाचा प्रश्न आहे.

मान्यवर तज्ज्ञांनी या प्रश्नांची उत्तरे शोधायलाच हवीत. विषयाच्या खोलवर जायला हवे. अभ्यासांती निष्कर्ष काढून सप्रमाण सिद्ध करायला हवे; पण हे होताना दिसत नाही. पूर्वग्रह बाजूला सारून त्रयस्थपणे मुद्द्यांची उकल केल्याखेरीज निर्दोष निष्कर्ष निघू शकत नाही; परंतु बाटली आणि पंचतारांकित संस्कृती वृद्धिंगत झालेल्या तज्ज्ञांना याची गरज भासत नाही. एरवी शेतकरी आत्महत्यासारख्या

संवेदनशील मुद्द्यावर तज्ज्ञांनी येरेगबाळे मतप्रदर्शन करण्यापेक्षा चूप बसणे शेतकऱ्यांसाठी समाधानाचे ठरेल आणि कदाचित शेतकरी आत्महत्यांसारख्या संवेदनशील मुद्द्याची उकल होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्नांच्या प्रारंभाचे तेच पहिले पाऊल ठरेल.

■■

# भोंडला, हादगा, भुलाबाईची गाणी : महिलांच्या व्यथा

बालपणीच्या अशा फारच कमी आठवणी असतात की ज्या माणसाच्या आयुष्यभर सावलीसारख्या सोबत-सोबत चालतात. जीवनाने कितीही रंग बदलले, आचार-विचारांच्या संरचनेत कितीही बदल झाले तरीही त्या आठवणी मात्र वास्तवाचे कायम स्मरण करून देत असतात. एका अर्थाने या आठवणी माणसाला डोळस दृष्टी प्राप्त करून देत असतात आणि सामाजिक जीवनमानाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोनही देत असतात.

माझ्या बालपणीच्या (१९७०-७५) काळात दळणवळणाची साधने एकतर फारशी विकसित झाली नव्हती किंवा ग्रामीण भागापर्यंत पोहोचलेली नव्हती. एखादी मोटरसायकल जरी गावात आली तरी गावातील लहानसहान पोरं मोटरसायकलमागे धावायची. बुजुर्ग मंडळीही घराबाहेर येऊन कुतूहलाने बघायची. त्याकाळी गावातले दळणवळणाचे सर्वांत मोठे विकसित साधन म्हणजे सायकल. सायकलचा वापरही केवळ पुरुषांसाठीच असायचा. पत्नीलासुद्धा सायकलवर बसवणे लाजिरवाणे वाटायचे आणि कुणी जर तसा प्रयत्न केलाच तर ते चेष्टेचा विषय ठरायचे. ग्रामीण जनतेचे दळणवळणाचे एकमेव साधन म्हणजे रेंगीबैल, छकडा, दमनी वगैरे. गावाला जोडणारे पक्के रस्ते उपलब्ध नसल्याने ग्रामीण माणसांचा संचारही मर्यादित असायचा. पावसाळाभर गावाचा संपूर्ण जगाशीच संपर्क तुटायचा असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये.

इलेक्ट्रिक, टेलिफोन किंवा तत्सम साधने गावात अजून पोहोचायची होती. टीव्ही, संगणकाचे नामोनिशाण नव्हते. गावात दिसलाच तर एकटा-दुकटा रेडिओ दिसायचा. गावातील एखादा तरुण नोकरी करायला शहरात गेला की शहरातून गावाकडे परतताना हमखास काखेला रेडिओ लटकावून आणि रस्त्याने गाणी वाजवतच गावात प्रवेश करायचा. लग्नामध्ये हुंडा म्हणून गोफ, घड्याळ, अंगठी, सायकल आणि रेडियो ही वरपक्षाची सर्वांत मोठी मागणी समजली जायची.

स्वाभाविकपणे मनोरंजनाची काहीच साधने उपलब्ध नसल्याने पारंपरिक सण साजरे करून त्यातूनच मनोरंजनाची गरज पूर्ण केली जायची.

जी अवस्था दळणवळण व मनोरंजनाची तीच वैचारिक देवाणघेवाणीची. सभा, मेळावे, परिसंवाद याचे लोण गावापर्यंत पोहोचलेच नव्हते. चालायचे ते केवळ हरिनाम सप्ताह किंवा कीर्तन-प्रवचने. हरिनाम सप्ताह किंवा कीर्तन-प्रवचने या प्रकारातला सर्वात मोठा दोष असा की हे वन-वे ट्रॅफिक असते. त्यात चर्चेला वगैरे काहीच स्थान नसते. एकाने सांगायचे आणि इतरांनी ते भक्तिभावाने श्रवण करायचे. आपल्या सुखदु:खांना व्यक्त करण्याचे व्यासपीठच उपलब्ध नसल्याने ग्रामीण जनतेची केवढी घुसमट होत असावी, याचा अंदाज आता सहज बांधता येऊ शकतो.

पुरुष मंडळींना मारुतीच्या पारावर किंवा चावडीवर बसून निदान गप्पा तरी करता येत होत्या, भावना व्यक्त करायला संधी मिळत होती, पण महिलांचे काय? त्यांना ना पारावर बसून गप्पा मारण्याची अनुमती, ना सुखदु:खाला व्यक्त करण्यासाठी एखादे व्यासपीठ उपलब्ध. त्यामुळेच महिलाप्रधान सण अतिशय जिव्हाळ्याने साजरे केले जात असावेत आणि त्या निमित्ताने ग्रामीण महिला मनोरंजन आणि एकीमेकींचे क्षेमकुशल व्यक्त करण्यासाठी अथवा जाणून घेण्यासाठी या सणांचा वापर व्यासपीठासारखा वापर करून घेत असाव्यात.

अशाच काही महिलाप्रधान सणांपैकी भुलाबाईचा उत्सव हा एक सण. आश्विन शु. १० ते कोजागरी पौर्णिमेपर्यंतचा काळ 'आश्विनच्या भुलाया' म्हणून साजरा केला जातो. काही भागात याला हादगा म्हटले जाते तर काही भागात भोंडला. या काळात मातीच्या बाहुल्या/भुलाया मांडून दररोज नित्यनेमाने गाणी म्हटली जातात, खिरापत वाटली जाते. जसजसा काळ बदलत गेला तसतसे या सणांचे महत्त्वही कमी होत गेले.

पण त्या काळी छोट्या-छोट्या बालिकांपासून जख्खड म्हाताऱ्या महिलासुद्धा यामध्ये गाणी गाण्यासाठी सहभागी होत असायच्या. त्यापैकी काही गाणी ऐकताना माझ्या अंगावर काटा उभा राहायचा तर काही गाणी ऐकून मन खूप-खूप उदास व्हायचे. काही गाणी मनाला चटका लावून जायची तर काही गाणी ऐकताना कुतूहलमिश्रित प्रश्नचिन्ह निर्माण व्हायचे.

**रुणझुण पाखरा जा माझ्या माहेरा**
**माझ्या का माहेरी सोन्याची पायरी**
**त्यावरी बसजो शिदोरी सोडजो**
**माझ्या का मातेला निरोप सांगजो**

**तुझ्या का लेकीला बहू सासुरवास**
**होते तर होऊ दे औंदाच्या मास**
**पुढंदी धाडीन गायीचे कळप**
**पुढंदी धाडीन म्हशीचे कळप**

सोन्याचे मंदिर, सोन्याचा कळस या धर्तीवर घराचे छत सोन्याचे असेल तर ते समजण्यासारखे होते, पण घराला चक्क सोन्याची पायरी? उलगडा व्हायचा नाही म्हणून मग खूप कुतूहल वाटायचे.

भुलाबाईच्या गाण्याला तत्कालीन सामाजिक साहित्याचा आविष्कारच म्हणावे लागेल. साहित्य हा समाजाचा आरसा असतो असे म्हणतात; परंतु थोरामोठ्या कवी/ लेखकांच्या साहित्यात तत्कालीन वास्तव प्रामाणिकपणे उतरलेलेच नसावे. त्या काळात संतकवी देवाला भजण्यात गुंग, त्यांचे बहुतांश काव्यवैभव/प्रतिभा देवाचे गुण गाण्यात खर्ची पडली असावी. कवी हा तर मुळातच कल्पनाविलासात रमणारा प्राणी. वास्तववादी लेखन केले तर आपल्या काव्याला साहित्यिक दर्जा मिळणार नाही, या भयाने पछाडलेला. त्यातल्या त्यात कवी हे बहुतांश पुरुषच. त्यामुळे आपल्या दु:खाला कोणीच वाली नाही हे बघून महिलांचा कोंडमारा झाला असावा. महिलाविश्वाच्या सुखदु:खाचे लेखक, कवी किंवा गीतकारांनी नीट शब्दांकन केले नाही म्हणून आमच्या मायमाउल्या स्वत:च पुढे सरसावल्या असाव्यात आणि कदाचित त्यामुळेच अपरिहार्यपणे महिलांनी प्रस्थापित काव्याला फाटा देऊन स्वत:चे काव्यविश्व स्वत:च तयार केले असावे. कवी, गीतकार आणि संगीतकाराची भूमिका त्यांनीच चोख पार पाडली असावी आणि मग त्यातूनच आकारास आले असावे हादगा, भोंडला, भुलाबाईचे गाणे. या गीतांमध्ये साठवलेली आहेत महिलांची अपार दु:खे. साताजन्माच्या असाहाय्यतेचे कारुण्य स्पष्टपणे प्रतिबिंबित झाली आहे. अबला म्हणून आयुष्य कंठताना वेळोवेळी झालेली कुचंबणा आणि मिळालेली हीनत्वाची वागणूक. त्यासोबतच अधोरेखित झाली आहे अठराविश्वे दारिद्र्य लाभलेल्या संसाराचा गाडा हाकताना झालेली दमछाक व ससेहोलपट, अगदी ठळकपणे.

वरील गीतात आईच्या घराला सोन्याची पायरी आहे असे म्हटले आहे. मग याला काय म्हणावे? कल्पनाविलास की अतिशयोक्ती? माहेरच्या बढाया की वास्तवता? मला मात्र यामध्ये एक भीषण वास्तविकता दिसते. ती सासुरवाशीण जेव्हा सांगावा धाडण्यासाठी त्या पाखराला तिच्या माहेरगावी पाठविण्याचा बेत आखते तेव्हा तिचे माहेरघर पाखराला ओळखता यावे यासाठी तिच्या आईच्या घराची ओळख, खाणाखुणा सांगणे क्रमप्राप्तच ठरते. नेमकी येथेच तिची गोची झाली असावी. तिच्या आईच्या

घराचे कवेलू, छप्पर, भिंती आणि दरवाजे हे नक्कीच सांगण्यायोग्य नसावे. खरं आहे ते सांगण्यासारखं नाही आणि खोटंही बोलायचं नाही अशी स्थिती जेव्हा उद्‌भवते तेव्हा अतिशयोक्तिपूर्ण कथन करून वेळ मारून नेणे हाच तर मनुष्यस्वभाव आहे. जेव्हा एखाद्याकडे सांगण्यासारखे काहीच नसते तेव्हा तो बढाईचा आधार घेत असतो, हेच त्रिकालाबाधित शाश्वत सत्य. मग तिने सोन्याची पायरी सांगितली त्याचा वेगळा अर्थ कसा घेणार?

त्यावरी (पायरीवर) बसजो, शिदोरी सोडजो म्हणजे काय? निरोप घेऊन जाणाऱ्या पाखराला सोबत नेलेली शिदोरीच खाण्यास सांगायला ती विसरत नाही. का? उत्तर अगदी सोपे आहे, पाखराला तातडीने जेवण्याची व्यवस्था आईच्या घरी होऊ शकेल अशी परिस्थिती आईचीही नाही, हे तिला पुरेपूर ठाऊक असावे. तसे नसते तर तिने सोबत शिदोरी कशाला दिली असती? आईचे गाव लांब आहे, तेवढी मजल गाठेपर्यंत रस्त्याने भूक लागेल हा उद्देश असता तर मध्येच वाटेवरच्या एखाद्या विहिरीवर किंवा नदीवर बसून शिदोरी खायला सांगितले असते. आईच्या घरी पोहोचल्यावर पायरीवर बसून सोबतचीच शिदोरी खावी जेणेकरून पाहुणा उपाशी नाही याचे समाधान आईला लाभेल व आईकडे पाहुण्याला तातडीने जेवू घालायची व्यवस्था नसली तरी तिची या फटफजितीपासून सुटका होईल, असा कयास बांधूनच तिने पाखराला नेमकी सूचना दिली, हे उघड आहे.

आता हे गीत बघा. या गीतामध्ये एका सुनेला लागलेली माहेरची ओढ आणि सुनेला जर माहेराला जाऊ दिले तर शेतीत कष्ट करणारे दोन हात कमी होतील, या भीतीने त्रेधातिरपीट उडालेल्या कुटुंबातील उर्वरित सदस्यांची हतबलताच दिसून येत आहे.

नुकतेच लग्न होऊन सासरला नांदायला आलेल्या सुनेला तिच्या माहेरची आठवण होते, आईच्या आठवणीने जीव व्याकुळ झालेला असतो. तिकडे आईलासुद्धा लेकीची आठवण होऊन गहिवरलेले असते. म्हणून मायलेकीची गाठभेठ करून देण्यासाठी बाप लेकीला घेण्यासाठी आलेला असतो. बाप घ्यायला आलेला बघून आनंदाने उल्हसित झालेली सून सासूला हळूच पण भीत भीत विचारते :

**हात जोडूनी पाया पडूनी**
**सासूबाई मी विनविते तुम्हाला**
**बावाजी आले घ्यायाला**
**जाऊ का मी माहेराला, माहेराला?**

माहेराला जायची रीतसर परवानगी सूनबाई मागते आहे हे बघून सासू थोडी

भांबावते. तिच्यासमोर अनेक प्रश्न उभे राहतात. एक तर काही ना काही पैसा लागेलच जो घरात नाहीये. दुसरे असे की शेतीत कष्ट करणारे दोन हात पण कमी होणार. म्हणून ती सुनेला म्हणते :

**कारलीचे बी लाव गं सूनबाई**
**मग जा आपल्या माहेरा, माहेरा**

कारल्याच्या बियाणाची लागवड करून माहेराला जाण्याचा सल्ला सुनेला मनोमन पटतो. ती बिगीबिगी लागवड उरकते आणि पुन्हा सासूला विचारते :

**कारलीचे बी लावलेजी सासूबाई**
**आता तरी धाडा माहेरा, माहेरा**

एक वेळ मारून नेता आली. कारल्याचे बी लावून झाले पण आता पुढे काय? पुन्हा सासूबाई शक्कल लढवते :

**कारलीचा वेल निघू दे गं सूनबाई**
**मग जा आपल्या माहेरा, माहेरा**

सून पुन्हा काही दिवस कळ काढते, बियाणे अंकुरून वेल निघेपर्यंत बियांना पाणी घालते, वेलीचे संवर्धन करते आणि मग वेल निघालेला बघून पुन्हा एकदा आपल्या सासूला विचारती होते :

**कारलीचा वेल निघालाजी सासूबाई**
**आता तरी धाडा माहेरा, माहेरा**

सासूसमोर पुन्हा तोच यक्षप्रश्न. इकडे आड तिकडे विहीर. नाही म्हणता येत नाही आणि पाठवायला गेले तर संसाराचं अर्थशास्त्र कोसळते. कौटिल्याची अर्थनीती कळायला अर्थतज्ज्ञ किंवा अर्थमंत्रीच लागतो या सुशिक्षित समाजातील गोंडस समजुतीला उभा छेद देणारी एका अशिक्षित सासूची वर्तणूक. मग तिथून पुढे नवनवीन युक्त्या लढविणे सासूचा नित्यक्रमच बनून जातो.

**कारलीला फूल लागू दे गं सूनबाई**
**मग जा आपल्या माहेरा, माहेरा**

कारल्याच्या वेलाला फूल लागले की माहेराला जायला मिळणार या आशेने सून मात्र आलेला दिवस पुढे ढकलत असते.

**कारलीला फूल लागलेजी सासूबाई**
**आता तरी धाडा माहेरा, माहेरा**

कारल्याचा वेल मांडवावर गेला, वेल फुलांनी बहरून गेली; पण नशिबाच्या वेलीला बहर येईल तेव्हा ना.

**कारलीला कारले लागू दे गं सूनबाई**
**मग जा आपल्या माहेरा, माहेरा**

आता प्रतीक्षेची घडी संपली. वेलाला कारले लागलेत. आता तरी परवानगी मिळायला हवी की नाही?

**कारलीला कारले लागलेजी सासूबाई**
**आता तरी धाडा माहेरा, माहेरा**

आता कष्ट फळांस आले. वेल पण कारल्याने लदबदून गेली; पण कारली बाजारात नेऊन विकल्याखेरीज पैसा कसा येणार? म्हणून पुन्हा सासू सुनेला अगदी समजावणीच्या स्वरात सांगते.

**कारलीला बाजारा जाऊ दे गं सूनबाई**
**मग जा आपल्या माहेरा, माहेरा**

वेलीला कारली लागली, कारली बाजारात गेली. आता मात्र नक्कीच परवानगी मिळणार अशी सुनेला खात्री आहे, म्हणून ती म्हणते
**कारली बाजारात गेलीजी सासूबाई**
**आता तरी धाडा माहेरा, माहेरा**

कारली बाजारात गेली आहे. शेतीत पिकवलेला माल बाजारात जाणे हा शेतीतील कष्ट फळास येणारा परमोच्च बिंदू. खरे तर हे गीत यापुढे आनंदाच्या क्षणांकडे वळायला हवे. एवढ्या मेहनतीने पिकविलेली कारली बाजारात जाणे हा कष्टाचे फळ पदरात पडण्याचा क्षण. शेतकऱ्याच्या घरात लक्ष्मी येण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शेतीत घाम गाळून पिकविलेला माल विक्रीस जाणे. माल विकायला बाजाराकडे गेलेला घरधनी घराकडे येताना लक्ष्मी घेऊन परतायला हवा. सोबत काही ना काही भातकं, खाऊ वगैरे आणायला हवा; पण इथून पुढे या गीतात तसे काहीच होत नाही. याउलट गीताच्या याच कडव्यापासून गीत विचित्र वळण घेते. निदान आतापर्यंत तरी कुठलाही खाष्टपणा न दाखविणाऱ्या सासूचा स्वभाव इथूनच बदलायला लागतो. आजपर्यंत घरात एकमेकांशी गोडीगुलाबीने वागणारी माणसे आता नैराश्याच्या भावनेतून एकमेकांशी फटकून वागताना दिसत आहेत. घरात चिडचिडेपणा, उदासीनता वाढीस लागलेली दिसत आहे.

नेमकं झालंय तरी काय? कारली मातीमोल भावाने तर नाही खपली ना? की खरेदीला कोणी घेवालच मिळाला नाही? मनुष्यजातीचा स्वभाव त्याच्या आर्थिक स्थितीनुसार बदलत असतो हे समीकरण अर्थतज्ज्ञांच्या अर्थशास्त्रात बसत नसले तरीही तेच सत्य असावे. कारण या गीताचा शेवट नेमके तेच अधोरेखित करून जातो.

आता तरी आपल्याला माहेराला जायला मिळणार की नाही या विचाराने ग्रस्त झालेली सून परत एकदा सासूला विचारती होते. सासूला खुश करण्यासाठी तिला तिच्या आवडीची कारलीची भाजी करून खाऊ घालते.

**कारलीची भाजी केलीजी सासूबाई**
**आता तरी धाडा माहेरा, माहेरा**

पण आता आर्थिक विवंचनेने ग्रासलेल्या घरातली सारी कहाणीच बदललेली असते. परिस्थितीसमोर निरुत्तर झालेली सासू चक्क सुनेसोबत त्रोटक स्वरूपात बोलायला लागते. तिची भाषा बदलते, भाषेची ढब बदलते आणि शब्दफेकीची तऱ्हाही बदलते.

**मला काय पुसते, बरीच दिसते**
**पूस आपल्या सासऱ्याला, सासऱ्याला**

अगं सूनबाई, माझी ना नाही पण एक शब्द मामंजीला विचारून घे ना, असे म्हटले असते तर ते समजण्यासारखे होते; पण सासूची आता तशी सहज आणि सौहार्दपूर्ण भाषाच बदललेली दिसत आहे. कारण 'मला काय पुसते, बरीच दिसते' हे वाक्य वाटते तेवढे सहज नाही. या वाक्यात उद्वेग, उबग, क्लेश, चिडचिड, ग्लानी आणि फटकळपणा ठासून भरला आहे.

सासऱ्याकडूनच परवानगी घ्यायची होती तर इतके दिवस तुम्ही कशाला बहाणे सांगत राहिलात असा प्रतिसवाल सून करीत नाही. सासूची इच्छा प्रमाण मानून सून आता सासऱ्याला विचारायला जाते.

**मामाजी, मामाजी बाबा आले न्यायाला**
**जाऊ का जी माहेरा, माहेरा**

पण सासरा तरी वेगळं बोलणार? सुनेला माहेरी पाठवायचे म्हणजे निदान तिला जाण्यापुरता तरी घरात पैसा असावा की नाही? नसणारच. म्हणून तोही आपल्यावरची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलून मोकळा होतो.

**मला काय पुसते, बरीच दिसते**
**पूस आपल्या नवऱ्याला, नवऱ्याला**

आता शेवटचा पर्याय. तिची माहेराला जाण्याची हक्काची मागणी कोणीच समजून घेतली नाही; पण आता परवानगी देण्याचा अधिकार थेट नवऱ्याच्याच हातात आला आहे. तिच्या व्याकुळतेची तीव्रता नवऱ्याला तरी नक्कीच कळलेली असणार असे तिला वाटते. तिला खात्री आहे की आता नक्कीच जायला मिळणार. एवढ्याच आशेपायी ती नवऱ्याला विचारायला जाते.

**स्वामीजी, स्वामीजी बाबा आले न्यायाला**
**जाऊ का जी माहेरा, माहेरा**

पण प्राणप्रियेच्या प्रश्नाला नवरा उत्तरच देत नाही. नवरा काय म्हणतो हे गीतात लिहिलेच नाही. गीताचा दोन ओळीत थेट शेवटच करून टाकला आहे.

**घेतलीय लाठी, हाणलीय पाठी,**
**तुला मोठं माहेर आठवते, आठवते!!**

पीएच.डी., डी.लिट मिळवून किंवा वेद,पुराण, कुराण, बायबल, कौटिल्य किंवा हजारो पानांचे अर्थशास्त्राचे पुस्तक वाचूनही जेवढे गाव, गरिबी आणि शेतीचे अर्थशास्त्र समजून घेता येत नाही त्यापेक्षा जास्त वास्तववादी अर्थशास्त्र या एका गीतात सामावले आहे, याची मला खात्री आहे.

■■

# भुलाबाईची गाणी : ग्रामीण संस्कृतीचे वास्तवदर्शन

भुलाबाईची गाणी तत्कालीन सामाजिक संस्कृतीचे दर्शन घडवितात. काही गाणी सामाजिक आणि आर्थिक शोषणाला नकळतपणे प्रतिबिंबित करून जातात. या गीतांचे गेयता आणि आशय हीच बलस्थान असल्याने त्यात रचनाशैली, खोटा समाजाभिमुख बेगडीपणा, अलंकारिक शब्दरचना वगैरे कृत्रिमरीत्या अनावश्यकपणे घुसडण्याची त्या महिला गीतरचनाकारांना गरजच भासलेली दिसत नाही. मिरची-मसाला न वापरता आहे तेच वास्तव शब्दांत उतरविण्याचा प्रयत्न केल्यानेच या गीतांना अस्सल अभिजातपणा आलेला आहे आणि म्हणूनच त्यात ग्रामीण जीवन आणि ग्राम संस्कृतीचे अनेक पदर सहजपणे प्रतिबिंबित झालेले आहेत. हे गीत बघा.

वैदुदादा, वैदुदादा घरावरी चाल गा, चाल गा
बुढ्याचे मचले हाल गा, हाल गा
माही (माझी) सासू म्हणते गा, म्हणते गा
तुले खुट्याची म्हैस देते गा, देते गा.

घरात म्हातारा सासरा आजारी पडलाय म्हणून वैद्याला बोलवताना त्याला उपचाराची फी म्हणून चक्क खुंट्याची म्हैस देण्याचा वायदा करणे म्हणजे काय? नगदी फी का देऊ नये? शिवाय वैद्याची फी आणि म्हशीची किंमत यात खूपच तफावत आहे. या गीताचे दोन अर्थ निघू शकतात.

खिशात रोकड नसली आणि एखादी वस्तू उधार मागायची म्हटले तर थेट तसे उधार न मागता आडवळणाने मागणी प्रस्तुत करायची एक पद्धत आहे. ती आजतागायत वापरातसुद्धा आहे. शेतकऱ्याच्या घरात वर्षातून एकदाच पैसा येत असल्याने व खर्च मात्र वर्षभर करावे लागत असल्याने त्याच्या उधारीचा प्रकारही दीर्घ मुदतीचा असतो. स्वाभाविकपणे वैद्य वगैरे एक वर्षाच्या उधारीवर औषधोपचार

करायला सहजासहजी तयार होत नसावेत. म्हणून गरजेपोटी म्हैस देऊन किंवा म्हैस देण्याची भाषा करून उधारीवर औषधोपचार करून घेणे ही अपरिहार्यता असावी, हे स्पष्ट आहे.

दुसरा अर्थ असाही निघतो की, सासऱ्याचा जीव वाचविण्याच्या बदल्यात वैद्याला म्हैस देण्याची भाषा सासू-सुनेने स्वेच्छेनेच केली असावी. शेतकऱ्याला बळीराजा म्हणतात, कारण बळीराजाच्या दानशूरपणाचा गुण शेतकऱ्याच्या रक्तामांसात पुरेपूर भिनलेला आहे. आजही शेतकरी समाजाएवढे दानशूर दुसरे कोणीच नाही. अन्नदानाच्या बाबतीत आजही शेतकरी समाज सर्वात पुढे आहे. गणेशस्थापना, महालक्ष्मी स्थापना, माऊंदे, बारसे, लग्नकार्य, व्रतांचे उद्यापन या निमित्ताने शेतकऱ्यांच्या अंगणात जेवढ्या पंगती बसतात, तेवढे अन्नदान अन्य कोणत्याच समाजात होत नाही, ही वास्तविकता आहे. वर्षभर घरात चटणी-भाकर खायची पण अन्नदान करताना इतरांना वरण-भात-भाजी-पोळी खाऊ घालायची हा शेतकरी समाजाचा धर्मच बनला आहे. ही वृत्ती चांगली की वाईट हा स्वतंत्र वादाचा विषय असू शकेल पण शेतकरी माणसापेक्षा पन्नास पटीने अधिक मिळविणारी बिगर शेतकरी मंडळी आपली संपूर्ण मिळकत स्वत:पुरत्या मर्यादित प्रपंचातच खर्च करीत असते. स्वत: फारसे दान वगैरे करीत नाहीत आणि शेतकरी करतो त्याचे कौतुकही करीत नाहीत, याउलट शेतकरी उधळखोर असल्याने कर्जबाजारी होतो असा शेरा मारून मोकळे होतात.

शेतकऱ्यांमधील दानशूरपणाची परंपरा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. शेतकऱ्यांच्या घरी येणारा पाहुणा कधीच उपाशी जात नाही. चहा-सुपारीवर पाहुण्याची बोळवण करणे अजूनही शेतकऱ्याला जमलेच नाही. अर्धा लाख मासिक मिळकत मिळवूनही भिकाऱ्याच्या ताटात चार आणे टाकण्यासाठी का-कू करणे किंवा त्याऐवजी भिकाऱ्याला दुनियाभराची अक्कल शिकवत सुटणाऱ्यांच्या या देशात आजही शेतकऱ्याच्या दारात भिक्षेकरी गेला तर त्याच्या झोळीत अगदीच सहजपणे शेर-दोन शेर धान्य पडतच असते. स्वेच्छेने लोकवर्गणी देऊन गावात एखादा सार्वजनिक उत्सव साजरा करणे त्याच्या अंगवळणीच पडले आहे.

विनोबांच्या भूदान यज्ञात शेतजमीन दान करण्याची हिंमत शेतकऱ्यांनी दाखविली आहे. जनावरे (मुख्यत: गाय) दान करण्याची फार जुनी परंपरा आहे. काही काळापूर्वी झाडेसुद्धा दान दिली जात. आजही महसूल खात्याच्या नोंदी तपासल्या तर शेतीची मालकी एकाची आणि त्याच शेतातील झाडाची कायदेशीर मालकी दुसऱ्यांची असे प्रकार आढळतात.

शहरातील मनुष्य जर खेड्यात शेतकऱ्याकडे आला तर येताना सोबत रिकामी

पिशवी घेऊन येतो. तरीही शेतकरी अगदी आनंदाने चिंच, बोर, आंबे, संत्री, केळी, वांगी, मिरची, टमाटे, कोबी यापैकी त्याच्याकडे जे उपलब्ध असेल त्या वस्तूंनी ती रिकामी पिशवी भरून देतो. त्याचा तो कधीच मोबदला घेत नाही कारण रिकामी पिशवी घेऊन येणारा कधी मोबदला देतच नाही. मला अगदी बालपणापासून पडलेला प्रश्न असा की हे वन-वे ट्रॅफिक का? शहरी माणसाला शेतकऱ्यांकडून ताजा भाजीपाला, फुले-फळे प्रेमाच्या नात्याखातर विनामूल्य घेऊन जावे असे वाटत असेल तर त्यात गैर काहीच नाही; पण येताना तो पिशवी रिकामीच का घेऊन येतो? शहरामध्ये असे अनेक पदार्थ असतात की जे शेतकऱ्यांनी कधीच पाहिलेले किंवा खाल्लेले नसतात. बालुशाही, बर्फी, चमचम, रसगुल्ला, फरसाण वगैरे तर लहानसहान शहरातही उपलब्ध असतात. मग शहराकडून खेड्याकडे येणारी पिशवी हमखास रिकामीच का असते? ज्याला इकडून काहीतरी घेऊन जायची सुबुद्धी असते त्याला तिकडूनही काहीतरी घेऊन येण्याची देव सद्‌बुद्धी का देत नाही? शेतकऱ्यांनी हे पदार्थ खाणे त्यांच्या प्रकृतीला हानिकारक असते काय? की शेतकऱ्यांना हे पदार्थ पचतच नाही, खाल्ले तर शेतकऱ्याला ओकाऱ्या होतील असे शहरी माणसाला वाटते? बरे या एकतर्फी प्रेमाचे समीकरण शेतकऱ्याच्या लक्षात येत नसेल काय? बहुतेक नाहीच. कारण पाहुण्याची पिशवी भरून देताना त्याच्या चेहऱ्यावर जे समाधान उमटते ते काही औरच असते. त्याची नैसर्गिक दातृत्व वृती अधोरेखित करणारे असते.

वरील गीताचा समीक्षणात्मक अंगाने विचार केल्यास या गीतात गेयता, यमक आणि आशय वगळता अलंकार, उपमा, लेखनकौशल्य वगैरे फारसे आढळणार नाही पण आशयगर्भिता हेच या गीताचे बलस्थान आहे. चार ओळीच्या या गीतातील शब्दयोजना अत्यंत समर्पक व नेमकी असून दोनशे पानांचे पुस्तक लिहूनही जो आशय नेमकेपणाने व्यक्त करणे कठीण जाईल, एवढा प्रचंड आशय या गीतात ठासून भरला आहे.

मचने हा शब्द सध्या प्रमाणभाषेत वापरला जात नाही आणि मचणे या शब्दाचा नेमका अर्थ व छटा प्रकट करणारा दुसरा पर्यायी शब्द प्रमाणभाषेत उपलब्ध नाही. मर्यादित शब्दात गेयता राखून अमर्याद आशय व्यक्त करायचा असेल तर मचणे या शब्दासारखे शब्द भाषेत असणे अत्यंत आवश्यक आहे आणि मोजक्या शब्दात बरेच काही व्यक्त करणारे शब्द असल्याखेरीज कोणत्याही भाषेला भाषासमृद्धी येऊ शकत नाही, हेही लक्षात घेणे तितकेच गरजेचे आहे.

'बुढ्याचे मचले हाल' याचा अर्थ वयाने म्हातारपणाकडे झुकलेल्या सासऱ्याला काहीतरी भयानक बिमारी झाली आहे. त्याच्या शरीरात उठणाऱ्या कळा आणि

आत्यंतिक वेदनांमुळे तो विव्हळत, तळमळत किंवा तडफडत आहे असा होतो.

जेथे मला अर्थ लिहायला दोन वाक्ये व बावीस शब्द वापरावे लागले व पद्याचे गद्य झाले तेथे तेवढाच आशय या गीतामध्ये 'बुढ्याचे मचले हाल' या तीनच शब्दांत व्यक्त झालाय आणि गेयताही निर्माण झाली. हे शक्य झाले ते केवळ मचले या शब्दाच्या वापरामुळे.

गीतामध्ये वैद्यबुवाला घरावरी म्हणजे घरापर्यंत चाल असे म्हटलेले आहे, घरी ये असे म्हटलेले नाही. घरी ये असे म्हणण्यामध्ये औषधोपचार करण्यासाठी घरी ये असा अभिनिवेश असतो.

मात्र घरापर्यंत चाल याचा वेगळा अर्थ लागतो. खरे तर पेशंटला जेवढी वैद्याची गरज असते तितकीच किंवा त्यापेक्षाही जास्त गरज पापी पेट का सवाल है या न्यायाने वैद्याला पेशंटची असायला हवी. ज्या घरात आजारी व्यक्ती आहे ते घर जर ऐश्वर्यसंपन्न आणि आर्थिक सुदृढ असेल तर उपचारासाठी बोलावताना वैद्याची मिनतवारी करायची गरज भासूच नये. कर्तव्यदक्षता किंवा पैशांचा मोह या दोन कारणांपैकी निदान एका कारणाने तरी वैद्याने आजारी माणसाच्या घराकडे पळतच सुटायला हवे; पण या गीतातील आशयाचा मामला जरा वेगळा आहे. या म्हाताऱ्याच्या घरची आर्थिक स्थिती वैद्याला माहीत असणार म्हणून तो चालढकल करीत असावा. म्हणून सून जे म्हणते त्याचा अर्थ असा की,

हे वैद्यराजा, तू मला माझ्या थोरल्या दादासारखा आहेस. तू केवळ माझ्या घरापर्यंत चल. उधारीवर उपचार करायचे किंवा नाही याचा निर्णय तू नंतर घे, मला खात्री आहे की तू घरापर्यंत आलास तर माझ्या सासऱ्याच्या वेदना पाहून तुझे अंत:करण नक्कीच द्रवेल. समोरचे दृश्य बघून व्यावसायिक विचार बाजूला पडेल. उधार की नगदी यापेक्षा पेशंट व वैद्य यांच्यातील नात्याची आठवण तुला होऊन तुझ्यातला वैद्य जागा होईल. म्हणून तू इथून ऊठ, फक्त माझ्या घरापर्यंत चल आणि एक नजर माझ्या सासऱ्यावर टाक.

या चार ओळीच्या गीताची नायिका सून आहे. सामाजिक भान हरवलेल्या एखाद्या साहित्यश्रेष्ठ कवीने ही कविता लिहायला घेतली असती तर आजारी सासरा आहे मग वैद्याला बोलवायला सासूच जाऊ शकते, सुनेसाठी कवितेत स्थानच निर्माण होत नाही असे गृहीत धरून सासूलाच नायिका बनविले असते; पण या गीतात तसे झाले नाही. सून-सासू-सासरा या नात्याच्या उदात्तीकरणाचा प्रयत्न येथे झालेला दिसतो. या घरातली सून ''सासरा माझा कुरकूर करे, तिकडेच मरू दे त्याले, भवानी आई रोडगा वाहीन तुले'' असे म्हणणाऱ्यांपैकी नक्कीच नाही. सासऱ्याचे दु:ख पाहून व्याकुळ होणारी आहे. म्हाताऱ्याच्या उपचारासाठी खुंट्याची म्हैस देऊन टाकू म्हणणाऱ्या

सासूचे ती समर्थन करते. सासू सासऱ्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखविणाऱ्या उच्चभ्रू सभ्य संस्कृतीचा तिला वारा लागलेला दिसत नाही.

खुंट्याची म्हैस देणे हेसुद्धा आशयगर्भ वाक्य आहे. तुकारामांनी भले आम्ही देऊ कासेची लंगोटी' असे म्हटले. कासेची न म्हणता नुसतीच लंगोटी देऊ म्हटले असते तर त्याचा अर्थ परिणामकारकतेने प्रकट झालाच नसता तसे म्हैस देणे आणि खुंट्याची म्हैस देणे यातही फरक आहे. म्हैस देतो म्हणणे याचा अर्थ अनेक म्हशींपैकी एक देतो, असा निघू शकला असता; पण खुंट्याची म्हैस देतो याचा अर्थ खुंट्याला असलेली एकमेव म्हैस असाच घ्यावा लागेल. अशा परिस्थितीत खुंट्याची म्हैस देण्याची भाषा दानशूर वृत्ती किंवा आत्यंतिक विवशता या दोनपैकी निदान एक तरी कारण स्पष्टपणे अधोरेखित करून जाते.

या चार ओळींच्या गीतातील एकेक शब्द तोलून-मापून वापरलेला दिसत आहे. नेमक्या शब्दप्रयोगामुळे मर्यादित शब्दामध्ये अमर्याद आशय गुंफणारे कवित्व अशिक्षित ग्रामीण महिलांनी गेयस्वरूपात कवन केले आहे; पण या भुलाबाईच्या गीतांकडे साहित्यक्षेत्राने कधीच गंभीरतेने पाहिलेले दिसत नाही. ग्रामीण अशिक्षित जनजीवनामध्येही तोलामोलाचे काव्य रचण्याचे अंगभूत कौशल्य असू शकते, भुलाबाईंची गाणीसुद्धा साहित्यक्षेत्राला मार्गदर्शक ठरू शकतात असे गृहीत धरून जर काव्यजगताची पुढील वाटचाल झाली असती तर मूठभर आशय व्यक्त करण्यासाठी ढीगभर शब्दांचे मनोरे रचून गेयता गमाविलेल्या गद्य स्वरूपातील निबंधांना कविता म्हणण्याचा प्रघातच पडला नसता. कवितेने सामाजिक बांधिलकी जपली असती तर कवीही स्वत:च्या एकलकोंड्या मानसिकतेतून बाहेर येऊन समाजाशी एकरूप झाला असता. कवितेला जनसामान्यांच्या सुखदु:खाची किनार लाभली असती तर कविता आम जनतेच्या भावविश्वाशी समरस झाली असती. आहे ते वास्तव साकारण्याचा प्रयत्न झाला असता तर कवितेच्या विषयांमध्ये विविधता आली असती व काव्य लोकाभिमुख झाले असते आणि जर असे झाले असते तर कवी आणि कविता हा चेष्टेचा व उपहासाचा विषय नक्कीच झाला नसता अशी आता माझी खात्री पटायला लागली आहे.

■■

# गाय, वाघ आणि स्त्री

मुंबईच्या अभिव्यक्ती ग्रंथ न्यास या संस्थेतर्फे नुकताच 'गझल : सुरेश भटांनंतर' हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. अभिव्यक्ती ग्रंथ न्यास ही समग्र मराठी गझलेच्या उत्कर्षासाठी झटणारी जनमान्यता पावलेली संस्था. कविवर्य स्व. सुरेश भटांनंतर जे गझलकार झाले त्यांच्या निवडक गझलांचा या ग्रंथात समावेश करण्यात आला असून या ग्रंथात माझ्या तीन गझलांचासुद्धा समावेश करण्यात आलेला आहे. मी गझल लिहायला लागल्यापासून आजपर्यंत काही दिग्गज गझलकारांनी 'मी गझलेमध्ये जसा आशय व्यक्त करतो, तो गझलियतशी मेळ खात नाही' असे म्हणून माझ्या गझलेला कमी लेखण्याचा जो प्रकार केला, त्या पार्श्वभूमीवर माझ्या गझलांचा या संग्रहात समावेश झाल्याने माझ्या गझलेतील ग्रामीण आशयाला जनमान्यतेची अधिकृत पावतीच मिळाली आहे.

दोन वर्षांपूर्वी मराठी गझल या काव्यप्रकाराशी माझी पहिल्यांदा ओळख झाली. कवितेपेक्षा गझल हा काव्यप्रकार पूर्णपणे भिन्न असतो. लयबद्धता हा गझलेचा प्राण असतो. तंत्रशुद्धतेच्या चौकटी काटेकोरपणे सांभाळूनच गझल जन्माला येते. मुक्तछंद किंवा छंदमुक्ततेला गझलेत काहीही स्थान नसते. वेगवेगळ्या तऱ्हेचे पाचपेक्षा जास्त विषय एकाच रचनेत प्रभावीपणे हाताळण्यासाठी गझलेसारखा दुसरा पर्याय असूच शकत नाही. या गोष्टी माझ्यावर एवढा मोठा प्रभाव पाडून गेल्या की मला गझल या काव्यप्रकाराचे अक्षरश: वेड लागले आणि मी गझलेच्या प्रेमात पडलो.

गझल लिहिणे हे थोडे कलाकुसरीचेच काम असते. काव्य स्फुरले तर कविता लिहिली जाऊ शकते, गझल लिहिली जाऊ शकत नाही. गझल हा तसा कृत्रिमरीत्या काव्य हाताळण्याचा प्रकार आहे. स्फूर्तीमुळे एखाद्या लयबद्ध शेराची किंवा मतल्याची निर्मिती होऊ शकेल; पण उर्वरित चार किंवा त्यापेक्षा जास्त शेर मात्र मतल्यात निश्चित झालेल्या जमिनीला म्हणजे बहर (वृत्त), काफ़िया (यमक) आणि रदीफ (अंत्ययमक) अनुसरून जाणीवपूर्वकच रचावे लागतात. मी तसा गझलेचा अभ्यासक किंवा फारसा वाचकही नाही; पण ज्या काही गझला माझ्या वाचण्यात आल्या त्यात

ग्रामीण सुखदु:खाचे पदर असलेली गझल मला आढळलीच नाही. शेती आणि शेतकरी या शब्दांचा गझलेशी दुरान्वयानेही संबंध मला तेव्हाही आढळला नाही, आजही आढळत नाही. अरबीतून फारसीत व फारसीतून उर्दू भाषेत दाखल झालेला हा काव्यप्रकार आता सर्वच भारतीय भाषांत दाखल होऊ पाहत आहे. मराठी भाषेतही गझल हा काव्यप्रकार बऱ्यापैकी रुजलेला आहे. सर्वसाधारणपणे 'शराब आणि शबाब' याविषयाभोवतीच पिंगा घालणाऱ्या पारंपरिक गझलेला मराठी गझलेने फाटा देऊन सामाजिक आशयाची झालर दिली असली तरीसुद्धा विशिष्ट साचेबंद आशयाच्या बाहेर पडून मराठी मातीचा सुगंध पुलकित करणाऱ्या आशयाकडे झेप घ्यायची उत्कंठा मराठी गझलेत अजूनही जागृत झाल्याचे जाणवत नाही. ज्या देशातला बहुसंख्य समाज अनादीकाळापासून शेती याच एकमेव व्यवसायावर गुजराण करीत असला आणि स्वत: अर्धपोटी राहून इतरांना पोटभर जेवू घालत असला तरी शेतीक्षेत्राचे वास्तववादी चित्र प्रतिबिंबित करण्यात जिथे संपूर्ण साहित्यक्षेत्रानेच शेतीक्षेत्राची उपेक्षा केली तिथे नवख्या मराठी गझलेला दोष देण्यात अर्थ नसला तरी या दिशेने पाऊल टाकण्याचे प्रयत्न न होणे, ही मात्र साहित्यक्षेत्राला फारशी शोभादायक बाब खचितच नाही. गझलेला शेतीच्या बांधावर आणून सोडायचे असेल तर त्यासाठी कोणीतरी गझलकार पुढाकार घेईल याची वाट पाहत बसण्यापेक्षा आपणच गझल लिहिण्याचा प्रयत्न का करू नये? अशी माझी भावना झाली आणि मी गझल लिहायचे ठरवले.

मी गझल लिहायचे ठरविले तेव्हा तंत्रशुद्धता आत्मसात करणे ही अभ्यासाने साध्य करण्यासारखी बाब आहे, याची मला जाणीव होती. मुख्य प्रश्न होता आशयाचा. अलंकारिक भाषेत शारीरिक प्रेमभाव व्यक्त करण्यासाठी गझल लिहिणे हा माझा प्रांत नव्हता. तरुण, तरुणी, प्रेमरस, प्रेमभंग किंवा तिचा गजरा, तिच्या नजरा, तिचे चालणे, नटणे, लचकणे, गालावर खळी पडणे या विषयावर एवढ्या गझला लिहिल्या गेल्या आहेत की मी आणखी पुन्हा याच विषयावर गझल लिहावी असे मला वाटत नाही. आधीच कुण्यातरी गझलकाराने लिहिलेल्या ओळींची मोडतोड करून किंवा शब्दांची अदलाबदल करून शेर किंवा गझल रचायची आणि ती आपल्या नावावर खपविण्यासाठी लागणाऱ्या वृत्तीची माझ्याकडे वानवा आहे. शिवाय शेती आणि ग्रामीण जीवन हाताळता येत नसेल तर गझल लिहायची हौस तरी कशासाठी बाळगायची? हा मला पडलेला प्रश्न.

गझलेतील लयबद्धता, वृत्ताची हाताळणी, यमकाचे नादमाधुर्य आणि एकाच गझलेत पाचपेक्षा जास्त वेगवेगळे विषय हाताळायची संधी, हे गझलेने मला वेड लावण्याचे मुख्य कारण होते. त्यामुळे गझल लिहिण्याचा मोह काही केल्या

टाळताही येईना. शेवटी ठरले की आपण जे काही लिहायचे, ते शेती विषयाला अनुसरूनच लिहायचे. गझलेतील आशयाच्या प्रांतातसुद्धा चिरयौवनी ललनेचे मोहक डोळे किंवा शरीरसौंदर्य प्रकट करणाऱ्या अवयवांऐवजी आपल्याच शेतातील वांगे, टमाटे, आंबे, चिकू, पेरू, गाय, बैल, वासरू इत्यादींना सोबत घेऊन गझलेच्या प्रांतात शिरायचे. निर्णय झाला आणि लेखणी उचलली. पहिल्याच प्रयत्नात थोडीशी सूट घेतलेली आनंदकंद या वृत्तातील माझी पहिलीवहिली गझल आकारास आली....

गायीस अभय देण्या, वाघास दात नाही
रजनीस जोजविण्या, सूर्यास हात नाही.

फुलल्या फुलास नाही, थोडी तमा कळींची
एका स्वरात गाणे, साथीत गात नाही.

रंगात तू गुलाबी, रूपात का भुलावे
वांग्या तुझ्या चवीला, मुंगूस खात नाही.

खांद्यास नांगराचा का भार सोसवेना?
प्राशू नको विषा रे, देहास कात नाही

अभयात वाढलेली, वाचाळ राजसत्ता
राजा पहुडलेला, राजत्व ज्ञात नाही.

ही गझल सहा संकेतस्थळांवर प्रकाशित केल्यावर रसिकांकडून जोरदार स्वागत झाले. पहिलीच गझलरचना असल्याने कौतुकही झाले; पण दबक्या आवाजात का होईना, भाषाशुद्धता व तंत्रशुद्धतेतील दोन निकष पाळले गेले नसल्याची खंतही व्यक्त झाली. देण्या ऐवजी देण्यास आणि जोजविण्या ऐवजी जोजविण्यास असे असायला हवे होते आणि तसे केले तर वृत्त बिघडणार होते. दुसरा मुख्य नियम असा की मतल्याच्या किंवा शेराच्या पहिल्या ओळीत विषयाची प्रस्तावना व दुसऱ्या ओळीत पहिल्या ओळीत जी प्रस्तावना व्यक्त झाली असेल तिचा प्रभावी समारोप असायला हवा. शेरातील दोन ओळींचा परस्पर संबंध असायलाच हवा. त्यामुळे

गायीस अभय देण्या, वाघास दात नाही
रजनीस जोजविण्या, सूर्यास हात नाही.

हा मतला डोक्यावरून गेल्याच्या किंवा काहीही अर्थच लागत नसल्याच्या

प्रतिक्रिया उमटल्या. त्या निमित्ताने थोडक्यात या मतल्यामागची पार्श्वभूमी उलगडण्याचा मी प्रयत्न केला. माझ्या मते त्या मतल्याचा अर्थ खालीलप्रमाणे असू शकतो.

बाईत आणि गायीत मला नेहमीच एक साम्य आढळत आले आहे.

दोघीही शारीरिक अंगाने अबलाच. स्वबळावर स्वसंरक्षणास असमर्थ.

निसर्गाने सर्व सजीवांना नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत स्वबळावर स्वसंरक्षण करून प्राण वाचविण्यासाठी काही जन्मजात हत्यारे आणि ढाली दिल्या आहेत. उदाहरणार्थ, उंदराला बिळात घुसता येते, मांजरीला बिळात घुसता येत नाही. त्यामुळे उंदराचे रक्षण होते. याच अर्थाने मांजरीला झाडावर चढता येते, कुत्र्याला झाडावर चढता येत नाही. या झाल्या उंदीर आणि मांजरीच्या स्वसंरक्षणाच्या ढाली.

आपले दात आणि नखांचा वापर करून कौशल्याने अन्न मिळविण्यासाठी उपयोग करणे हे झाले उंदराचे हत्यार. त्याचप्रमाणे मांजर शिकार मिळविण्यासाठी ज्या ज्या अवयवांचा वापर करते ते झाले मांजरीचे हत्यार.

मुद्दा अधिक स्पष्ट होण्यासाठी २-३ उदाहरणे बघूया.

हरणाला वाघ-सिंहापेक्षा आणि सशाला त्याच्या शत्रूपेक्षा अधिक वेगाने पळता येते. माकडाला झाडावर चढता येते. मोराला बचावापुरते उडता येते. मुद्दा एवढाच की बचावासाठी सजीवाकडे नैसर्गिकरीत्या हत्यार / ढाल / कौशल्य यापैकी काहीतरी नक्कीच आहे.

मात्र मानव आणि त्याचे बहुतेक पाळीव प्राणी यांच्याकडे निसर्गत: यापैकी काहीही नाही. निदान मानवाकडे बुद्धी आणि साधने बनविण्याची कला तरी आहे. मानवाने बुद्धीचा वापर करून साधने बनविली आणि त्या साधनांचा हत्यारासारखा उपयोग करून संपूर्ण सजीव सृष्टीवर हुकुमत मिळविली. हातात साधन नसेल तर मानवाएवढा दुर्बल कोणीच नाही. विनाहत्याराने मनुष्य साध्या मधमाशीसोबतसुद्धा लढू शकत नाही. साधनविरहीत माणसाला कावळासुद्धा पराजित करू शकेल.

पण गायीचे काय? गाय पूर्णत: संरक्षणासाठी मानवावर अवलंबून. कल्पना करा, (कल्पना काय फक्त कवींनीच करायच्या? आणि रसिकांनी फक्त टाळ्या वाजवायच्या?) जर उद्या मानवाला गाय निरुपयोगाची आणि परवडेनाशी वाटली तर माणूस गायीचा त्याग करणार. कारण नकोशा गोष्टीचा बिनदिक्कत त्याग करणे हा मूलभूत मानवी स्वभावच.

गायीवरचे प्रेम, भूतदया वगैरे दिखावाच. जर तसे नसते तर गाय फक्त शेतकऱ्यांच्याच दारात नसती दिसली. कलेक्टर, मंत्रालय, राजकीय पक्षांची कार्यालये वगैरे ठिकाणी गाय बांधलेली आढळली असती आणि सकाळी उठून कलेक्टर शेण सावडताना

आणि मुख्यमंत्री दूध काढताना आढळले असते.

मग नकोशा गोष्टीचा बिनदिक्कत त्याग करणे हा मूलभूत मानवी स्वभाव असलेल्या माणसाने गायी पाळणे बंद केले तर काय होईल? गायीचे काय होईल? वाढत्या यांत्रिकीकरणाने बैलांची गरज संपत चाललेली. दुधाच्या किंमती आवाक्यात आहे तोपर्यंत ग्राहक दूध पिणार.

यदाकदाचित दुधाचे भाव ५०० रु. प्रतिलिटर झाले तर निव्वळ गायीच्या प्रेमापोटी दूध खरेदी करणाऱ्या ग्राहकांची संख्या किती होईल?

जर अशी स्थिती उद्‌भवली की दूधाचा खप कमी झाला आणि दुधाचा धंदा न परवडणारा झाला तर कोणी कशाला गायी पाळतील? मग अशा विपरीत परिस्थितीत माणूस गायीचा त्याग करणारच. मग गायीचे काय होईल? कशी जगेल बिचारी? जंगलात ती शत्रूपासून स्वसंरक्षण करू शकत नाही. कारण गायीला ना बिळात घुसता येत, ना झाडावर चढता येत, ना हवेत उडता येत, ना अतिवेगाने पळता येत. शत्रूशी दोन हात करायला ना दात ना नखे, ना हत्तीसारखी शक्तिशाली सोंड. शेपटी आणि शिंगांची ताकत व धार उत्क्रांतीच्या प्रवाहात क्षीण झालेली. मग ती स्वबचाव कशी करेल? तेव्हा तिला तिच्या संरक्षणार्थ गरज पडेल एका बलशाली सहकाऱ्याची. मग तो सहकारी कोण? गायीला जेवढे नैसर्गिक शत्रू आहेत त्या सर्वांना पराभूत करून गायीला जीवदान, अभय देण्याची शक्ती केवळ सिंह, वाघापाशीच. सिंह, वाघाशिवाय गायीचे रक्षण कोणीच करू शकत नाही आणि नेमकी येथेच बंडी उलार होते. जो गायीचे रक्षण करू शकतो तोही तिचा शत्रूच. गाय वाघाकडे अभय मागण्यास गेली तर वाघोबा तिला अभय देण्याऐवजी तिच्यामध्ये आपले खाद्य शोधणार. भूक शमविण्याची वस्तू या नजरेने पाहणार. ज्याच्याकडे आश्रयाला जावे तोच काळशत्रू ठरणार.

कारण..

वाघाकडे जे दात आहेत ते गायीला खाण्यासाठीच! तिचे प्राण वाचवू शकेल, अभय देऊ शकेल, असे दात वाघाजवळ आहेतच कुठे? ज्याच्याकडून रक्षणाची अपेक्षा केली जाऊ शकते तोच जर भक्षक ठरणार असेल तर? म्हणून गाय आणि स्त्री या दोघीत याच अनुषंगाने विचार केला तर दोघींच्याही व्यथा सारख्याच वाटतात मला.

गायीस अभय देण्या, वाघास दात नाही<br>
रजनीस जोजविण्या, सूर्यास हात नाही

■■

# कुलगुरू साहेब आव्हान स्वीकारा!

मा. कुलगुरू डॉ. व्यंकट मायंदे,
पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला
स. न. वि. वि.

दि. ६ जून २०११च्या लोकसत्तामध्ये एक बातमी प्रकाशित झाली आहे. कृषी अधिकाऱ्यांच्या तांत्रिक कार्यशाळेत प्रकल्प आधारित शेती या विषयावर मार्गदर्शन करताना 'शेतकऱ्यांना फुकट काही देऊ नये, नुसते फुकट जर दिले तर शेतकरी फुकट घेण्यासाठीच बसलेले असतात, अशी शेतकऱ्यांची प्रवृत्तीच झाली आहे' अशा आशयाचे विधान केल्याचे प्रकाशित झाले आहे.

डॉ. मायंदे साहेब, आपण एका विद्यापीठाच्या कुलगुरुपदी विराजमान आहात आणि कुलगुरू या शब्दाची महती फार मोठी आहे. पूर्वीच्या काळात गुरुकुल असायचे. त्या गुरुकुलात गुरू आपल्या शिष्यांना असे काही शिक्षण द्यायचे की शिष्य समग्र समाजाला नवी दिशा देऊन समाजप्रबोधनाचे कार्य करायचे. त्या गुरुकुलातील गुरूही इतके प्रतिभावान व पारंगत असायचे की राजालादेखील आपला राज्यकारभार व्यवस्थित चालविण्यासाठी अशा गुरूंची गरज भासायची. त्यासाठी राजगुरूही नियुक्त केले जायचे.

आता गुरुकुल काय आणि कुलगुरू काय, दोन्ही शब्द सारखेच, अर्थही जवळपास सारखेच. नुसती अक्षरांची तेवढी हेराफेरी. फरक एवढाच की पूर्वीच्या काळी गुरू स्व:सामर्थ्यावर आणि कठोर तपस्या करून मिळविलेल्या ज्ञानाच्या बळावर गुरुकुलांची स्थापना करून ते चालवायचे आणि नावलौकिक मिळवायचे. आता मात्र आधीच अस्तित्वात असलेल्या विद्यापीठावर सेवा कार्यकाळ वरिष्ठता व राजकीय लागेबांधे या आधारावर आयत्या बिळात नागोबा बनून कृषी विद्यापीठात कुलगुरू या पदापर्यंत पोहोचले जात असावे. त्यात पात्रता, अभ्यास, शेतीविषयक सखोल ज्ञान, शेतीच्या उत्थानासाठी करावयाच्या प्रयत्नांसाठी आवश्यक असणारी

ऊर्मी वगैरे बाजू विचारात घेतल्या जातात की नाही, याबाबत तुमचे वरील विधान वाचल्यानंतर संशय घ्यायला खूप जागा निर्माण झाल्या आहेत.

शेतकऱ्यांना फुकटचे खायची सवय जडली आहे, असे म्हणणारे जगाच्या इतिहासातले तुम्ही पहिले नाहीत हे मी मान्य करतो. अशा तऱ्हेची विधाने अधूनमधून ऐकायला-वाचायला मिळतच असतात; पण ऐरेगैरे नथ्थू खैरे यांनी तसे म्हटले तर ती गंभीर बाब खचितच नसते. कारण ही माणसे काही शेती विषयातली खूप मोठी अभ्यासक नसतात. शेती विषयाशी त्यांची बांधिलकी असतेच असेही नाही; पण जेव्हा एखाद्या कृषी विद्यापीठाचा थेट कुलगुरूच अशा तऱ्हेचे अशास्त्रीय आणि बिनबुडाचे निवेदन करतो तेव्हा ती बाब नक्कीच गंभीर आणि क्लेशदायक ठरते.

मायंदे साहेब, माझे तुम्हाला थेट प्रश्न आहेत की सरसकट सर्व महाराष्ट्रीय शेतकऱ्यांला फुकटात काय मिळते? ते कोण देते? विद्यापीठ देते की कुलगुरू? शासन देते की शासनकर्ते देतात? किती देतात? कोणत्या स्वरूपात देतात? निदान चालू आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना फुकट वाटलेल्या रकमेचा आकडा सांगा. त्या रकमेच्या आकड्याचा महाराष्ट्रातील एकूण शेतकरी संख्येने भागाकार करा. दरडोई मिळणारी रक्कम किती रुपयांत की नव्या पैशांत तेही जाहीर करा.

तुम्ही उत्तरेच देणार नाहीत, कारण तुम्हाला उत्तरे माहीत असती तर वास्तविकतेचे नक्कीच भान असते आणि वास्तविकतेचे भान असलेला मनुष्य अशी मुक्ताफळे उधळू शकत नाही. वास्तविकता ही आहे की महाराष्ट्रच काय संपूर्ण भारत देशाच्या कोणत्याच कोपऱ्यात सरसकट सर्व शेतकऱ्यांना फुकटात काहीच मिळत नाही.

मायंदे साहेब, शेतकऱ्यांना सल्ला देण्याइतके सर्वांत सोपे काम दुसरे कुठलेच नाही. त्याला अनुभवसंपन्नता लागत नाही, सखोल ज्ञानाची गरज पडत नाही, बुद्धीला फारसा ताण द्यावा लागत नाही. कारण आधीच कोणीतरी पुस्तकात जे काही लिहून ठेवलेले असते त्याचीच घोकमपट्टी करून तशीच री ओढायची असते. शेतीविषयक सल्ला देणे म्हणजे यापलीकडे काय असते? आधी केले, मग सांगितले या म्हणीप्रमाणे वागावे लागत नाही. स्वत:च्या शेतीत किंवा विद्यापीठाच्या शेतीत ज्यांना कधी एकरी ३ क्विंटल कापूस पिकवून दाखवता आला नाही, ते एकरी १२ क्विंटल कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याला सल्ला द्यायला उतावीळ असतात. स्वत:च्या शेतीत किंवा विद्यापीठाच्या शेतीत ज्यांना कधी एकरी १५ क्विंटल सोयाबिन पिकवून दाखवता आले नाही, ते स्वत: शेतीतज्ज्ञ म्हणून मिरवत असतात. तसे नसते आणि शेतीमध्ये जर भरमसाठ मिळकत मिळवता आली असती तर तुमच्यासारखी सर्व शेतीतज्ज्ञ मंडळी शेती करून मालक बनण्याऐवजी चाकर बनून 'बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात' कशाला वाटत फिरले असते? स्वत: शेती करून आणि शेतीमध्ये

कापूस, तूर, मूग, उडीद, गहू, बाजरा, भात, सोयाबीन किंवा हरबरा पेरून, शेतीत मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बळावर शेतकऱ्याला क्लास वन किंवा सुपरक्लास वन जीवन जगता येऊ शकते, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविणारा एखादा तरी शेतीतज्ज्ञ निर्माण का होत नाही? याचे तरी समर्पक उत्तर देणार काय?

पंजाबराव कृषी विद्यापीठाकडे सर्वदूर विदर्भात असलेली सर्व कृषी संशोधन केंद्रे मिळून एकूण शेतजमीन किती? त्यांपैकी पडीक किती? जिरायती किती? बागायती किती? प्रत्यक्षात पिकाखाली किती? खरीप व रबी हंगाम-२०१०मध्ये झालेले एकूण उत्पादन किती? एकूण उत्पादनाला एकूण पिकाखालील क्षेत्राने भागाकार करून तुमच्या विद्यापीठाने एकरी कोणत्या पिकाचे किती उत्पादन घेतले ते तरी सांगणार का? उत्पादनाच्या विक्रीपोटी मिळालेली रक्कम वजा उत्पादन घेण्यासाठी आलेला खर्च बरोबर मिळालेला नफा किती? एवढे तरी जाहीर करणार काय?

विद्यापीठाच्या शेतीत एकरी उत्पन्न किती निघते, असा जेव्हा प्रश्न विचारला जातो तेव्हा विद्यापीठात उत्पन्नासाठी नव्हे तर संशोधनासाठी शेती केली जाते, असे विद्यापीठाच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांपासून ते कुलगुरूपर्यंत सर्वांकडून एवढे एकच छापील उत्तर दिले जाते. या प्रश्नाचे उत्तर देताना चतुर्थ श्रेणी कर्मचारी आणि कुलगुरू यांची बौद्धिक पातळी समान पातळीवरच खेळत असावी, असे दिसते. कारण विद्यापीठात संशोधन करून आपण काय दिवे लावलेत याचा आढावा घेण्याची गरज दोघांनाही वाटत नाही. तसे नसेल तर पंजाबराव कृषी विद्यापीठाने गेल्या वर्षात शेतकऱ्यांना उपयोगी पडेल किंवा त्यांच्या शेतीत चमत्कारिक बदल घडून येईल असे कोणते संशोधन केले आहे, ते तरी सांगा.

आज विदर्भात कपाशीच्या लागवडीसाठी खासगी कंपन्यांनी संशोधित केलेल्या कपाशीच्या वाणांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. पंकृविद्वारे संशोधित AHH-४६८, PKV-HY४ या वाणांकडे शेतकरी ढुंकूनदेखील पाहत नाहीत. सद्यस्थितीत तुरीमध्ये ICPL-८७११९, BSMR-७३६ किंवा मारुती या जातीची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते आणि हे संशोधन पंकृवीचे नाही. सोयाबिनमध्ये JS-३३५ या जातीने सोयाबिन क्षेत्र व्यापून टाकले आहे, तेही संशोधन पंकृवीचे नाही. उसामध्ये तेच, केळीमध्ये तेच, भाजीपालावर्गीय पिकामध्ये तेच. मग पिकेव्हीचे संशोधन आहे कुठे?

नांगर, कुळव, वखर, डवरणी यंत्र, मळणी यंत्र, पेरणी यंत्र यातले संशोधनही पंकृवीचे नाही. कीटकनाशके किंवा रोगप्रतिकारक शक्ती असलेले जनुकीय बियाण्यांतील संशोधन पंकृवीचे नाही. शेतीमध्ये ज्या-ज्या गरजा आहेत, त्यांपैकी कुठल्याही क्षेत्रात पंकृवीचे नाव घेण्यासारखे संशोधन नाहीच. मग तुम्ही संशोधन करता म्हणजे नेमके

काय करता? याचे तरी उत्तर देणार की नाही?

मायंदे साहेब, मंत्र्यांची आणि शासन-प्रशासनाची गाडाभर कागदपत्रांच्या, दस्तावेजाच्या आधारे दिशाभूल करणे फारच सोपे काम असेल; पण तुम्ही शेतकऱ्यांची दिशाभूल करू शकत नाहीत, हेही ध्यानात घ्या. शेतकरी आर्थिक स्थितीने परावलंबी झाल्याने कोणाच्याही समोर फारसे बोलत नाही म्हणून तुमच्यासारख्यांचे फावते, हे लक्षात घ्या. कागदोपत्री संशोधनाच्या आधारे पीएच. डी., डीलिट वगैरे मिळू शकते; पण शेती पिकवण्यासाठी बियाणे, खते-कीटकनाशके यांची गरज असते, कागदपत्री दस्तावेज हे काही पिकांचे खाद्य नाही. पंकृविमधील या संपूर्ण दस्तावेजांचे सेंद्रिय खतात रूपांतर केले आणि पिकाला खाऊ घातले तर जास्तीत जास्त क्विंटल-दोन क्विंटल अधिक अन्नधान्य पिकू शकेल, पिकाच्या भाषेत या दस्तावेजाला यापेक्षा जास्त काही अर्थ उरत नाही. मुलांची भाषा ज्याला चांगली कळते तोच चांगला पालक. ज्याला विद्यार्थ्यांची भाषा कळत नाही तो शिक्षक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणू शकत नाही. अगदी तसेच ज्याला पिकांची भाषा कळत नाही तो शेतीमध्ये चांगले संशोधन करूच शकत नाही. तुम्हीसुद्धा विद्यापीठात नोकरी करताय ती पगार मिळविण्यासाठी की शेतीचे भले करण्यासाठी? याचेही प्रामाणिक उत्तर स्वत:च स्वत:ला विचारून पाहा. तुमच्यामुळे शेतकरी समाजाचे काही भले होणार नसेल तर नसू द्या; पण शेतकऱ्यांना डिवचण्याचे व त्यांचा उपहास, उपमर्द करण्याचे उपद्व्याप तरी बंद करा.

आज दुर्दैवाने विद्यापीठीय शेतीसंशोधक आणि प्रत्यक्ष शेती यांचा अर्थाअर्थी काहीही संबंधच राहिलेला नाही. शेतीचे अर्थशास्त्र तुमच्यासारख्या उच्चशिक्षित पंडितांना कळत नाही. थोडेफारदेखील अर्थशास्त्र कळले असते तर कांद्याचे भाव २ रुपये किलो, कापसाचे भाव रु. २५००/- आणि तुरीचे भाव आधारभूत किमतीपेक्षा खाली कोसळल्यावर कृषी विद्यापीठाचे कुलगुरू या नात्याने तुम्ही शासनाला दोन खडे बोल नसते का सुनावले? किंवा दोन खडे बोल सुनावण्याचे धारिष्ट्य नसेल तर अगदी प्रेमळ भाषेतही शासनापर्यंत शेतीच्या व्यथा पोहोचवायला काय हरकत होती? शेतमालाचे भाव कोसळल्यामुळे शेतीचे अर्थशास्त्र बिघडू शकते आणि शेतकरी देशोधडीस लागू शकतो एवढी तरी बाब शासनाच्या कानावर घालायला काय हरकत आहे? पण तुम्हाला त्याची गरज भासत नाही. कारण शेती किंवा शेती संशोधन याऐवजी शासकीय अनुदानावर तुमचे प्रपंच चालतात. शेतमालाचे भाव कोसळल्याचे फटके तुम्हाला बसत नाहीत. तुमचे पगार, भत्ते अगदी शाबूत असतात. निसर्गाचा लहरीपणा, हवामान, पाऊसपाणी किंवा ओला-कोरडा दुष्काळ यांच्याशी शासकीय अनुदानाचा काहीही संबंध नसतो. अनुदान व पगार हे हमखास

पीक असते. असेच ना?

पंजाबराव कृषी विद्यापीठाकडे हजारो एकर जमीन आहे. सिंचनाची व्यवस्था आहे, तुम्हीच गेल्या पन्नास वर्षांत केलेल्या संशोधनाची शिदोरी आहे. मग कृषी विद्यापीठाला अनुदानाची गरज का पडावी? विद्यापीठात काम करणाऱ्या तज्ज्ञांना शासनाकडून पगार घेण्याची गरज का भासावी? आता निव्वळ सल्ले देणे खूप झाले, या विद्यापीठाच्या हजारो एकरांवर तुमच्याच संशोधनाच्या आधारे शेती करून किमान पाच वर्षे तरी जगून दाखवा, प्रपंच चालवून दाखवा आणि शेती करून होणाऱ्या मिळकतीवर विद्यापीठाचे सर्व कारभार, अनुदान अथवा पगार न घेता चालवून दाखवा. 'आधी केले मग सांगितले' यासारखा दुसरा चांगला मार्ग नाही. स्वीकारणार का आव्हान?

आज कापसाचा बाजारभाव प्रतिक्विंटल रु. २५००/- आणि तुरीचा भाव प्रती क्विंटल रु. २०००/- एवढा खाली घसरलाय. २५०० रुपयांत क्विंटलभर कापूस आणि २००० रुपयांत क्विंटलभर तूर कशी पिकवली जाऊ शकते, याचे विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक तरी करून दाखवायला काय हरकत आहे? दाखवणार का प्रात्यक्षिक करून? स्वीकारणार का आव्हान?

या सर्व प्रश्नांची उत्तरे देणे तुमची नैतिक जबाबदारी आहे. नैतिकतेची चाड नसेल तर निदान तुम्ही तरी फुकटचा पगार खात नाहीत, हे सिद्ध करण्यासाठी उत्तरे दिली पाहिजेत. महाराष्ट्रातील संपूर्ण शेतकरी समाज तुमच्याकडून या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्याची प्रतीक्षा करीत आहे.

■■

# अण्णा सेवाग्रामला या! दारूने आंघोळ करू...

आदरणीय अण्णा,

आपण जनलोकपाल विधेयकाच्या मागणीसाठी केलेले उपोषण खूप गाजले. चार दिवस सलगपणे विविध वृत्तवाहिन्यांवर अण्णा आणि त्यांचे उपोषण हा एकच विषय गाजत होता. वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरून आले. इंटरनेटवरही या विषयाची खूप चर्चा झाली. जगाच्या कानाकोपऱ्यांतून पाठिंबा जाहीर करण्यात आला. फेसबुकवरून वेगवेगळ्या तऱ्हेने समर्थन व्यक्त केले गेले. सार्वजनिक संकेतस्थळांवर घमासान चर्चा झडल्या. अनेकांनी आपापल्या ब्लॉगवरून या आंदोलनाची दखल घेतली. शेतकरी संघटनेच्या औरंगाबादला झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत या भ्रष्टाचारमुक्ती अभियानाला सक्रिय पाठिंबा देण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आणि सेवाग्राम येथील बापू कुटीसमोर सर्व कार्यकर्त्यांसमवेत लाक्षणिक उपोषण करून जनलोकपाल विधेयकाला समर्थन देण्याचे भाग्य आम्हालाही लाभले.

या विधेयकाच्या समर्थनार्थ संपूर्ण देशातला आम आदमी लढण्यासाठी मैदानात उतरला असला तरी त्यातील किती लोकांना जनलोकपाल विधेयक कितपत कळले हे सांगणे कठीण आहे; पण भ्रष्टाचारावर इलाज व्हायलाच हवा. काहीच न करण्यापेक्षा, काही तरी करणे कधीही चांगले एवढाच विचार करून आणि प्रथमच भ्रष्टाचाराच्या विरोधात आपला रोष व्यक्त करण्याची संधी उपलब्ध झाल्यामुळे देशभरातली एवढी जनता रस्त्यावर उतरायला तयार झाली असणार, हे उघड आहे.

भ्रष्टाचाराचा महाभयंकर राक्षस आटोक्यात येण्याऐवजी वनव्यासारखा पसरून दिवसेंदिवस अधिक उग्र रूप धारण करत आहे. त्यात सर्वसामान्य जनता होरपळून निघत आहे. 'जगणे मुश्किल, मरणे मुश्किल' अशा दुहेरी कात्रीत जनता सापडली आहे. या सर्व प्रकारात राजसत्ताच एकतर स्वतः गुंतलेली आहे किंवा खुर्ची वाचविण्याच्या मोहापायी हतबल होऊन डोळेझाक करत आहे, भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी

घालत आहे, हे आता जनतेला कळायला लागले आहे. त्यामुळे त्यांना संताप व्यक्त करण्यासाठी लढायला एक भक्कम आधार हवा होता; तो त्यांना तुमच्यात दिसला म्हणून आम आदमी नेहमीच्या कोंडलेल्या भिंती ओलांडून बाहेर पडला. त्यासाठी अण्णा तुमचे लक्ष-लक्ष अभिनंदन आणि कोटी-कोटी धन्यवाद!

**अभियान नव्हे जनचळवळ**

भ्रष्टाचार मुक्ती अभियान आता नुसते अभियान राहिले नसून एक जनचळवळ होऊ पाहत आहे. योग्य मुहूर्तावर, योग्य स्थळी या चळवळीची मुहूर्तमेढही रोवली गेली आहे; पण ही चळवळ पुढे न्यायची तर यापुढची वाटचाल नुसती सात्त्विक अथवा भावनिक असून भागणार नाही. त्यासाठी तर्कसंगतीची जोड लागेल, अभ्यासपूर्ण वास्तवाचे भान लागेल. करावयाच्या उपाययोजनांची नेमकी जाण लागेल. त्यासाठी तुम्हाला या लढाईसाठी त्या तोडीचे सवंगडीही शोधावे लागेल. कारण चित्रविचित्र विचारधारा जोपासणारे अनेक विचारवंत एकत्र येणे सोपे असते; पण उद्दिष्ट साध्य होईपर्यंत एकत्र टिकणे महाकठीण असते. त्यांच्यात आपसातच फार लवकर पोळा फुटायला लागतो, हा पूर्वानुभव आहे.

अण्णा, जेव्हा तुम्हाला नगर जिल्ह्यातसुद्धा पुरेशी प्रसिद्धी मिळाली नव्हती तेव्हापासून म्हणजे १९८५-८६पासून तुम्हाला मी ओळखतो. तुमच्या कार्यशैलीवर मी तसा बारकाईने लक्ष ठेवून आहे. या देशातल्या सबंध गरिबीवर मात करता येईल असा काही कार्यक्रम तुम्ही हाती घ्याल, अशा आशाळभूत नजरेने मी तुमच्याकडे सदैव पाहत आलोय; पण माझी निराशाच झाली हे मी नाकारण्याचे काहीच कारण नाही. तुमच्या कार्याचे मोल कमी आहे असे मला म्हणावयाचे नाही आणि देशभरातून तुमच्या कार्याचा गौरव होत असताना माझ्यासारख्या एका फाटक्या माणसाने एक वेगळाच सूर काढणे हेही शोभादायक नाही; पण तुम्ही दाखवलेल्या मार्गाचे अनुकरण करून या देशातल्या लक्षावधी खेड्यांमधल्या एकाही माणसाला दुसरा अण्णा बनून आपल्या गावाचे राळेगणसिद्धी करता आलेले नाही. अगदी मलासुद्धा तुमचा कित्ता गिरवून माझ्या गावाचे रूपांतर राळेगणसिद्धीसारख्या गावामध्ये करता आलेले नाही.

**एवढे अण्णा कुठून आणायचे?**

अण्णा, एकेकाळी क्रिकेटमध्ये भारतात वेगवान गोलंदाज ही दुर्मिळ गोष्ट होती, पण कपिलदेव आले आणि मग त्यांचे अनुकरण करून मोठ्या प्रमाणावर वेगवान गोलंदाज तयार व्हायला लागले. ज्याला भारतरत्न म्हणून गौरविण्यात केंद्र सरकारने चालढकल चालविली त्या सचिन तेंडुलकरने तर फलंदाजीची व्याख्याच बदलून टाकली आणि सचिनचे अनुकरण करून गावागावात चेंडू सीमापार तडकवणारे

फलंदाज तयार झाले.

सर्व रोगांवर रामबाण इलाज म्हणून प्राणायाम आणि योगाभ्यासाचे धडे स्वामी रामदेव बाबांनी दिले. अल्पकाळातच जनतेने त्यांचे अनुकरण केले आणि देशभरात हजारो रामदेव बाबा तयार झाले.

'शेतकऱ्यांचे मरण हेच सरकारचे धोरण' असून 'शेतमालास रास्त भाव मिळत नाही म्हणून शेतकरी कर्जबाजारी झाला' त्यासाठी 'भीक नको घेऊ घामाचे दाम' असा मंत्र शरद जोशींनी दिला आणि पिढ्यान्‌पिढ्या हतबलपणे जगणारा शेतकरी खडबडून जागा झाला. शरद जोशींचे अनुकरण करूनच गावागावात लढवय्ये शेतकरी तयार झालेत.

याउलट संपूर्ण देशातील खेड्यांची राळेगणसिद्धी करायचे म्हटले तर त्यासाठी काही सरकारी ठोस योजना बनत नाही कारण कदाचित ती अव्यवहार्य असेल. मग सरकारी तिजोरीतून गंगाजळी आपापल्या गावापर्यंत खेचून आणायची तर प्रत्येक गावात एकेक अण्णा हजारे जन्मावा लागेल आणि अशी कल्पना करणेसुद्धा अशास्त्रीय आणि अव्यवहार्य आहे.

अण्णा, आपला देश हा नेहमीच चमत्कारिक व्यक्तिमत्त्वाच्या मागे धावणारा आणि व्यक्तीपूजक राहिला आहे. त्यामुळे एखाद्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची आणि त्याच्या कार्याची व्यावहारिक पातळीवर चर्चा करणे एकतर मूर्खपणाचे मानले जाते किंवा निषिद्ध तरी मानले जाते. त्यामुळे बाबा आमटे, अभय बंग, अण्णा हजारे किंवा सिंधुताई सपकाळ ही व्यक्तिमत्त्वे उत्तुंग असली तरी यांच्या कार्यामुळे एकंदरीतच समाजरचनेवर, संस्कृतीच्या उत्क्रांतीवर, प्रशासकीय यंत्रणेवर आणि नियोजनकर्त्या निगरगट्ट राज्यकर्त्यांच्या धोरणांवर काहीही प्रभाव पडत नाही, हे सत्य असूनही कोणी स्वीकारायला तयार होत नाही.

**जनलोकपाल विधेयक**

अण्णा, जनलोकपाल विधेयक यायलाच हवे. त्यासाठी तुमच्या समर्थनार्थ मी माझ्यापरीने यथाशक्ती प्रयत्न करणारच आहे; पण या विधेयकामुळे काही क्रांतिकारी बदल वगैरे घडून येतील, या भ्रमात मी नाही. मानवाधिकार आयोगाचा फायदा कसाबला झाला; पण या देशातल्या कष्टकरी जनतेला वेठबिगारापेक्षाही लाजिरवाणे जीवन जगावे लागते, आयुष्य संपायच्या आतच शेतकऱ्यांना आपली जीवनयात्रा संपवावी लागते. देवाने दिलेल्या आयुष्यभर जगण्याच्या त्याच्या अधिकाराचे रक्षण करण्यास मानवाधिकार आयोग कुचकामी ठरला आहे. माहितीच्या अधिकाराचा उपयोग या देशातल्या सव्वाशे कोटीपैकी फक्त मूठभर लोकांनाच झाला. त्यामुळे तुम्ही ज्या मार्गाने वाटचाल करताहात त्यामुळे आम जनतेचे फार काही भले होईल

असे मला वाटत नाही.

अण्णा, तुम्ही ३-४ दिवस दिल्लीला उपोषण केले आणि आम जनतेच्या नजरेत हिरो झालात. कदाचित हीच आम जनता तुम्हाला एक दिवस महात्मा म्हणून गौरवायला मागेपुढे पाहणार नाही. तुमच्या समर्थनार्थ मैदानात उतरायला लागलीच आहे. त्यामुळे मूठभर लोकांच्या नव्हे या आम जनतेच्या आयुष्यात सुखाचे आणि सन्मानाचे काही क्षण निर्माण होण्यासाठी तसे थेट प्रयत्न करणे ही आता तुमची जबाबदारी आहे. त्यासाठी नुसती सात्त्विक अथवा भावनिक आंदोलने करून भागणार नाही तर त्यासाठी तर्कसंगतीची जोड लागेल, अभ्यासपूर्ण वास्तवाचे भान लागेल. करावयाच्या उपाययोजनांची नेमकी जाण लागेल. त्यानुरूपच पुढील वाटचाल करावी लागेल.

अण्णा, तुमचा कायद्यावर प्रचंड विश्वास आहे ही चांगली गोष्ट आहे; पण कायद्याने सगळे प्रश्न सुटत नाहीत, हेही लक्षात घ्यायला हवे. कायदा नुसता करून उपयोगाचा नाही त्याची अंमलबजावणी व्हायला हवी. दुर्दैवाने कायद्याची नीट अंमलबजावणी होत नाही, नाही तर आहे तेच कायदे खूप आहेत. त्यामुळे प्रत्येक समस्येचे निराकरण करण्यासाठी पुन्हा नवा कायदा किंवा विधेयक हे काही रामबाण औषध ठरू शकत नाही.

याउपरही कायदा आणि विधेयके आणली म्हणजे प्रश्न चुटकीसरशी सुटतात, असे तुम्हाला वाटत असेल तर मग या वर्ध्याला. हा जिल्हा महात्मा गांधीजींच्या पावन स्पर्शाने पवित्र झाल्यामुळे फार पूर्वीपासून येथे संपूर्ण जिल्हाभर कायदेशीर दारूबंदी आहे; पण याच जिल्ह्यात पावलापावलांवर हवी तेवढी दारू, अगदी ज्या पाहिजे त्या ब्रँडची आणि गावठीही मुबलक उपलब्ध आहे.

नाही खरे वाटत? मग या सेवाग्रामला बापू कुटीसमोर. येताना एकटेच नका येऊ, हजारो कार्यकर्त्यांसह या आणि येथे दारूनेच आंघोळ करा. हजारो लोकांना आंघोळ करायला पुरून उरेल एवढी दारू एकटे सेवाग्राम हे गावच पुरवेल, याची मला खात्री आहे.

कायद्याच्या राज्याचा विजय असो!

■■

# सत्तास्थळ हेच भ्रष्टाचाऱ्यांचे सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र

अण्णांच्या सशक्त जनलोकपाल विधेयकाच्या निमित्ताने भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या विधेयकामुळे ६० ते ६५ टक्के भ्रष्टाचार कमी होईल असा अण्णांचा दावा असला तरी तशी शक्यता दिसत नाही. भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार असले तरी सध्या जे आंदोलन चाललेय ते आर्थिक भ्रष्टाचाराशी निगडित असल्याने या लेखात आपण केवळ आर्थिक भ्रष्टाचाराची चर्चा करणार आहोत. अण्णांनी जनलोकपालामुळे ६० ते ६५ टक्के भ्रष्टाचार कमी होईल असे म्हटले असले तरी ही टक्केवारी भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येशी संबंधित आहे की भ्रष्टाचारामुळे होणाऱ्या एकूण अपहाराच्या रकमेशी याचा खुलासा झालेला नाही. सशक्त जनलोकपाल विधेयक आले आणि त्याची काटेकोरपणे व इमानेइतबारे अंमलबजावणी झाली असे गृहीत धरून रकमेच्या अनुषंगाने विचार केला तर ६० ते ६५ टक्के रकमेचा भ्रष्टाचार कमी होईल, अशी आशा बाळगायला काहीच हरकत नाही. कारण कोट्यवधीपेक्षा जास्त रकमेचे होणारे भ्रष्टाचार जरी थांबवता आले तरी हे उद्दिष्ट सहज गाठले जाईल.

मुळातच गेल्या काही वर्षांत उच्च पातळीवरील राज्यकर्त्यांचे हजारो कोटींचे भ्रष्टाचार उघडकीस आल्याने आणि सरकार या भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याऐवजी त्यांना पाठीशी घालण्यातच प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे ही बाब जनसामान्यांना प्रकर्षाने जाणवू लागल्यानेच जनप्रक्षोभाची कोंडी फुटून भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाला धार आली आणि नेमक्या याच पार्श्वभूमीवर अण्णांचे आंदोलन अधिक ठळकपणे जनतेच्या नजरेत भरायला लागले, हे अगदी उघड आहे.

मात्र भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींच्या एकूण संख्येचा विचार करता कितीही सशक्त जनलोकपाल विधेयक आणले तरी भ्रष्टाचारी व्यक्तींची संख्या एका टक्क्यानेदेखील कमी होण्याची शक्यता नाही. कारण भ्रष्टाचाराचे मूळ शासन संस्थेतच दडलेले आहे. सत्तास्थळ हेच भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र झाले आहे. उद्योग, व्यापार, व्यवसायाच्या प्रत्येक वाटा लायसन्स-परमिटच्या जाचक बंधनांतून जात असल्याने प्रत्येक पायरीवर

विराजमान असलेल्या देवी-देवतेला नवस कबूल केल्याखेरीज पाऊल पुढे टाकताच येत नाही. नैवेद्य दाखवल्याखेरीज टेबलामागील देव प्रसन्न होत नाही आणि नवस फेडल्याखेरीज कुणाचेच कार्य सिद्धीस जात नाही. जेथे जेथे म्हणून शासकीय नियंत्रणे आहेत तेथे तेथे भ्रष्टाचाराच्या अमाप संधी उपलब्ध झाल्या आहेत आणि मिळालेल्या संधीचे सोने करायचे असते हे प्रत्येकाला पुरते ठाऊक असल्याने संधीचे सोने करण्याची संधी कुणीच दवडत नाही.

येणारे लोकपाल विधेयक आणि ते राबविणारी यंत्रणासुद्धा शासनसंस्थेचाच एक भाग राहणार असल्याने ते भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ ठरण्याऐवजी भ्रष्टाचाराला पूरक आणि पोषकच ठरण्याची शक्यता जास्त आहे. लाचलुचपत प्रतिबंधक कायदा असूनही भ्रष्टाचाराला आवर घालता आला नाही अगदी तसेच लोकपालाच्या बाबतीत घडेल. मात्र यातून दोन गोष्टी चांगल्या घडण्याची शक्यता आहे. पहिली अशी की भ्रष्टाचार करणाऱ्यांना या नव्या सशक्त व्यक्तींनाही संगनमत करून आपल्यात सामावून घ्यावे लागेल. त्यामुळे अपहाराची जी रक्कम दहा लोकांतच हडप केली जाणार होती तिथे वीस लोकांमध्ये वाटून घ्यावी लागेल, त्या निमित्ताने विकेंद्रीकरणाची सुरुवात झाल्यासारखे होईल. दुसरे असे की या लोकपाल संस्थेला वार्षिक कर्तबगारीचा अहवाल दमदार दिसण्यासाठी काही ना काही तरी कार्यवाही करावीच लागेल. त्यामुळे त्यांनी पाच-पन्नास मोठे मासे जरी गळाला लटकवले तरी ६० ते ६५ टक्के रकमेचा भ्रष्टाचार कमी होईल असा अण्णांचा दावा प्रत्यक्षात खरा उतरायला कठीण जाणार नाही; कारण उच्चस्तरीय शासक-प्रशासकांच्या घोटाळ्यांतील रकमेचा आकडा एवढा प्रचंड आहे की तो आकडा ऐकताना एखाद्या संवेदनशील माणसाला चक्क मूर्च्छाच यावी.

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांपैकी संपूर्ण देशातल्या दारिद्र्यरेषेखालील सर्व कुटुंबांना अन्न आणि वस्त्र या दोन मूलभूत गरजा एक वर्षासाठी फुकटात पुरवायच्या म्हटले तरी तो खर्च भागून शिल्लक उरेल एवढ्या प्रचंड रकमेचा अपहार एकट्या टू-जी स्पेक्ट्रम घोटाळ्यात झालेला आहे. देशातल्या सर्वच शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून एका झटक्यात पूर्णत: मुक्त केले जाऊ शकते एवढ्या किंवा यापेक्षा जास्त रकमेचे कित्येक घोटाळे एका-एका व्यक्तीने केले आहेत. चव्हाट्यावर आलेले घोटाळेच जर इतके महाप्रचंड आहेत तर प्रकाशात न आलेल्या घोटाळ्यांची संख्या किती असेल याची कल्पना करताना अंगावर काटा उभारल्याशिवाय राहत नाही. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कायद्याच्या कचाट्यात केवळ तेच भ्रष्टाचारी सापडतात ज्यांना रीतसर भ्रष्टाचार कसा करावा, याचे ज्ञान नसते. कायद्याला हवे तसे वाकविण्याचे कौशल्य नसते. मात्र जे पद्धतशीरपणे भ्रष्टाचार करण्यात

पारंगत आहेत, ते कधीच कायद्याच्या कचाट्यात सापडत नाहीत आणि अगदी स्वच्छ प्रतिमेचे महामेरू म्हणून उजळ माथ्याने मिरवत राहतात. अगदी स्विस बँकेत भरभक्कम खातेभरणी करूनही जनतेच्या नजरेत मात्र बेदाग व्यक्तिमत्त्व म्हणून अधिराज्य गाजवत असतात.

जोपर्यंत घोटाळ्याच्या रकमा सुसह्य होत्या तोपर्यंत जनतेलाही फारसे नवल वाटत नव्हते. जो तळ्याची राखण करेल तो पाणी पिणारच हे गृहीत धरले जात होते; पण आता पाणी पिण्याऐवजी चक्क तळेच हडप करण्याची भ्रष्टाचाऱ्यांची नवी संस्कृती उदयाला आल्याने आजपर्यंतचा सुसह्य भ्रष्टाचार आता असह्य वाटायला लागला आहे. अण्णांच्या आंदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा मिळण्याचे गमक यात दडले आहे.

भ्रष्टाचाराचा मुद्दा आता व्यापक प्रमाणावर ऐरणीवर आला असला तरी माणसाची भ्रष्टाचारी वृत्ती आता इतक्यातच किंवा गेल्या काही वर्षांतच जन्माला आलेली नाही. पूर्वीच्या काळी भ्रष्टाचार अस्तित्वातच नव्हता असेही समजण्याचे कारण नाही. आमचे पूर्वज अत्यंत चारित्र्यवान होते, असे जर कोणी सांगत असेल तर तीसुद्धा लबाडी आहे, आर्थिक भ्रष्टाचार हा मनुष्यजातीच्या जन्मापासून किंवा जन्माच्या आधीपासूनच अस्तित्वात होता, याचे पुरावे आहेत. मानवाने देवदेवतांनाही आपल्या लाचखोरीने स्वच्छ ठेवलेले नाही. एखादा शासकीय अधिकारी स्वत:ची नैतिकमूल्ये जपण्यासाठी एक छदामही न घेता जनतेची कामे करतो, असे दृश्य तुरळक असले तरी दुर्मिळ नाही. मात्र बिना धूप-दीप-आरतीशिवाय प्रसन्न होणारी देवता सापडणे कठीण आहे. एखाद्याजवळ देवाला देण्यासारखे काहीच नसेल, अगदी फूल-अगरबत्तीही देण्याची परिस्थिती नसेल तर निदान भक्तिभाव तरी अर्पण करावाच लागतो, त्याशिवाय देव काही प्रसन्न होत नाही.

काही देवतांना प्रसन्न करण्यासाठी कोंबडी, बकरी किंवा डुक्कर यासारख्या प्राण्यांचा बळी देऊन नैवेद्य दाखवावा लागतो. त्यातल्या त्यात काही देवता तर फारच अडेलतट्टू असतात. नरबळीखेरीज त्यांना दुसरे काहीच चालत नाही. देवतांची कृपादृष्टी हवी असेल तर त्यांना हे सगळे द्यावेच लागते. नाही दिले तर त्या प्रसन्न होत नाहीत आणि याचकाचे कल्याणसुद्धा करत नाहीत. या तऱ्हेच्या देवता पूजाअर्चना न केल्यास प्रसन्न होत नाही; पण याचकाचे निष्कारण वाईटही करत नाहीत. अशा तऱ्हेच्या प्रसन्न किंवा मंगल देवता या वर्गवारीत मोडणाऱ्या देवतांचे गणित साधेसुधे असते. त्यांचे भक्तांना एकच सांगणे असते आशीर्वाद हवा असेल तर खिसा सैल करा, नाही तर हवा खा.

मात्र काही देवता वेगळ्याच म्हणजे ओंगळ किंवा अमंगल देवता या वर्गवारीत

मोडणाऱ्या असतात. अशा देवतांचे स्वरूप फारच वेगळे असते. इथे याचकाच्या व्यक्तिस्वातंत्र्याला किंवा मर्जीला अजिबात स्थान नसते. ठरल्याप्रमाणे वर्षातून एकदा तरी त्यांची पूजा करावीच लागते. दहिभात, मलिदा, कोंबडी, बकरी यांपैकी काहीना काहीतरी त्यांना द्यावेच लागते. नाहीतर त्या कोपतात. अशा देवतांना समाजही खूप घाबरतो. कारण या ओंगळ देवतांचा जर क्रोध अनावर झाला आणि त्या कोपल्या तर घरातल्या व्यक्ती आजारी पडणे किंवा मरणे, नैसर्गिक प्रकोप होणे, रोगराई येणे अशा तऱ्हेची संकटे येतील, अशी भीती त्यांच्या मनात दबा धरून बसलेली असते. देव आहे की नाही, तो प्रसन्न होतो की नाही, असा हा मुद्दा नाही; पण पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीमध्ये अशाच तऱ्हेने समाजाची उत्क्रांती झाली असल्याने लाचखोरी आणि भ्रष्टाचार मनुष्यजातीच्या रक्तात पुरेपूर भिनलेला आहे, हे महत्त्वाचे आहे.

निसर्गाने किंवा देवाने जेव्हा माणूस घडविला तेव्हा एक भलीमोठी मेख मारून ठेवलेली आहे. माणसाव्यतिरिक्त इतर सर्व प्राण्यांना काही ना काहीतरी असा एक शारीरिक विशेष गुण किंवा अवयव दिले आहे की त्यामुळे त्याला स्वसामर्थ्यावर जगता येऊ शकेल. जसे की वाघ-सिंहाला तीक्ष्ण नखे आणि दात, हरणाला पळण्याचा प्रचंड वेग, हत्तीला शक्तिशाली सोंड, सापाला विष, जिराफाला उंच मान, काही प्राण्यांना झाडावर चढण्यायोग्य शरीररचना, मगरीला पाण्यात पोहण्यासाठी खवले, पक्ष्यांना आकाशात उडण्यासाठी पंख वगैरे वगैरे. त्यामुळे त्या-त्या पक्षी-प्राण्यांना कुठलाही भ्रष्टाचार न करता जगणे सोयीचे झाले. त्यांना निसर्गाकडूनच स्वत:चे जीवन जगण्याचे हत्यार आणि ते वापरण्याचे कौशल्य मिळाले असल्याने त्यांना त्यांचे आचरण भ्रष्ट करण्याची गरजच भासत नाही. एका सावध प्राण्याने दुसऱ्या बेसावध प्राण्याची शिकार केली तर त्याला खून किंवा हत्या मानली जात नाही आणि त्यांना निसर्गानेच तशी मुभा दिली असल्याने ते कायद्याचे उल्लंघनही ठरत नाही. म्हणूनच प्राण्यांना पाप-पुण्याच्या कसोट्याही लागू होत नाही.

मात्र निसर्गाने माणसाला असा कोणताच अवयव दिलेला नाही की तो त्याच्या साहाय्याने स्वत:ची शिकार स्वत: मिळवून आपले पोट भरू शकेल. माणसाला देवाने वाघासारखी तीक्ष्ण नखे, हत्तीसारखे दात किंवा सोंड, मगरीसारखी प्रचंड ताकद यापैकी जरी काहीही दिले नसले तरी त्याऐवजी बुद्धिसामर्थ्य दिले आहे. बुद्धिसामर्थ्य देताना बुद्धीचा हवा तसा वापर करण्याचे स्वातंत्र्यसुद्धा देऊन टाकले आहे आणि इथेच खरी मेख आहे. बुद्धीचा हवा तसा वापर करण्याचे व्यक्तीनिहाय स्वातंत्र्य हेच मानवजातीच्या सबंध वर्तनाचे आणि गैरवर्तनाचे कारण ठरले आहे. मनुष्याने बुद्धीचा वापर कसा करावा याचे नियंत्रण जर मनुष्याऐवजी निसर्गाच्या स्वाधीन असते तर माणुसकी, सज्जनता, नैतिकता यांच्या व्याख्या करून त्याचा

जाणीवपूर्वक अंगीकार करण्याची गरजच भासली नसती. तसेच माणसाने नीतीनियमाने वागावे म्हणून कायदे करण्याची गरजच भासली नसती. माणसाचे आचरण निसर्गाने नेमून दिलेल्या चौकटीतच राहिले असते.

माणसाच्या वर्तणुकीचे नियमन निसर्ग करत नसल्याने व आपापल्या बुद्धीचा वापर कसा करावा याचा निर्णय ज्याचा त्याने घ्यायचा असल्याने मानवाच्या व्यक्तिगत हालचालींना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक मानवी जिवांच्या समुच्चयातूनच समाज बनत असल्याने प्रत्येक मानवी जीवाने व्यक्तिगत पातळीवर समाजाला पोषक हालचाली करणे म्हणजे नैतिकता आणि समाजाला नुकसान पोहोचेल अशी हालचाल करणे म्हणजेच अनैतिकता, अशी एक ढोबळमानाने व्याख्या तयार झाली असावी. समाजरचना ही परिवर्तनशील असल्याने मग नैतिकतेच्या व्याख्याही त्यानुरूप बदलत गेल्या असाव्यात.

एखाद्या व्यक्तीने केलेले वर्तन जर उर्वरित समाजासाठी व एकंदरीत समाजाच्या उत्क्रांतीच्या दिशा ठरण्यासाठी अहितकारक ठरत असेल तर त्याचे ते वर्तन गैरवर्तन ठरत असते. या गैरवर्तनाचेच दुसरे नाव भ्रष्टाचार असे आहे. मोह आणि स्वार्थ हा सजीवांचा स्थायीभाव असल्याने आणि मनुष्यप्राण्याच्या बाबतीत ज्याचा निर्णय त्यानेच घ्यायचा असल्याने, जेथे जेथे संधी मिळेल तेथे तेथे लपतछपत चौर्यकर्म करून, घेता येईल तेवढा लाभ पदरात पाडून घेणे ही मानवी प्रवृत्ती बनली आहे. ही प्रवृत्ती कालही होती, आजही आहे आणि उद्याही राहणारच आहे. गैरवर्तन किंवा भ्रष्टाचार ही न संपवता येणारी गोष्ट आहे. मात्र समाजहिताच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या मार्गाने अनावश्यक व अहितकारक व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने लादून भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविणे सहजशक्य आहे.

विविधता हा निसर्गाचा मुख्य गुण असल्याने जन्माला येणाऱ्या व्यक्तीही जन्मताच नानाविध प्रवृत्तीच्या असतात. काही व्यक्ती निष्कलंक चारित्र्याच्या असतात. त्यांना नैतिकतेची चाड असते आणि त्यांच्या मनात समाजाविषयीचा सन्मानही असतो. काही व्यक्ती समाजाला व सामाजिक कायद्याला जुमानत नाहीत; पण नैतिकतेला सर्वोच्च स्थान देतात, काही व्यक्तींच्या आयुष्यात नैतिकतेला अजिबात स्थान नसते; पण कायद्याला अत्यंत घाबरणाऱ्या असतात. एक वर्ग असाही असतो की तो कशालाच जुमानत नाही. ना नैतिकतेला ना कायद्याला. हा वर्ग कायमच स्वार्थ साधण्यासाठी संधीच्या शोधात असतो. नानाविध क्लृप्त्या लढवत असतो, कायद्यातील पळवाटा शोधून आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा सतत प्रयत्न करत असतो.

मानवी प्रवृत्ती निसर्गदत्त भ्रष्टाचारधार्जिणी असल्याने व प्रवृत्ती व्यक्तीनिहाय विविधतेने नटलेली असल्याने केवळ कायदे करून किंवा निव्वळ नैतिकतेचे धडे देऊन भ्रष्टाचार

काबूत येण्यासारखा नाही, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. एवढा विचार केला तर भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविण्यासाठी किती व्यापकपणे पावले टाकण्याची गरज आहे, हे सहज समजून येईल.

**भ्रष्टाचाराला आळा घालणे ही काळाची गरज**

समाजाची जसजशी वाटचाल होत जाते तसतशी नैतिकता आणि भ्रष्टाचाराची परिमाणे बदलत जाणे अपरिहार्य असते. कालची अनैतिकता ही आजची नैतिकता व कालचा असंस्कृतपणा हा आजचा संस्कृतपणा ठरायला लागतो. आजीबाईला नातीच्या ड्रेसमध्ये असंस्कृतपणा दिसणे, नातवाला आजोबाचे विचार सनातन वाटायला लागणे किंवा सासू आणि सुनेच्या विचारात जनरेशन गॅप दिसायला लागणे, हा सामूहिक मानसिकतेतील बदल याच वाहत्या काळाच्या वाहत्या बदलातून आलेला असतो. काळानुरूप भ्रष्टाचाराच्या व्याख्याच बदलत गेल्याने कालच्या भ्रष्टाचाराची जागा आज शिष्टाचाराने घेतलेली असते. मात्र भ्रष्टाचार पूर्वापार काळापासून चालत आला असला तरी आजच्याएवढी अत्त्युच्च पातळी कधीच गाठलेली नव्हती असे मात्र नक्कीच म्हणता येईल. भ्रष्टाचाराचे मुख्य कारण सरकारच्या चुकीच्या धोरणातच दडलेले असल्याने व राज्यकर्ते हेच मुख्यत: भ्रष्टाचारात बुडालेले असल्यानेच भ्रष्टाचाराला राजमान्यता मिळाल्याचे अघोषित स्वरूप प्राप्त झाले आहे. भ्रष्टाचार एका मर्यादेपर्यंत खपवून घेतला जाऊ शकतो पण आज शासकीय आणि प्रशासकीय भ्रष्टाचाराने मर्यादेच्या सर्व सीमा ओलांडल्या आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराला आवर घालणे ही काळाची गरज झाली आहे. नाकाला सुसह्य असणारा मोती दागिना ठरत असला तरी तोच मोती जर नाकापेक्षा जड व्हायला लागला तर ते असह्य व हानिकारक ठरत असते मग त्याला काढून फेकण्याशिवाय गत्यंतर उरत नसते. भ्रष्टाचाराने नैतिकता आणि सभ्यतेच्या पार व्याख्याच बदलून टाकल्या आहेत. धर्म-पंथाच्या शिकवणी व मूल्ये भ्रष्टाचाराच्या बाबतीत इतिहासजमा झालेली आहेत. धर्मपंथांवर किंवा पापपुण्यावर श्रद्धा बाळगणारे भ्रष्टाचारापासून दूर आहेत, असे काही आज चित्र राहिलेले नाही.

भ्रष्टाचारामुळे वैतागलेल्या जनतेला आता दाहक चटके बसू लागल्याने त्याविरोधात प्रचंड जनमानस तयार व्हायला लागले आहे. भ्रष्टाचार निर्मूलनाविषयी त्यांच्यात एकमत असले तरी करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात मात्र मतभिन्नता आढळते. भ्रष्टाचार संपला पाहिजे असे ज्यांना वाटते, त्यांच्यात भ्रष्टाचार संपविण्याविषयीचे प्रामुख्याने दोन मतप्रवाह आढळतात.

**कठोर जनलोकपाल :** टीम अण्णा आणि त्यांच्या समर्थकांना कठोर जनलोकपाल विधेयक आणले की भ्रष्टाचाराला आळा बसेल असे वाटते. याव्यतिरिक्त इतर काही

ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशा तऱ्हेच्या भूमिकेचे अजून तरी त्यांनी सुतोवाच केलेले नाही किंवा यासंदर्भात त्यांना शास्त्रीय किंवा अधिक तार्किक विचार करण्याची फारशी गरज भासत आहे, असेही दिसत नाही.

**नैतिकतेची पातळी उंचावणे :** लोकपाल वगैरे आणल्याने भ्रष्टाचार संपणार नाही कारण भ्रष्टाचाराची सुरुवात नैतिकतेची पातळी खालावल्याने झाली असे ज्यांना वाटते त्यांची लोकपालाने काहीही साध्य होणार नाही, अशी धारणा आहे. त्यासाठी जनजागरण करून जनतेत उच्च कोटीची नैतिकता रुजविली पाहिजे असे त्यांना वाटते.

मला मात्र तसे वाटत नाही. कठोर जनलोकपाल आणल्याने किंवा नैतिकतेची पातळी उंचावल्याने अंशत: भ्रष्टाचाराला आळा बसेल; परंतु आर्थिक भ्रष्टाचार पूर्णत: नियंत्रणात येऊच शकणार नाही. कारण मनुष्यस्वभावातच विविधता भरली आहे. आर्थिक भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने विचार केल्यास मनुष्यस्वभावाचे ढोबळमानाने चार प्रकारांत वर्गीकरण करता येईल.

अ) काही व्यक्ती निष्कलंक चारित्र्याच्या असतात. त्यांना नैतिकतेची चाड असते आणि त्यांच्या मनात समाजाविषयीचा सन्मानही असतो.

ब) काही व्यक्ती समाजाला व कायद्याला भीत नाहीत पण नैतिकतेला सर्वोच्च स्थान देतात.

क) काही व्यक्तींच्या आयुष्यात नैतिकतेला अजिबात स्थान नसते; पण कायद्याला अत्यंत घाबरणाऱ्या असतात.

ड) मात्र व्यक्तींचा एक वर्ग असाही असतो की तो कशालाच जुमानत नाही. ना नैतिकतेला ना कायद्याला. नैतिकतेला आणि कायद्याला न जुमानणारा वर्ग कायमच स्वार्थ साधण्यासाठी संधीच्या शोधात असतो. नानाविध क्लृप्त्या लढवत असतो, कायद्यातील पळवाटा शोधून आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा सतत प्रयत्न करत असतो.

अ आणि ब वर्गप्रकारातील व्यक्ती स्वमर्जीनेच वाममार्गाने जाण्याचे टाळतात. त्यांचा स्वत:वर ताबा असतो. त्यांना ऐहिक किंवा भौतिक सुखापेक्षा आत्मसुख महत्त्वाचे वाटते. अशा व्यक्ती भ्रष्टाचाराशी दुरान्वयानेही आपला संबंध येऊ देत नाही; पण ह्या व्यक्ती राजकारणात किंवा प्रशासनात जायचे टाळतात. उच्च आदर्श घेऊन राजकारणात गेल्याच तर आजच्या काळात हमखास अयशस्वी होऊन अडगळीत फेकल्या जातात. उच्च आदर्श घेऊन प्रशासनात वावरताना अशा व्यक्तींची पुरेपूर दमछाक होते. प्रशासनात एकलकोंडी किंवा निरर्थक भूमिका वाट्याला येते. इतरांप्रमाणे भ्रष्टाचारात सामील होता येत नसल्याने वारंवार प्रशासकीय बदल्यांना सामोरे जावे

लागते. या व्यक्ती स्वत:हूनच भ्रष्टाचार करीत नसल्याने यांना कायदा किंवा नैतिकता शिकविण्याची गरजही उरत नाही.

ब वर्गप्रकारातील व्यक्तींना नैतिकतेचे धडे देऊन किंवा कायद्याचा धाक दाखवून भ्रष्टाचारापासून रोखले जाऊ शकते. मग नैतिकता कोणी कुणाला शिकवायची याचा विचार करणे आवश्यक ठरते. ज्ञानदेव, तुकारामांचा काळ संपल्यानंतर गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यांच्यासारखे थोडेफार अपवाद वगळले तर नैतिकतेची शिकवण देणाऱ्या लोकशिक्षकांची पिढीच लयास गेली आहे. शाळा-महाविद्यालयीन अभ्यासक्रमात नैतिकतेची शिकवण हा उद्देशच निकाली काढण्यात आला आहे. शासकीय किंवा निमशासकीय शिक्षण संस्थेला लाच दिल्याशिवाय शिक्षकाची किंवा प्राध्यापकाची नोकरीच मिळत नसेल तर मग अशा परिस्थितीत आजच्या युगातील गुरू किंवा गुरुकुलाच्या स्थानी निर्माण झालेल्या शिक्षणसंस्था कोणत्या तोंडाने विद्यार्थ्यांना नैतिकतेचे धडे देणार, याचाही विचार झाला पाहिजे. अशा नीतिमत्ता गमावलेल्या शिक्षणव्यवस्थेत शिकून बाहेर पडणारा ब प्रकारातील मनुष्यस्वभाव असलेला विद्यार्थी प्रशासनात गेला किंवा राजकारणात गेला तर तेथे भ्रष्टाचारापासून अलिप्त राहील अशी कल्पनाच करणे मूर्खपणाचे ठरते; पण ब प्रकारच्या व्यक्ती कायद्याला घाबरणाऱ्या असल्याने कठोर कायद्याने आणि त्याच्या अंमलबजावणीने वठणीवर येऊ शकतात. त्यांच्यासाठी कठोर जनलोकपालासारखा कायदा रामबाण इलाज ठरू शकतो.

ड प्रकारातील व्यक्ती मात्र नैतिकता आणि कायदा दोहोंनाही घाबरत नाही. नैतिकता बासनात गुंडाळून कायद्याला हवे तसे वाकविण्यात ही मंडळी तरबेज असतात. आज भ्रष्टाचाराने जे उग्र रूप धारण केले आहे त्याचे खरेखुरे कारण येथेच दडले आहे.

उच्च शिक्षण घेणे आणि प्रशासनात नोकरी मिळविणे, या दोन्ही प्रकारांमध्ये पाय रोवण्याचा आधारच जर गुणवत्तेपेक्षा आर्थिक प्रबळतेवर आधारलेला असेल तर तेथे नैतिकतेची भाषा केवळ दिखावाच ठरत असते, हे मान्य केलेच पाहिजे.

### प्रचलित व्यवस्थेत भ्रष्टाचाराची अनिवार्यता

आज राजकारणदेखील अत्यंत महागडे झाले आहे. तुरळक अपवाद वगळले तर खासदारकीची निवडणूक लढायला कोट्यवधी रुपये खर्च केला जातो. खर्च करण्याच्या बाबतीत उमेदवार आठ-नऊ-दहा अंकी संख्या पार करतो, हे आता लपून राहिलेले नाही. ज्याला राजकारणात जायचे असेल त्याला प्रथम बऱ्यापैकी माया जमविल्याखेरीज राजकारणात जाण्याचे स्वप्नही पाहता येत नाही. राजकारणात जाणे दूर; केवळ स्वप्न पाहायचे असेल तरी माया जमविण्यासाठी भ्रष्टाचार करणे अपरिहार्य आणि

अनिवार्य झाले आहे.

लोकशाहीच्या मार्गाने देशातील सर्वच नागरिकांना निवडणुका लढण्याचे अधिकार आहेत, हे वाक्य उच्चारायला सोपे आहे; पण निवडणूक लढवायची झाल्यास भारतातील नव्वद टक्के जनतेकडे कोट्यवधी रुपये आहेत कुठे? राजकारण आणि सत्ताकारणावर कायमची मजबूत पकड ठेवण्यासाठी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून प्रस्थापित व्यवस्थेकडे एवढे प्रचंड आर्थिक पाठबळ तयार झाले आहे की, आता देशातील नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त जनतेचे राजकारणाकडे जाणारे सर्व रस्ते बंद झाले आहेत.

म्हणून भ्रष्टाचार नियंत्रण किंवा भ्रष्टाचारमुक्तीचा विचार करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की शासन आणि प्रशासनावर घट्ट पकड ठेवून असलेले सर्व प्रस्थापित हे ड या वर्गप्रकारातीलच आहे. यांना नैतिकतेचे धडे शिकवणे जसे उपयोगाचे नाही तसे कठोर कायदे करूनही फारसा उपयोग नाही, कारण कायदे बनविणारेही तेच, कायदे राबविणारेही तेच आणि सोयीनुसार कायद्याला हवे तसे वाकविणारेही तेच; असा एकंदरीत मामला आहे.

**नेता तस्कर, गुंडा अफसर**

सर्व बाजूंनी विचार करता एक मुद्दा सहज उलगडत जातो की केवळ नैतिकतेची शिकवण देऊन किंवा कठोर कायदे केल्याने भ्रष्टाचार आटोक्यात येण्याची शक्यता नाही. नैतिकता आणि कायदे यांनाही काही मर्यादा आहेत, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात म. गांधींचा स्वदेशी - गांधीवाद बासनात गुंडाळून नेहरूनीतीचे या देशाच्या शासकीय व्यवस्थेवर रोपण करण्यात आले. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याऐवजी सत्तेच्या केंद्रीकरणाला चालना देण्यात आली. लायसन्स-कोटा-परमिटचे राज्य प्रस्थापित करण्यात आले. देशातल्या ९०-९५ टक्के लोकांना अजिबात अक्कल नाही, असे गृहीत धरून या ९०-९५ टक्के सामान्य जनतेवर पुढारी आणि सरकारी नोकरांचे पावलोपावली नियंत्रण लादण्यात आले. त्यातूनच देशाला विकासाकडे नेण्याची आणि देशाचा गाडा सक्षमपणे चालविण्याची पात्रतेसहित अक्कल केवळ पुढारी व नोकरशहा यांनाच आहे; उर्वरित ९०-९५ टक्के आम जनता केवळ निर्बुद्ध, देशबुडवी, तंटेखोर, करबुडवी आहे, अशा तऱ्हेचे विचित्र जनमानस या देशात तयार झाले. पुढारी किंवा नोकरशाही यांची रीतसर परवानगी मिळविल्याशिवाय ९०-९५ टक्के आम जनतेला काहीही करता येत नाही, असे चित्र तयार झाले. आम जनता दुर्बल आणि मूठभर राज्यकर्ते-नोकरशाही प्रचंड शक्तिशाली असे समीकरण निर्माण झाले. स्वातंत्र्योत्तर काळात सारे अधिकार नोकरशाहीच्या अखत्यारीत गेलेले आहेत. काहीही करण्यासाठी पुढे पाऊल टाकायचे म्हटले तर पावलोपावली नोकरशाही आडवी येते. शेती करायची असो की व्यापार, उद्योग करायचा असो की

स्वयंरोजगार, ही नोकरशाही जागोजाग अडवणुकीसाठी ठाण मांडून बसलेली आढळते. अगदी स्वत:चे घर स्वत:चे जागेवर बांधायचे ठरवले तरी कागदपत्रांच्या जंजाळाला तोंड द्यावे लागते. ही नोकरशाही कधीच कोणाला कसलीच मदत करीत नाही. उलट आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे सांत्वन करण्याऐवजी पॅकेजवर डल्ला मारून जाते. वाहन कसे चालवायचे याचे शिक्षण देत नाही मात्र लायसन्स देण्यासाठी उकळता येईल तेवढा निधी उकळते. नोकरशाहीचा प्रत्येक विभाग याच तऱ्हेने चालतो. आमदार-खासदार-मंत्री दर पाच वर्षांने बदलत राहतात. त्यांच्या मालमत्तेचे आकारमान व घनता दोन्ही बदलत जाते; पण आम जनतेचे नशीब काही केल्या बदलत नाही. सरकारे बदलतात पण सरकारी ध्येयधोरणे आहेत तीच कायम राहतात. सत्ताधारी बदलतात पण सत्ता बदलत नाही म्हणून आमजनतेचे प्रश्नही निकाली निघत नाही. सत्तेकडे जाणारी पावले जनसेवा करण्याच्या उद्देशाने नव्हे तर सत्तेत असलेल्या मलिद्यांच्या आकर्षणाने सत्तेकडे आकर्षित होतात, हे मूलभूत तत्त्व मान्य केल्याखेरीज आणि त्या अनुरूप उपाययोजना केल्याखेरीज भ्रष्टाचाराचा प्रश्न निकाली निघणे केवळ अशक्य आहे.

Government can solve no problem, In fact, Government is the problem.

लायसन्स-कोटा-परमिटच्या अतिरेकामुळे राजकारणी आणि प्रशासकीय मंडळींना चरण्यासाठी मोठे कुरण उपलब्ध झाले आहे. टप्प्याटप्प्यांवर निर्माण झालेल्या शासकीय चारा केंद्रांवर अंकुश लावण्यासाठी जोपर्यंत धोरणात्मक पावले उचलण्यात येत नाहीत तोपर्यंत भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणे कठीण आहे. अण्णा हजारेंचे भ्रष्टाचारविरोधातील आणि जनलोकपाल विधेयकाच्या समर्थनार्थ सुरू असलेले आंदोलन या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे एवढेच म्हणता येईल. टीम अण्णाला जनलोकपाल विधेयकाच्या मसुद्याखेरीज करावयाच्या अन्य उपाययोजनांबद्दल अजूनही नीटशी मांडणी करता आलेली नाही. गरजेनुसार वेळोवेळी टीम अण्णा वेगवेगळे विचार मांडतात, त्यांच्या विचारांत एकजिनसीपणा फारसा आढळत नाही, हे अनेक वेळा सिद्ध झालेले आहे. दर वर्षाला चाळीस हजार कोटीपेक्षा जास्त भ्रष्टाचार असलेल्या रेशन व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्यात त्यांना स्वारस्य नाही, हेही दिसून आले आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधात जनमानस तापविण्याचे मोठे कार्य अण्णांनी केले आहे हे जरी खरे असले तरी केवळ जनलोकपाल विधेयकामुळे भ्रष्टाचार आटोक्यात येईल, हा कल्पनाविलास आहे. भ्रष्टाचार संपविण्यासाठी प्रथम लायसन्स-कोटा-परमिटचे राज्य संपवणे गरजेचे आहे; पण नेमका हाच मुद्दा सोडून बाकी अवांतर मुद्द्यांवरच चर्चा केली जात आहे. घरभर गूळ आणि साखर

अस्ताव्यस्त पसरवून द्यायची, मग मुंग्यांना साखर खाण्यापासून रोखण्यासाठी एक यंत्रणा निर्माण करायची. माशांना हाकलण्यासाठी दुसरी यंत्रणा निर्माण करायची. मुंगळे अडवण्यासाठी तिसरी यंत्रणा निर्माण करायची. या यंत्रणांना मुंग्या-माशां-मुंगळ्यांना अडवण्यात यश येत नाही असे दिसले की चौथी यंत्रणा उभारण्याची मागणी करायची, असा सारा हा प्रकार चाललेला आहे. गूळ किंवा साखर हवाबंद डब्यात ठेवली की मुंग्या-माशांना सहज चरण्यासाठी उपलब्ध असणारे केंद्र आपोआप नष्ट होते आणि प्रश्न सहजगत्या निकाली निघतो. अगदी त्याच धर्तीवर भ्रष्टाचार नियंत्रित करण्यासाठी भ्रष्टाचाराचा उगम आणि शक्तिशाली केंद्रे शोधून ती नष्ट केली पाहिजेत तरच भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे; पण माशा-माकोडे हाकलण्याच्या नावाखाली या यंत्रणांनाच गुळा-साखरेवर डल्ला मारायचा असल्याने ते सहजासहजी कोणत्याही व्यवस्था बदलाला राजी होतील, अशी शक्यता आज तरी दिसत नाही.

■■

# आता गरज पाचव्या स्तंभाची

सन २००९मध्ये केंद्र सरकारने देशातील शेतकऱ्यांसाठी सुमारे ७० हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केली तेव्हा बुद्धिजीवी अर्थतज्ज्ञांनी एकच गलका केला होता. त्यांच्या मतानुसार ७० हजार कोटी एवढी प्रचंड रक्कम शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात वाया घालवली तर हा देश बुडणार होता. दोन वर्षांपेक्षा जास्त काळ उलटला; पण अजून देश काही बुडला नाही. समुद्राच्या पाण्याखाली दक्षिण भारताचा काही भाग बुडण्याची शक्यता निर्माण झाली होती; पण ती त्सुनामीमुळे, कर्जमाफीमुळे नाही. बुद्धिप्रामाण्यवादी अर्थतज्ज्ञांच्या मतानुसार एवढी प्रचंड रक्कम शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात घालवली तर या देशाची अर्थव्यवस्था कोलमडणार होती किंवा कोसळणार होती, नाहीतर ढासळणार तर नक्कीच होती; पण अर्थव्यवस्था कोसळून त्याखाली गुदमरून काही जीवितहानी किंवा कोणी दगावल्याची खबर निदान माझ्यापर्यंत तरी अजून पोहोचलेली नाही.

खरं तर एकदा काहीतरी कोसळायलाच हवे. काहीच कोसळायला तयार नसेल तर निदान अर्थव्यवस्था तरी कोसळायला हवी आणि त्या ओझ्याखाली दबून व चेंगरून या देशातले भ्रष्टाचारी शासनकर्ते, संवेदनाहीन प्रशासनकर्ते व त्यांचे सल्लागार अर्थतज्ज्ञ नियोजनकर्ते नाहीच दगावले तरी हरकत नाही; पण निदान काही काळ तरी यांचे श्वास नक्कीच गुदमरायला हवे, असे आता मला मनोमन वाटायला लागले आहे. कारण अर्थव्यवस्था बळकट असल्याचा नियोजनकर्त्यांनी कितीही आव आणला तरी आवश्यक त्या बिंदूवर ही अर्थव्यवस्था अत्यंत दुर्बल आहे, याची आता माझ्यासारख्या अर्थशास्त्र विषयाचा लवलेशही नसलेल्यांना खात्री पटू लागली आहे. देशाच्या आरोग्याच्या सुदृढ आणि निकोप वाढीसाठी ही अर्थव्यवस्था कुचकामी व अत्यंत निरुपयोगी आहे. सर्वांना मोफत शिक्षण पुरविण्याची, सर्वांना आरोग्य पुरविण्याची, बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्याची, हाताला काम मिळण्यासाठी नवनवे पर्याय उपलब्ध करून देण्याची, दारिद्र्यरेषेखालील जनतेला दारिद्र्यरेषेच्या

वर आणण्याची, शेतीची दुर्दशा घालविण्याची या अर्थव्यवस्थेत अजिबात इच्छाशक्ती उरलेली नाही. यापैकी एकही प्रश्न मार्गी लावायचा म्हटले तर त्यासाठी या अर्थव्यवस्थेच्या तिजोरीत ठणठणाट आहे आणि तसा प्रयत्न करायची भाषा केल्याबरोबरच अर्थव्यवस्था कोसळायची भीती उत्पन्न व्हायला लागते, हेही नित्याचेच झाले आहे.

मात्र ही अर्थव्यवस्था नको तिथे आणि चुकीच्या बिंदूवर अत्यंत बळकट आहे. शासनाचे आणि प्रशासनाचे ऐषोआराम पूर्ण करायचे म्हटले की ही अर्थव्यवस्था अत्यंत दणकट वाटायला लागते. आमदार-खासदार-मंत्र्यांची पगारवाढ किंवा भत्तेवाढ करताना किंवा सहावा-सातवा-आठवा वेतन आयोग लागू करताना अर्थव्यवस्था कोसळायचे बुजगावणेही कधीच उभे केले जात नाही आणि ते खरेही आहे कारण अर्थव्यवस्था बळकट केवळ याच बिंदूवर आहे. शिवाय सरकारी तिजोरीच्या चाब्याही नेमक्या अर्थव्यवस्थेच्या याच बळकट बिंदूवर ज्यांची वर्दळ आहे, त्यांच्याच हातात आहेत. त्यामुळे साहजिकच आर्थिक भ्रष्टाचाराच्या गंगोत्रीचा उगमही याच बिंदूपासून होतो, हे समजून घेणे गरजेचे आहे. बहुतांश बुद्धिजीवी, विचारवंत, अर्थतज्ज्ञ, शासक आणि प्रशासक हे या गंगोत्रीचे लाभधारक असल्याने ही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत असतात. यांचे चालणे, बोलणे, वागणे आणि लिहिणे प्रस्थापित व्यवस्थेला पूरक असेच असते. यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे असतात. त्यामुळे सत्य कधीच बाहेर येत नाही. याचा अर्थ एवढाच की शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ७० हजार करोड खर्च केल्याने देश बुडाला नाही, अर्थव्यवस्था कोसळली नाही किंवा याच कारणामुळे महागाईही वाढली नाही; पण खरेखुरे वास्तव जाणीवपूर्वक दडवून ठेवले जाते.

स्वातंत्र्यानंतरच्या संपूर्ण काळात केंद्र शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी खर्च केलेल्या रकमांची एकत्रित बेरीज केली आणि या रकमेला शेतीवर जगणाऱ्या लोकसंख्येच्या संख्येने भागले तर ही रक्कम काहीकेल्या दरडोई हजार-दीड हजार रुपयांच्यावर जात नाही. याचा स्पष्ट अर्थ एवढाच होतो की स्वातंत्र्यानंतरच्या प्रदीर्घ काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी म्हणून केवळ दरडोई हजार-दीड हजार रुपयेच मिळाले. मग प्रश्न उरतो हजार-दीड हजार रुपयांचे मोल किती? ही रक्कम आमदार, खासदार यांच्या एका दिवसाच्या दरडोई भत्त्यापेक्षा कमी आहे. प्रथम श्रेणी कर्मचाऱ्याच्या एका दिवसाच्या पगारापेक्षा कमी आहे, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याच्या दरडोई दिवाळी बोनसपेक्षा कमी आहे आणि महत्त्वाचे म्हणजे वाममार्गाने सरकारी तिजोरीतून पैसे उकळून एक मंत्री दोन तासामध्ये पिण्यासाठी जेवढी रक्कम खर्च करतो, त्यापेक्षा तर फारच कमी आहे. म्हणजे दरडोई मंत्र्याच्या पिण्यावर दोन तासांसाठी सरकारी तिजोरीतून जेवढा खर्च होतो, त्यापेक्षाही कमी दरडोई खर्च शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी

गेल्या साठ वर्षांतही झालेला नाही; पण हे कोणी विचारात घ्यायलाच तयार नाही.

शेतकऱ्याला सरकारकडून अनुदान किंवा कर्जमाफीच्या स्वरूपात खूपच काही दिले जाते, असा एक भारतीय जनमानसात गैरसमज पोसला गेला आहे. काय दिले जाते? असा जर उलट सवाल केला तर वारंवार रासायनिक खतावर भरमसाठ सबसिडी दिली जाते याचाच उद्घोष जाणकारांकडून केला जातो. एवढ्या एका उदाहरणाच्यापुढे त्यांच्याही मेंदूला पंख फुटत नाहीत आणि बुद्धीही फारशी फडफड करीत नाही. ही रक्कम पन्नास हजार कोटींच्या आसपास असल्याचे सांगितले जाते; पण ही रक्कम थेट शेतकऱ्यांना दिली जात नाही, खते उत्पादक कंपन्यांना दिली जाते. संधी मिळेल तेथे-तेथे पार मुळासकट खाऊन टाकणाऱ्यांच्या देशात ५० हजार कोटींपैकी बनावट कागदपत्रांच्या आधारे परस्पर किती रक्कम हडप केली जाते आणि शेतीतल्या मातीपर्यंत किती रक्कम पोहोचते, हा एक संशोधनाचा विषय ठरावा. या देशातल्या रासायनिक खते उत्पादन करणाऱ्या कंपन्या आणि कंपन्यांना अनुदान वाटप करणारी प्रशासकीय यंत्रणा अत्यंत सज्जन, शीलवान व चारित्र्यवान आहे, तेथे आर्थिक भ्रष्टाचाराला अजिबात थारा नाही, असे जरी गृहीत धरले तरी ही रक्कम शेतकऱ्यासाठी दरडोई शे-पाचशेपेक्षा अधिक दिसत नाही. शिवाय ही रक्कम म्हणजे निलंबित केलेल्या कर्मचाऱ्याला काहीच काम न करता निलंबन काळात फक्त रजिस्टरवर सही करण्यासाठी एक दिवसाच्या पगारावर शासकीय तिजोरीतून जेवढी रक्कम खर्च होते त्यापेक्षा कमीच आहे.

या प्रचलित अर्थव्यवस्थेचे खेळच न्यारे आहेत. रासायनिक खतांच्या सबसिडीच्या नावाखाली कंपन्या आणि संबंधित शासक - प्रशासकांचे उखळ पांढरे होते. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या नावाखाली बँकांची कधीच वसुली होऊ शकणार नव्हती अशी बुडित निघालेली कर्जे वसूल होतात. शेतीविषयक वेगवेगळ्या अनुदानावर राजकारणी डल्ला मारून जातात. नाव शेतकऱ्यांचे आणि चंगळ करतात इतरच! शेतकऱ्याची ओंजळ रिकामीच्या रिकामीच राहते.

हे खरे आहे की स्वातंत्र्यपूर्व काळातही शेतकऱ्याला काहीच मिळत नव्हते; पण शेतकऱ्यांचे नाव घेऊन हजारो कोटी रुपये शासकीय तिजोरीतून उकळून त्यावर अवांतर बांडगुळे नक्कीच पोसली जात नव्हती. स्वातंत्र्य असो की पारतंत्र्य, राजेशाही असो की लोकशाही, व्यवस्था कोणतीही असो शेतकरी उपेक्षितच राहिला आहे. स्वातंत्र्य मिळूनही आणि लोकशाही शासनव्यवस्था येऊनही शेतकरी दुर्लक्षितच का राहिला, याची काही कारणे आहेत.

विधिमंडळ, न्यायपालिका, प्रशासन आणि प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे चार प्रमुख आधारस्तंभ मानले जातात; पण शेतकऱ्यावाचून या चारही आधारस्तंभांचे

काहीच अडत नाही. शेतकऱ्यांकडे अशी कोणतीच शक्ती वा अधिकार नाही की या चारही स्तंभांना शेतकऱ्यांची काही ना काही गरज पडावी आणि ज्यांची कुठेच, काहीच गरज पडत नाही तो अडगळीत जाणार हे उघड आहे. नाही म्हणायला शेतकऱ्याकडे काही अस्त्रे आहेत; पण ती वापरण्याइतपत त्याच्यात पक्वता आलेली नाही.

**विधिमंडळ :** लोकशाहीमध्ये मतपेटीच्या माध्यमातून विधिमंडळ अस्तित्वात येते. तेथे मताचा योग्य तऱ्हेने वापर करणे गरजेचे असते; पण दुर्दैवाने आपल्या देशात उमेदवाराच्या योग्य-अयोग्यतेच्या, विकास कामांच्या, अर्थविषयक धोरणांच्या आधारावर, प्रश्न सोडविण्याच्या पात्रतेच्या आधारावर मतदान करायचे असते, ही भावनाच अजूनपर्यंत रुजलेली नाही किंवा तसा कोणी प्रयत्नही करत नाही. या देशातला किमान सत्तर-ऐंशी टक्के मतदार तरी निव्वळ जातीपाती, धर्म-पंथाच्या आधारावरच मतदान करतो, ही वास्तविकता आहे. जेथे सुसंस्कृत-असंस्कृत, सुशिक्षित-अशिक्षित, सुजाण-अजाण झाडून सर्वच वर्गातील माणसे मतदान करताना धर्मासाठी कर्म विकतात आणि जातीसाठी माती खातात, तेथे शेतकरी आपला हक्क मिळविण्यासाठी मतदानाच्या अधिकाराचा शस्त्रासारखा वापर करतील, हे कदापि घडणे शक्य नाही. कारण समाज हा नेहमीच अनुकरणप्रिय असतो. एकमेकांचे अनुकरण करीतच वाटचाल करीत असतो. त्यामुळे शेतकरी जात-पात-धर्म-पंथ सोडून न्याय्य हक्क मिळविण्याच्या आधारावर योग्य त्या व्यक्तीला किंवा पक्षालाच मतदान करेल, अशी शक्यता निर्माण होण्याचीही शक्यता नाही आणि त्यामुळे शेतकरी वर्गाची मते गमावण्याच्या भितीने विधिमंडळ धोरणात्मक निर्णय घेताना शेतकरी हित प्रथमस्थानी ठेवतील, अशी दूरवरपर्यंत संभाव्यता दिसत नाही.

विधिमंडळात जायचे असेल तर निवडून यावे लागते आणि निवडून यायला प्रचंड प्रमाणावर पैसा लागतो, पक्षाचा आशीर्वाद लागतो. ज्याचा खर्च जास्त तो उमेदवार स्पर्धेत टिकतो. निवडणुका जिंकण्यासाठी वापरला जाणारा पैसा उमेदवाराने किंवा त्याच्या पक्षाने कुदळ-फावडे हातात घेऊन रोजगार हमीची कामे करून मिळवलेला नसतोच. त्यामुळे सढळ हस्ते दान करणाऱ्या दानशूरांची सर्व उमेदवारांना व राजकीय पक्षांना गरज भासते. परिणामत: जिंकून येणाऱ्या उमेदवारावर आणि पक्षावर निधी पुरविणाऱ्यांचाच दरारा असतो. शेतकरी मात्र मुळातच कंगाल असल्याने उमेदवारांना किंवा राजकीय पक्षांना आर्थिक दान देऊन त्यांच्यावर वचक ठेवण्याची संधी गमावून बसतो.

म्हणूनच शेतकरी या लोकशाहीच्या पहिल्या स्तंभाला काहीच देऊ शकत नसल्याने त्याच्या पदरातही मग काहीच पडत नाही.

**न्यायपालिका :** स्वमर्जीने किंवा सत्य-असत्याच्या बळावर न्यायपालिका न्याय देऊ शकत नाही. विधिमंडळाने केलेले कायदे हाच न्यायपालिकेच्या न्यायदानाचा प्रमुख आधार असतो. संविधानातील परिशिष्ट नऊ हे शेतकऱ्यांचे मूलभूत हक्क पायदळी तुडविणारे कलम आहे, अशी न्यायपालिकेची खात्री झाली तरी काहीच उपयोग नाही. न्यायपालिका संविधानाशी बांधील असल्याने शेतकरी हित जोपासण्यात हतबल आणि असमर्थ ठरत आहेत. शेतकऱ्यांना चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारणी करू नये किंवा मुद्दलाच्या रकमेपेक्षा व्याजाची रक्कम अधिक असू नये, असा दामदुपटीविषयीचा आदेश असूनही, कोणत्याही बँकेने आजपर्यंत त्याची अंमलबजावणी केली नाही. तरीही असा आदेश पायदळी तुडविणाऱ्या बँकांना न्यायपालिका वठणीवर आणू शकल्या नाहीत.

शिवाय आता न्याय मिळविणे अतिमहागडे झाले असून न्याय मिळविण्यासाठी येणारा खर्च शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर गेला आहे.

**प्रशासन :** शेतकऱ्यांविषयी प्रशासनाची भूमिका काय असते याविषयी न बोललेलेच बरे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासन कुठेच दिसत नाही. शेतीच्या भल्यासाठी प्रशासन राबताना कधीच दिसत नाही. खालच्या स्तरावरून वरच्या स्तरापर्यंत कोणत्याही कर्मचाऱ्याला भेटायला जायचे असेल तर खिशात पैसे घेतल्याशिवाय घरून निघताच येत नाही, अशी परिस्थिती आहे. ही मंडळी सर्व सरकारी योजना खाऊन टाकतात. आत्महत्याग्रस्त भागासाठी दिलेले पॅकेजही या मंडळींनी पार गिळंकृत करून टाकले.

अशा परिस्थितीत प्रशासनाकडून शेतीच्या समस्या सुटतील असा आशावाद बाळगणे म्हणजे उंदराच्या विकासासाठी मांजरीची नेमणूक करण्यासारखेच ठरते.

**प्रसारमाध्यमे :** शेतीच्या दुर्दशेला थोडीफार वाचा फोडण्याचे नित्यनेमाने प्रयत्न प्रसारमाध्यमांकडूनच होत असतात; पण प्रसारमाध्यमांच्याही काही मर्यादा आहेच. माध्यम चालवायला आर्थिक स्रोत लागतात. जाहिरात आणि अंक विक्री किंवा सबस्क्रिप्शन हे माध्यमांचे प्रमुख आर्थिक स्रोत बनलेले आहेत. जाहिराती देणाऱ्यांमध्ये खुद्द शासन, खासगी कंपन्या, वेगवेगळ्या संस्था असतात. शेतकऱ्याला जाहिरात द्यायची गरजच नसते किंवा तसे आर्थिक पाठबळही नसते. अंक विकत घेण्यामध्ये किंवा पेड टीव्ही चॅनेल पाहण्यामध्येही शेतकरी फार फार मागे आहेत. स्वाभाविकपणे पेपर विकत घेऊन वाचणारा वृत्तपत्राचा वाचकवर्गही बिगरशेतकरीच असल्याने वृत्तपत्रातले शेतीचे स्थानही नगण्य होत जाते. मग कृषिप्रधान देशातल्या महत्त्वाच्या कृषिविषयक बातम्या आगपेटीच्या आकारात शेवटच्या पानावरील शेवटच्या रकान्यात आणि ऐश्वर्या रॉयच्या गर्भारशीपणाच्या बातम्या पहिल्या पानावर पहिल्या रकान्यात

इस्टमनकलरमध्ये झळकायला लागतात.

शेवटी हा सारा पैशांचा खेळ आहे. शेतकऱ्यांकडे पैसा नाही म्हणून त्याची कोणी दखल घेत नाही. दखल घेत नाही म्हणून शेतीची दशा पालटत नाही आणि शेतीची दशा पालटत नाही म्हणून पुन्हा शेतीमध्ये पैसा येत नाही, असे दुष्टचक्र तयार होते आणि हे दुष्टचक्र एकदा तरी खंडित करून शेतीमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याची ऐपत लोकशाहीच्या या चारही आधारस्तंभांत किंचितही उरलेली नाही, हे पचायला जड असले तरी निर्विवाद सत्य आहे.

त्यामुळे शेतीमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आता पाचव्या स्तंभाची नितांत आवश्यकता आहे, असे म्हणावे लागते.

■■

# शेतीची सबसिडी आणि पगारी अर्थतज्ज्ञ

**सबसिडी कुठाय?**

गेल्या अनेक वर्षांपासून मी ऐकत आलोय की शेतीला भरमसाठ सबसिडी दिली जाते. शाळा-कॉलेजात शिकत असताना पहिल्यांदा शेतीची सबसिडी हा शब्द ऐकण्या-वाचण्यात आला. अगदी तेव्हापासून मी शेतीत सबसिडी कुठे आहे म्हणून शोधण्यासाठी जीवाचा आटापिटा करत बसलोय; पण मला काही केल्या ही गवसतच नाहीये. तळहातावरच्या केसासारखीच ही शेतीची सबसिडीसुद्धा अदृश्य स्वरूपात अस्तित्वात असते की काय किंवा मीच तर अंधाऱ्या खोलीत नसलेले काळे मांजर शोधत बसलो नाही ना? असे प्रश्न आजकाल माझे मलाच पडायला लागले आहेत. शिवाय शेतीला सबसिडी आहे, ही बाब निखालस खोटी आहे असे म्हणण्याचे धाडसही मी करू शकत नाही कारण शेतीची सबसिडी हा शब्द उच्चारणारी माणसे सामान्य नसतात. सर्वसाधारण माणसे या शब्दाचे उच्चारण करीत नाहीत.

शेतीला भरमसाठ सबसिडी दिली जाते या विषयावर बोलणाऱ्यांची नावे बहुधा वजनाने हलकी नसतात. त्यांच्या नावासमोर प्रा., डॉ., ॲड., बॅ., कॉ., मा., ना. यांपैकी काही ना काहीतरी लागलेले असतेच आणि जर का यापैकी काहीही नसलेच तर त्या व्यक्तीची तज्ज्ञ, पत्रकार, लेखक किंवा थोर मानसेवी समाजसेवक म्हणून समाजाने ओळख तरी मान्य केलेली असतेच. ही माणसे जे काही बोलतात तेच प्रमाण मानण्याची अनुकरणीय शिकवण आमच्यासारख्या दळभद्री सामान्य जनांना आमच्या पालकांकडून आणि शाळा-कॉलेजातील पगारी गुरुवर्यांकडून मिळालेली असल्याने 'अगर तुम दिन को रात कहो, तो हम रात कहेंगे' असे म्हणण्याखेरीज अन्य काही पर्यायही आमच्यासमोर उपलब्ध नसतो.

आम्हाला जे काही शिकविले जाते, ते शिकविणाऱ्याने पुस्तक वाचून शिकविलेले असते. पुस्तकात जे लिहिले आहे, ते वास्तवाला धरून आहे की निव्वळ कल्पनाविलासाचे

मनोरे आहेत याची शहानिशा त्याने केलेली नसतेच किंबहुना त्याला तसा अधिकारही नसतो. शिवाय ज्याने पुस्तक लिहिले ते त्या विषयातले अनुभवसमृद्ध व्यक्तिमत्त्व असतेच असेही नाही. एखाद्या विषयाच्या अभ्यासाला अनुभूतीची जोड मिळविण्यासाठी वणवण भटकून, विषयाच्या खोलात शिरून, वास्तविक जीवनमानाशी ताळमेळ जुळविण्याकरिता आयुष्यातील पाच-पंचवीस वर्षे खर्ची घातली आणि मग त्या अनुभव-अनुभूतीशी वैचारिक सांगड घालून पुस्तक लिहिले, असेही घडलेले नसते.

एखाद्या विषयाचे पुस्तक लिहायचे म्हणजे काय करायचे असते तर त्या विषयाशी निगडित आधीच लिहिली गेलेली पुस्तके गोळा करायची, त्या पुस्तकातील उतारेच्या उतारे उचलून नव्याने मांडणी करायची. त्यावर लेखक म्हणून आपले नाव घालायचे आणि पुस्तक छापून मोकळे व्हायचे. पुस्तकात जे लिहिले आहे त्याचे स्पष्टीकरण करता आले नाही तर नाचक्की होऊ नये म्हणून हे मी म्हणत नाही, दुसराच कोणीतरी म्हणतो असे भासवण्यासाठी पुस्तकाच्या शेवटच्या पानावर संदर्भ ग्रंथसूची छापून मोकळे व्हायचे. ही असते पुस्तके लिहिण्याची सरळसोट पद्धत आणि अशा तऱ्हेने लिहिलेली पुस्तकेच शाळा-कॉलेजात अभ्यासक्रमासाठी आधारभूत पाठ्यपुस्तके म्हणून निवडली जातात. तेच आम्ही शिकतो आणि त्याच पुस्तकी ज्ञानाच्या आधारावर स्वत:ला विषयतज्ज्ञ म्हणून मिरवत असतो.

**शेतीला सबसिडी**

शेतीला भरमसाठ सबसिडी दिली जाते. अर्थसंकल्पात भरीव तरतूद करून शेतीला मोठ्या प्रमाणावर अर्थसाहाय्य केले जाते, असा एक सरसकट सर्वांचा समज आहे आणि हा समज दृढ होण्यामागे वास्तवापासून फारकत घेतलेल्या पुस्तकी ज्ञानाचा बडेजावच प्रामुख्याने कारणीभूत आहे, असे खेदाने म्हणावे लागत आहे.

शेतीला सार्वत्रिक स्वरूपात कुठेही, कशातही आणि कोणत्याच मार्गाने थेट सबसिडी दिली जात नाही. या भारत देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात नव्याने शेती करण्यासाठी किंवा आहे त्या शेतीचा विस्तार करण्यासाठी किंवा अधिक उत्पन्न घेण्यासाठी उत्तेजन म्हणून उद्योगाला दिली जाते त्या धर्तीवर कुठलीच सबसिडी दिली जात नाही किंवा अशा तऱ्हेची शेतकऱ्यांना सरसकट सबसिडी देणारी, ज्यात देशातील एकूण शेतकरी संख्येपैकी किमान ९०-९५ टक्के शेतकऱ्यांना लाभ होईल अशा तऱ्हेची कोणतीही यंत्रणा अथवा योजना याआधीही अस्तित्वात नव्हती आणि आजही नाही.

**सबसिडी मिळते पण ती कंपन्यांना-**

शेतकऱ्यांना शेती परवडावी आणि गोरगरिबांना अन्नधान्य स्वस्तात मिळावे म्हणून शेतकऱ्याला सबसिडी दिली जाते असे वारंवार म्हटले जाते; पण हे अर्धसत्य

आहे. कारण शेतकऱ्याला किंवा शेतमालास प्रत्यक्ष सबसिडी दिली जात नाही. शेतीसाठी लागणाऱ्या काही निविष्ठा, अवजारे यांवर सबसिडी दिली जाते; पण ती शेतकऱ्यांना नव्हे तर उत्पादक कंपन्यांना दिली जाते. रासायनिक खते शेतकऱ्यांना कमी दरात उपलब्ध व्हावीत म्हणून रासायनिक खते उत्पादक कंपन्यांना केंद्र सरकार सबसिडी देते आणि या सबसिड्यांचा फायदा कंपन्यांना होतो, शेती किंवा शेतकऱ्यांना नाही.

अप्रत्यक्षपणे मिळणाऱ्या आणखी काही सबसिडी आहेत, पण त्याचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा इतर घटकांनाच जास्त होतो. जिल्हा परिषदेकडे काही शेतकी अवजारे सबसिडीवर असतात त्याचा फायदा पुढारी आणि त्यांचे हस्तक यांनाच होतो. साधा स्प्रे पंप पाहिजे असेल तर त्यासाठी जि.प. सदस्याचे अलिखित शिफारसपत्र लागते. सरसकट सर्व शेतकऱ्यांना किंवा गरजू शेतकऱ्यांना काहीही उपयोग होत नाही. शिवाय या अनुदानित अवजारांची संख्या गरजू शेतकऱ्यांच्या तुलनेत एक हजारांश किंवा एक लक्षांशदेखील नसते. त्यामुळे अशा सबसिडींचा शेतकऱ्यांना फायदा होतो असे म्हणणे शुद्ध धूळफेक ठरते.

कृषी विभागाच्या काही योजना असतात उदा. मच्छीतलाव, सिंचन विहिरी, मोटारपंप वगैरे; पण यामध्ये आदिवासी शेतकरी, भटके विमुक्त जाती-जमातीचे शेतकरी असे वर्गीकरण असते. म्हणजे या योजनेचे स्वरूप शेतकरीनिहाय नसून जातीनिहाय असते. त्यामुळे अशा योजनांमध्ये शेतकरी सोडून इतरांचीच गरिबी हटते. स्थानिक पुढारी अधिकाऱ्यांशी संगनमत करून हात ओले करून घेतात. त्यामुळे ज्याच्या शेतात विहीर नाही त्याला मोटर पंप मिळतो आणि ज्याच्या शेतीत फवारणीची गरज नाही त्याला स्प्रे पंप मिळतो. अशा अनावश्यक वस्तू फुकटात मिळाल्याने एक तर त्या जागच्या जागी गंजून जातात किंवा तो शेतकरी येईल त्या किमतीत विकून मोकळा होतो. अशा योजनांमध्येसुद्धा लाभार्थी निवडायची संख्या गरजू शेतकऱ्यांच्या तुलनेत एक लक्षांशदेखील नसते.

शासनाच्या अर्थसंकल्पात शेतीसाठी भरीव तरतूद केली म्हणून बराच गवगवा होतो; पण ती सर्व तरतूद कृषी विभागाचे कर्मचारी यांचे पगार, भत्ते, वाहनखर्च यातच खर्च होत असावी. शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतच नाही. अर्थसंकल्पात शेतीसाठी म्हणून केलेली संपूर्ण तरतूद कृषी विभाग व कृषी विद्यापीठे यांच्या व्यवस्थापनावरच खर्च होत असावी. या अर्थसंकल्पीय तरतुदींचा दुरान्वयानेही शेतकऱ्यांशी सबंध येत नाही.

दुभती जनावरे, कुक्कुटपालन, मेंढीपालन व ट्रॅक्टरसाठी वगैरे कधी कधी थोडीफार सबसिडी दिली जाते; पण याला शेतीसाठी म्हणता येणार नाही, हे शेती

संबंधित व्यवसाय आहेत. त्यामुळे याला शेतीसंबधित व्यवसायाला सबसिडी असे म्हणावे लागेल. शेतीला सबसिडी कसे म्हणता येईल? शिवाय यातही लाभधारकांचे प्रमाण एक लक्षांशदेखील नसते.

प्रत्यक्षात शेतकरी घटक म्हणून या देशात सार्वत्रिक स्वरूपात शेतकऱ्याला फुकट काहीच मिळत नाही. अशा परिस्थितीत सरसकट शेतकऱ्यांना फुकट किंवा अनुदानित खायची सवय पडली म्हणून कष्ट करण्याची प्रवृत्तीच कमी झाली असा समज करून घेण्यामागे किंवा असा समज करून देण्यामागे काय लॉजिक आहे? एकंदरीत शेतकीसंबंधित सबसिडीचा विचार करता शेतकऱ्याला काही फायदा होतो, असे दिसत नसताना, त्या तुलनेत शेतकी सबसिडीचा ज्या तऱ्हेने डंका पिटला जातो, त्याला ढोंगीपणा म्हणू नये तर काय म्हणावे?

**औद्योगिक क्षेत्राला मात्र भरमसाठ सबसिडी**

याउलट औद्योगिक क्षेत्राला मात्र भरमसाठ सबसिडी दिली जाते. लघुउद्योगांना २५ ते ३५ टक्के रोख स्वरूपात सबसिडी दिली जाते. यासाठी विविध शासकीय योजना आहेत. खादी ग्रामोद्योग, जिल्हा लघु उद्योग केंद्र किंवा यासारख्या अनेक शासकीय यंत्रणा आहेत. पंतप्रधान स्वयंरोजगार योजनेअंतर्गत लघु उद्योगासाठी २५ लाख रुपये कर्ज घेतल्यास त्यावर ३५ टक्के म्हणजे चक्क ८ लाख ७५ हजार एवढी सबसिडी दिली जाते. मोठ्या उद्योगांच्या विस्तारीकरणासाठी करोडो रुपयांची सबसिडी दिली जाते.

**वेतनधारक / जनप्रतिनिधींनाही सबसिडी**

शासकीय वेतनधारकांना श्रमाचा मोबदला म्हणून वेतन दिले जाते. आमदार-खासदार, मंत्री, जनप्रतिनिधी यांना श्रमाचा मोबदला मानधन या स्वरूपात दिला जातो. वेगवेगळे भत्ते दिले जातात. वेतन, मानधन आणि भत्ते यांना सबसिडी किंवा अनुदान मानले जात नाही; पण येथे एक बाब महत्त्वाची ठरावी ती अशी की यांना वेतन, मानधन आणि भत्ते या पोटी मिळणारी रक्कम श्रमाच्या मोबदल्याच्या तुलनेने शेकडो पटींनी जास्त असते. शासकीय कर्मचारी आणि जनप्रतिनिधींना वेतन, मानधन स्वरूपात मिळणारी प्रत्यक्ष रक्कम ही किमान वेतन कायद्यानुसार महिन्याचे एकूण कामाचे तास या हिशेबाने तयार होणाऱ्या आकड्याच्या रकमेपेक्षा कैकपटींनी जास्त असते. ही वरकड रक्कम एका अर्थाने सबसिडी किंवा अनुदान याचेच अप्रत्यक्ष रूप असते. हे मान्य करायला जड का जात आहे?

**शहरी नागरिकांनाही सबसिडी**

शेतीचे ओलीत करण्यासाठी शेतकरी शेतात स्वश्रमाने किंवा बँकेकडून वा खासगी सावकाराकडून व्याजाने कर्ज घेऊन विहीर खणतो. या कामात शेतकऱ्याला

कसलीच सबसिडी किंवा अनुदान मिळत नाही. त्यावर बँका कायदा बासनात गुंडाळून चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारणी करतात. थकबाकीदार झाला की त्याच्या शेतीचा लिलाव करून त्याला भूमीहीन करतात. शेतकऱ्याला पिण्याच्या पाण्यासाठी विहीरही स्वखर्चानेच किंवा लोकवर्गणी करूनच करावी लागते आणि जर का दुष्काळ पडून त्या विहिरी आटल्या तर आमच्या मायबहिणींना कित्येक किलोमीटर अंतरावरून डोक्यावर पाण्याच्या घागरी घेऊन पाणी आणावे लागते.

याउलट शहरी माणसाला पिण्याच्या पाण्याची सोय करताना शारीरिक श्रम करून विहीर खोदावी लागत नाही. बँकेकडून कर्ज काढून नजीकच्या नदीवरून पाईपलाईन टाकून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी लागत नाही. मायबाप सरकारच सरकारी तिजोरीतूनच अब्जावधी रुपये खर्च करून पाणीपुरवठा योजना राबवते. शहरी माणसाला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था जर स्वत:लाच करावी लागली असती तर त्याला त्याच्या कुटुंबापुरते पाणी नदीवरून आणायला काही लाख किंवा काही करोड रुपये खर्च आला असता. शिवाय पाणी शुद्धीकरणासाठी खर्च आला असता तो खर्च वेगळाच. बिगरशेतकरी वर्गाला विशेषत: शहरी नागरिकाला शासन जेवढ्या सुखसुविधा पुरविते ती एका अर्थाने अप्रत्यक्ष सबसिडीच असते. या तुलनेने शेतकऱ्याला काहीही फुकट किंवा सवलतीच्या दराने पुरवले जात नाही. उदा. बिगरशेतकरी माणसाला स्वयंपाकाचा गॅस सवलतीच्या दराने पुरवला जातो. शेतकऱ्याला स्वयंपाकासाठी लाकूड-इंधन-सरपण गोळा करायला खर्च येतो, घरात सरपण काही फुकट येत नाही, त्याला फोडायलाही खर्च येतो. त्यावर कुठे सबसिडी दिली जाते?

म्हणजे ज्यांना बराच काही लाभ होतो, त्याची साधी चर्चादेखील होत नाही. अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकात वस्तुस्थिती विशद करणारे प्रतिबिंब उमटले जात नाही आणि ज्याला काहीच दिले जात नाही, त्याला खूप काही देत आहोत असा डांगोरा पिटला जातो.

धन्य आहेत ते विद्वान महापंडित आणि आमचे पगारी अर्थतज्ज्ञ...!!

काय करावे या पगारी अर्थतज्ज्ञांचे? यांचे पाय धुवून तीर्थ प्यावे की शेतकऱ्यांनी आपल्या चामडीची पादत्राणे बनवून यांच्या पायात घालावीत? शेतकऱ्यांनी नेमके काय करावे म्हणजे या पगारी अर्थतज्ज्ञांचे पाय वास्तववादी जमिनीला लागतील?

**ताजा कलम :** माफ करा, मी विसरलो होतो, एक गोष्ट मात्र शेतकऱ्याला अगदी फुकटात मिळते.

पिळदार मिशी बाळगणाऱ्या शेतकऱ्याच्या घरात जर त्याची बायको गर्भवती असेल तर तिच्या गर्भसंवर्धनासाठी तो पिळदार मिशी बाळगणारा शेतकरी अपात्र

आहे असे गृहीत धरून आमचे मायबाप राज्यकर्ते फुकटात मूठभर लोहाच्या लाल गोळ्या तिच्यासाठी घरपोच पाठवतात, अगदी दर महिन्याला, न चुकता!

आणि आमची लंगडी, लुळी-पांगळी मानसिकता पुढाऱ्यांच्या साक्षीने टाळ्यांचा कडकडाट करते!

तुम्ही पण टाळ्या वाजवा!

बजाओ तालियाँ!!!

Once more, Take a big hand!!

■■

# कृषी विद्यापीठांना अनुदान कशाला हवे?

जेव्हा जेव्हा शेतीच्या दुर्दशेचा विषय निघतो, तेव्हा तेव्हा ज्या अनेक उपाययोजना सुचविल्या जातात, त्या योजनांपैकी कृषी विद्यापीठे आणि त्यांचे संशोधन हा एक हमखास उपाय सुचविला जातो. या सर्व तज्ज्ञांच्या मते कृषी विद्यापीठाने आजवर फार मोठे चमत्कारिक संशोधन केलेले आहे; पण ते संशोधन शेतकरीवर्गापर्यंत पोहोचत नाही किंवा पोहोचले तरी शेतकरी आळशी, अज्ञानी वगैरे असल्याने तो ते अंगिकारत नाही म्हणून त्याला शेती परवडत नाही. त्यांच्या मते कृषी विद्यापीठांनी केलेले संशोधन जर शेतीमध्ये वापरले गेले तर या समग्र भारत देशातल्या शेतीत क्रांतिकारी बदल घडून येतील आणि शेती व्यवसायाची प्रचंड भरभराट होईल.

कृषी विद्यापीठातील संशोधक, विषयतज्ज्ञ आणि स्वत: कुलगुरू यांच्याही बोलण्याचा रोख कायमच उपदेशात्मक असतो. जणू काही शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी परमेश्वराने यांना प्रेषित म्हणूनच भूतलावर जन्माला घातले आहे.

दरवर्षी या विद्यापीठांना पोसण्यासाठी शासकीय तिजोरीतून प्रचंड खर्च केला जातो. त्या बदल्यात संशोधन काय केले जाते, याचा आढावा घेणे गरजेचे आहे, अशी मात्र कोणालाच गरज भासत नाही. ऊस, केळी, ज्वारी, गहू, बाजरी, तूर, सोयाबिन वगैरे मुख्य पिकांसंदर्भात क्रांतिकारी संशोधन करण्यास किंवा त्या त्या पिकाच्या क्रांतिकारी जाती, प्रजाती अथवा संकरित वाणाचे संशोधन करण्यात अजूनही या कृषी विद्यापीठातील संशोधकांना फारसे यश आलेच नाही, याकडेही सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते.

पाऊस गरजेपेक्षा जास्त किंवा कमी पडला तरी तग धरेल, बदलत्या हवामानाचा प्रतिकार करून चांगले उत्पन्न देऊ शकेल, अशा तऱ्हेचे वाण अजूनही संशोधित करण्यात यश आलेले नाही. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीस पाऊसपाण्याविषयी अनुमान वर्तविण्यात येत असते; पण यांच्या अनुमानात आणि एकंदरीत पाऊस पडण्यात कुठेही ताळमेळ दिसत नाही. याउलट यांनी सरासरीपेक्षा जास्त पाऊस

पडेल असे भाकीत वर्तविले की हमखास त्या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडून कोरडा दुष्काळ पडतो आणि यांनी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असे भाकीत केले की त्यावर्षी अती पाऊस पडून हजारो एकर जमीन पाण्याखाली बुडून ओला दुष्काळ जाहीर करावा लागतो.

सलग दोन-तीन वर्षे पाऊस कमी पडला की शेतकऱ्यांनी प्रचंड वृक्षतोड केली म्हणून निसर्गाचा समतोल बिघडला असा घासूनपुसून गुळगुळीत झालेला एकमेव निष्कर्ष काढून ही मंडळी मोकळी होतात. त्यापुढे काही यांच्या संशोधनाची मजल जात नाही. मग शासनाच्या कृषी विभागाच्या मदतीने सरकारी पैशाने 'वृक्ष लावा-निसर्ग वाचवा', 'पाणी अडवा - पाणी जिरवा' यासारख्या प्रचारकी थाटाच्या मोहिमा हाती घेतल्या जातात. अशा मोहिमांवर प्रचंड आर्थिक खर्च केला जातो; पण ही मंडळी (साहेब असल्यामुळे) स्वत: झाडे लावत नाहीत आणि जनतेचा यांच्या शब्दावर विश्वास नसल्याने जनताही झाडे लावण्याच्या फंदात पडत नाहीत. निदान या मंडळींनी स्वत: काही झाडे लावली असती तर काही उपयोग तरी झाला असता, काही झाडे तरी लावल्या गेल्याचे समाधान मिळाले असते; पण साहेबांनी झाडे थोडीच लावायची असतात? साहेबांनी शारीरिक श्रमाची कामे करायचीच नसतात. शारीरिक श्रमाची कामे करण्यासाठी देवाने शेतकरी नावाचा प्राणी जन्माला घातला आहे, त्यानेच खड्डे खोदायचे, झाडे लावायची असा या मंडळींचा पक्का समज असतो. त्यामुळे ही मंडळी सल्ले द्यायची कामे तेवढी करीत राहतात आणि शेतकरी यांच्याकडे कुतूहलाने बघत असतात आणि यदाकदाचित काही झाडे लावली गेलीच तरी त्या झाडांचे आयुष्य फार तर महिना-दोन महिन्याचेच असते. कारण नंतर त्या झाडांच्या संगोपनाचे पालकत्व कुणाकडेच नसते.

एवढी सगळी मोहीम राबवूनही नवीन झाडे काही लावली जात नाहीत. झाडे-झुडपे-जंगल आहे तेवढेच असते. तेवढ्यातच नवा पावसाळा सुरू होतो आणि पाऊस मुसळधार कोसळायला लागतो. पाऊस एवढा कोसळतो की पाऊस पडण्याचे सर्व उच्चांक मोडीत निघतात. प्रचंड वृक्षतोडीमुळे पावसाचा तोल बिघडला या अतीअभ्यासांती काढलेल्या सिद्धांताचे बारा वाजतात.

शेती अवजारांच्या संशोधनाबद्दलही तेच. विद्यापीठांनी शेतीसाठी बहुउपयोगी अवजार बनविले आणि ते शेतीसाठी फारच उपयोगी ठरत आहे, असेही फारसे कधी घडत नाही. शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांमध्ये दोर-दोरखंड, कुळव-तिफण, कुऱ्हाड-पावडे वगैरे साहित्याचे डिझाइन गावातले कारागीर, ज्यांना अधिकृतपणे अकुशल मानले जातात तेच करतात. लोखंडी नांगर, फवारणी यंत्र, मोटर पंप यापासून ते ट्रॅक्टरपर्यंतचे सर्व डिझाइन खासगी कंपन्या करीत असतात. या क्षेत्रातही

कृषी विद्यापीठातील संशोधकांचे योगदान नगण्यच आहे.

संपूर्ण देशातील कृषी विद्यापीठांनी थोडीफार कामगिरी केली असे एकमेव क्षेत्र आहे बियाणे संशोधन. कृषी संशोधकांनी संकरित बियाणांत संशोधन करून नवे वाण निर्माण केले; पण अधिक उत्पन्न देणारे संकरित वाण केवळ कापूस, ज्वारी आणि टमाटे या पिकांपुरतेच मर्यादित राहिले. गहू, तूर, हरभरा, सोयाबिन, उडीद, मूग, भात, भुईमूग या पिकांमध्ये अजूनपर्यंत तरी भरघोस उत्पन्न देणारे संकरित वाण निर्माण झाले नाही. निवड पद्धतीने सुधारित जाती तयार होण्यापलीकडे अजून तरी बियाणे संशोधकांची झेप गेलेली नाही; पण बियाणे संशोधन विभागातही कृषी विद्यापीठांची मोलाची भूमिका आहे, असे म्हणण्यासारखी स्थिती नाही.

१९७०च्या सुमारास गुजरात विद्यापीठाने कपाशीमध्ये एच-४ नावाचे संकरित वाण तयार केले, त्यानंतर त्यांना दुसरे दर्जेदार संकरित वाण निर्माण करण्यात फारसे यश आले नाही. नाही म्हणायला एच-६, एच-८ संकरित वाण त्यांनी आणले पण ते वाण बदलत्या हवामानात फार काळ टिकू शकले नाही. त्याचप्रमाणे १९८०च्या सुमारास मराठवाडा कृषी विद्यापीठाने एनएचएच-४४ व पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने एएचएच-४६८ या कापसाच्या दोन संकरित जाती निर्माण करण्याखेरीज संकरित बियाणे संशोधनात फार काही मौलिक संशोधन केलेले नाही, हे उघड आहे.

पण हे सर्व संशोधन पंधरा-वीस वर्षांपूर्वीचे आहे आणि हे सर्व संकरित वाण आता शेतीतून हद्दपार झालेले आहे.

याउलट गेल्या वीस वर्षांत खासगी कंपन्यांनी मात्र बियाणे क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. जवळजवळ सर्वच पिकांमध्ये स्वत: संशोधन करून स्वसंशोधित बियाणे बाजारात आणले आहे आणि त्यालाच शेतकऱ्यांची पसंती मिळाली आहे.

२०१०-११ हा खरीप हंगाम शेतीसाठी प्रतिकूल असूनही केवळ बीटीयुक्त बियाणे शेतीमध्ये पेरले म्हणून कापसाचे बऱ्यापैकी उत्पादन आले आहे आणि कापसाची निर्यात सुरू आहे म्हणून कापसाला विक्रमी भाव मिळत आहे. कापूस उत्पादकांच्या आयुष्यात चांगले दिवस येण्याची शक्यता निर्माण होत असेल तर ती बीटी बियाणे संशोधित करणाऱ्या मोन्सॅटो कंपनीची किमया आहे. कापसाला चांगला भाव मिळत असेल तर ती मुक्तअर्थव्यवस्थेची किमया आहे. मग कापूस उत्पादकांच्या आयुष्यात कदाचित चांगले दिवस येण्याची शक्यता निर्माण होत असेल तर यात शासन किंवा कृषी विद्यापीठांचे काय योगदान आहे?

पण हे सत्य कोणी मानायलाच तयार नाही. कृषी विद्यापीठांनी गेल्या पन्नास वर्षांत केलेल्या संशोधनाच्या समर्थनार्थ ते गाडाभर कागदपत्रांचा दस्तऐवज सादर करायला नेहमीच उतावीळ असतात; पण कागदोपत्री संशोधनाच्या आधारे पीएच.डी.,

डी.लिट वगैरे मिळू शकते; पण शेती पिकवण्यासाठी बियाणे, खते, कीटकनाशके लागतात, कागदोपत्री दस्तऐवज हे काही पिकांचे खाद्य नाही. शिवाय या दस्तऐवजांचे सेंद्रिय खतात रूपांतर केले आणि पिकाला खाऊ घातले तर जास्तीत जास्त क्विंटल-दोन क्विंटल अन्नधान्य पिकू शकेल, पिकाच्या भाषेत या दस्तऐवजाला यापेक्षा जास्त काही अर्थ उरत नाही. मुलांची भाषा ज्याला चांगली कळते तोच चांगला पालक. ज्याला विद्यार्थ्यांची भाषा कळत नाही तो शिक्षक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणू शकत नाही. अगदी तसेच ज्याला पिकांची भाषा कळत नाही तो शेतीमध्ये चांगले संशोधन करूच शकत नाही.

पण दुर्दैवाने विद्यापीठीय शेती संशोधक आणि प्रत्यक्ष शेती यांचा अर्थाअर्थी काहीही संबंधच राहिलेला नाही. शेतीचे अर्थशास्त्र यांना कळत नाही कारण शेती किंवा शेतीसंशोधन याऐवजी शासकीय अनुदानावर यांचे प्रपंच चालतात आणि निसर्गाचा लहरीपणा, हवामान, पाऊसपाणी किंवा ओला-कोरडा दुष्काळ यांच्याशी शासकीय अनुदानाचा काहीही संबंध नसतो. अनुदान हे हमखास पीक असते.

कृषी विद्यापीठांकडे हजारो एकर जमीन आहे. सिंचनाची व्यवस्था आहे, त्यांनीच गेल्या पन्नास वर्षांत केलेल्या संशोधनाची शिदोरी आहे. मग कृषी विद्यापीठांना अनुदानाची गरज का पडावी? आता एकदा सर्व विद्यापीठांचे अनुदान बंद करून यांना सांगण्याची गरज आहे की, बाबा रे, निव्वळ सल्ले देणे खूप झाले, या विद्यापीठाच्या हजारो एकरांवर तुमच्याच संशोधनाच्या आधारे आता शेती करून किमान पाच वर्षे तरी जगून दाखवा, प्रपंच चालवून दाखवा आणि शेती करून होणाऱ्या मिळकतीवर विद्यापीठाचे सर्व कारभार अनुदान न घेता चालवून दाखवा.

'आधी केले मग सांगितले' यासारखा दुसरा चांगला मार्ग नाही.

पण ज्या विद्यापीठांना शेतीतील गरिबीचे कारण शेतीत उत्पादित केलेल्या मालास उत्पादन खर्च भरून निघेल एवढाही भाव मिळत नाही, यात दडलेले आहे हेच अजूनपर्यंत कळलेले नाही त्यांच्याकडून फारशा अपेक्षा करणे हेच मूर्खपणाचे आहे.

■■

# प्रक्रिया उद्योग आणि शिक्षणपद्धती

शेतीमालाचा उत्पादनखर्च भरून निघेल आणि शेतकऱ्यांना सन्मानाने जीवन जगता येईल असे रास्त भाव मिळाले पाहिजेत, असा जेव्हा जेव्हा विषय निघतो तेव्हा तेव्हा शेतीमालास रास्त भाव मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतमालावर प्रक्रिया करणारे युनिट किंवा उद्योग उभारले पाहिजेत, असा एक युक्तिवादवजा सल्ला दिला जातो. असा सल्ला देणाऱ्यांची संख्याही गरजेपेक्षा खूपच जास्त आहे. ज्यांना शेती व्यवसायाचा अजिबात गंध नाही असे तज्ज्ञ, ज्यांना मतांच्या राजकारणाखेरीज अख्ख्या आयुष्यात अन्य काहीच करता आले नाही असे पुढारी, ज्यांना शेतीच्या अर्थकारणातील आईचा 'आ'सुद्धा समजला नाही; पण स्वत:ला शेतकऱ्यांचे पाठीराखे म्हणवून घेणारे मंत्री वगैरे हाच एकमेव मुद्दा रेटण्यात हिरीरीने आघाडीवर असतात. शारीरिक श्रमाच्या नव्हे तर आर्थिक भांडवलाच्या बळावर प्रक्रिया उद्योग उभे राहू शकतात, त्यासाठी शासकीय धोरणे शेतीव्यवसायाला अनुकूल असावी लागतात, वित्तीय संस्थांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असावा लागतो, हे त्यांच्या ध्यानीमनीही नसते.

शेतीमाल प्रक्रिया उद्योग उभारणीच्या कामामध्ये शेतकरी समाजाने आजपर्यंत अनास्थाच दाखविलेली आहे, कारण मुळातच शेती हा पूर्णवेळ व्यवसाय आहे. शेतीमध्ये जशी भांडवली बचत निर्माण होत नाही तशीच अतिरिक्त शिलकी वेळेची बचतही निर्माण होत नाही. शेती हा शेतकऱ्याला पूर्णवेळ गुंतवून ठेवणारा व्यवसाय आहे. शिलकी वेळ नाही, पूर्ण वेळ काबाडकष्टात खर्ची घालवूनही पदरात चार पैशांची बचत उरत नाही, बँका पीक कर्जाव्यतिरिक्त अन्य उद्योग उभारायला गरज पडेल एवढे कर्ज द्यायला तयार नाहीत. अशी संपूर्ण भारतात शेतीची स्थिती असताना ही मंडळी शेतकऱ्यांना शेतमालावर प्रक्रिया करणारे युनिट किंवा उद्योग उभारले पाहिजेत, असा सल्ला कसा काय देऊ शकतात? यांच्या जिभा अशा सैरभैर कशा काय चालू शकतात याचे मला नेहमीच अप्रूप वाटत आलेले आहे. एखाद्याच्या

हातपायात बेड्या घालायच्या, डोळ्यावर झापड बांधायचे, कानात बोळे कोंबायचे एवढेच नव्हे तर त्याचा श्वास गुदमरेल अशी पुरेपूर व्यवस्था करून झाल्यानंतर त्याला धावण्याच्या शर्यतीत भाग घ्यायचा सल्ला देण्याइतका किळसवाणा प्रकार आहे हा.

शेतीमाल प्रक्रिया उद्योगाची उभारणी करण्यासाठी भांडवल आणि कौशल्य या दोन मूलभूत आवश्यक गरजा आहेत. त्या पूर्ण झाल्याशिवाय उद्योग उभा राहू शकत नाही, एवढे साधे सूत्र या मंडळींना कळत नाही. कारण या मंडळींच्या सतरा पिढ्यांनी उद्योग कशाला म्हणतात हे नुसते डोळ्यांनी पाहिलेले असते, कानांनी ऐकलेले असते; पण स्वत: उद्योग-व्यापार करण्याचा कधी प्रयत्न केलेलाच नसतो. सर्वच विषयांतील ज्ञानप्राप्ती केवळ पुस्तकांचे वाचन केल्याने होत नाही; त्याला अनुभवांची आणि अनुभूतीची जोड लागते. एवढे साधे सूत्रही या मंडळींना अजिबातच न कळल्याने ही मंडळी आपला आवाका न ओळखताच नको तिथे नाक खुपसतात आणि नको त्या प्रांतात नको ते बरळत सुटतात. त्याचे दुष्परिणाम मात्र संबंध शेतीव्यवसायाला भोगावे लागतात.

स्वत:ला कृषिप्रधान म्हणवणाऱ्या या इंडियनांच्या इंडियात भारतीयाने एखादा प्रक्रिया उद्योग स्थापन करायचा ठरवले तर ती अशक्यप्राय बाब झाली आहे. कारण...

**भांडवल**

काही शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गट, संघ किंवा कंपनी स्थापन करता येऊ शकेल; पण त्यातून भागभांडवल उभे राहू शकत नाही, कारण सर्व शेतकरी मुळातच कर्जबाजारी असल्याने त्यांच्याकडे भागभांडवल उभे करण्याइतकेही आर्थिक बळ नसतेच. पुढाऱ्यांकडे चिक्कार पैसा असतो पण ते एकदा शेतकऱ्यांच्या गटामध्ये घुसले की व्यापाराच्या मूळ उद्देशाचे राजकियीकरण होत जाते आणि व्यवहारी दृष्टिकोनाची जागा सहकारी खावटेगिरीने घेतल्यामुळे पदाधिकारी व संचालक मंडळाचा इंडिया होतो आणि वर्षातून एकदा आमसभेत चहापाणी, नाश्ता किंवा फार तर यथेच्छ भोजन देऊन उर्वरित सभासदांची बोळवण केली जाते. सभासदांच्या नशिबातला भारत जसाच्या तसाच कायम राहतो. ''ज्याच्या हातात सर्वांत जास्त पैशाची झारी, तोच उरलेल्यांचा पुढारी'' अशीच आपल्या लोकशाहीला परंपरा लाभली असल्याने सामान्य शेतकऱ्याला संचालक मंडळावर कधीच जाता येत नाही.

पुढाऱ्यांना टाळून काही होतकरू शेतकऱ्यांनी एखादा प्रोजेक्ट उभारायचा म्हटले तर अमर्याद अधिकार लाभलेली लायसन्स-कोटा-परमीटप्रिय नोकरशाही जागोजागी आडवी येते. प्रकल्प उभारायला लागणारी जागा, ना हरकत प्रमाणपत्र, अकृषक प्रमाणपत्र, पाणी, वीज, प्रदूषणमुक्ततेचे प्रमाणपत्र वगैरे कायदेशीर बाजू निपटता-

निपटताच सामान्य माणसांची अर्धी हयात खर्ची पडते.

एकदाचे एवढे सर्व प्रश्न जरी मार्गी लागले तरी मग प्रश्न उद्‌भवतो वित्तपुरवठ्याचा. प्रक्रिया उद्योगाला लागणाऱ्या भांडवलाची रक्कम काही लक्ष रुपयांत किंवा कोटींत असू शकते. भारतातील कोणतीच बँक किंवा वित्तीय संस्था शेतकऱ्याला कर्जपुरवठा करायला तयार नाहीत, हे समजून घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना पीककर्जाच्या नावाखाली काही हजार रुपये रकमेचे कर्ज दिले जाते कारण तसे सरकारी धोरण आहे. शेतकऱ्यांना दिलेल्या पीककर्जाची वारंवार बुडबाकी होऊनही वेळोवेळी थकित कर्जाची फेररचना करून नव्याने कर्ज दिले जाते. पीककर्ज देण्यामागे शेतकऱ्यांचे भले व्हावे हा उद्देश नसून त्यांना कोणत्याही परिस्थितीत शेती करायला भाग पाडणे, असा शासनाचा उद्देश असतो. शेती करायला पैसे नाहीत म्हणून शेतकरी जर शेती पडित ठेवायला लागले तर आपण काय खायचे? असा सरळ हिशेब शासन आणि प्रशासनाचा असतो. परिणामत: शासन-प्रशासन खाऊन-पिऊन सुखी असते मात्र शेतकरी पुन्हा नव्याने कर्जाच्या गर्तेत ढकलला जातो.

याचा सरळ सरळ अर्थ असा की, पीककर्जाशिवाय अन्य कुठल्याही कारणासाठी या देशातल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जपुरवठा केला जात नाही. गृहकर्ज, आकस्मिक कर्ज, मुलांच्या शिक्षणासाठीचे कर्ज, घरगुती साहित्य खरेदीसाठीचे कर्ज वगैरे जसे बिगरशेतकऱ्यांना मिळते; तसेच कर्ज शेतकऱ्यांना मात्र नाकारले जाते, ही वस्तुस्थिती आहे. अशा एकंदरीत परिस्थितीत शेतकऱ्यांना एखादा प्रोजेक्ट उभारायला वित्तीय संस्था कर्जपुरवठा करील, असे गृहीत धरणारे स्वप्नांच्या दुनियेत जगत असून ते वास्तविकतेपासून फार लांब आहेत, असे म्हणावेच लागेल.

**कौशल्य**

शिक्षण आणि अनुभवातून कौशल्य प्राप्त होत असते; पण केवळ शिक्षणातून येणाऱ्या कौशल्यालाच कौशल्य मानण्याचा भयंकर महारोग आपल्या व्यवस्थेला जडला आहे. एखादी व्यक्ती एखाद्या क्षेत्रात कितीही पारंगत असली; पण शालेय शिक्षण घेऊन पदवी मिळविली नसेल तर ती व्यक्ती अकुशल कारागीर ठरत असते. प्रमाणपत्राशिवाय कुठलीही मान्यता मिळत नसल्याने अशी कौशल्यनिपुण, पारंगत व्यक्ती सुपरवायझरच्या हाताखाली रोजंदारी करण्याखेरीज काहीही करू शकत नाही. वेगवेगळ्या भागात स्थानिक शेतमालाची उपलब्धता आणि त्या भागातील लोकांची रुची लक्षात घेऊन छोटेमोठे प्रक्रिया उद्योग उभारणे सहज शक्य असतानादेखील केवळ शासकीय धोरणे अनुकूल आणि पूरक नसल्याने सामान्य शेतकऱ्याला काहीही करता येत नाही.

**लघुउद्योग**

नाशवंत मालाचे गरजेपेक्षा जास्त प्रमाणावर उत्पादन झाले तर त्या शेतमालाची अक्षरश: माती होते. वांगे, टमाटे व अन्य पालेभाज्या सडून जातात. अशा वेळी नाशवंत शेतमालावर प्रक्रिया केली तर शेतकरी आणि ग्राहक दोघांनाही लाभ होऊ शकतो. परदेशात फ्रोजन फूड मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. ती टेक्नॉलॉजीही प्रगत आहे. लगेच फ्रीझ केलेले पदार्थ हे कधी कधी ताज्याहूनही अधिक ताजे असतात. जे तंत्रज्ञान आज परदेशात वापरले जाते तसे तंत्रज्ञान आमचा देश कृषिप्रधान वगैरे असूनही विकसित का करू शकला नाही? मागे बायोडिझेल निर्मितीबद्दल बरीच चर्चा झाली होती. बायोडिझेल निर्मिती हा अत्यंत सोपा आणि अत्यंत कमी भांडवली गुंतवणूक लागणारा प्रक्रिया उद्योग आहे. शेतकऱ्यांच्या घराघरात बायोडिझेलची निर्मिती होऊ शकते, पेट्रोलजन्य पदार्थांवर अमाप खर्च होणारे परकीय चलन वाचू शकते. शेतीत जेट्रोपा लागवड करता आली तर शेतीसाठी आणखी एक पीकपर्याय उपलब्ध होऊ शकतो आणि महत्त्वाचे म्हणजे पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमती घसरून ग्राहकांचा फायदा होऊ शकतो. धान्यापासून दारू तयार करण्याचे तंत्रज्ञानसुद्धा सोपे आणि बिनखर्ची आहे; परंतु शासन यास मान्यता द्यायला तयार नाही. कारण ही प्रक्रिया शेतकऱ्यांच्या घराघरातच होणार असल्याने पुढाऱ्यांना आणि नोकरशाहीला चरण्यासाठी कुरणे निर्माण होण्याची शक्यता नाही म्हणून यात सत्ताधाऱ्यांना अजिबात रस नाही, असे म्हणावे लागते.

शेतीविषयक तंत्रज्ञानामध्ये लहान-लहान देश पुढे-पुढे जात असताना आमचा भला मोठा देश मागे - मागे का पडतो? याचेही उत्तर शोधण्याची गरज आहे. स्टोरेज आणि फ्रोजन/पॅकेज्ड फूड इंडस्ट्रीज अन्य देशांत स्थापित अवस्थेमध्ये वावरत असताना आम्ही या विषयात अजून पहिले पाऊलसुद्धा नीट टाकायला सुरुवात केलेली नाही.

**शिक्षण**

शेतीविषयक तंत्रज्ञानामध्ये जोरकसपणे पाऊल टाकायचे असेल आणि उच्च तंत्रज्ञान विकसित करून प्रक्रिया युनिट्स उभारायचे असेल तर त्यासाठी स्किल, कौशल्य, व्यवसायज्ञान, अनुभव, आर्थिक पाठबळ आणि मनुष्यबळ लागेल. आमच्या देशाजवळ मनुष्यबळ सोडलं तर बाकी गोष्टींचा प्रचंड दुष्काळ आहे. मनुष्यबळ आहे; पण त्यात बुद्धिबळ कमी आणि बाहुबळ जास्त आहे. जे काही बुद्धिबळ आहे त्यात व्यवहार ज्ञान / व्यावसायिक ज्ञान कमी आणि पुस्तकी किंवा कारकुनी ज्ञान जास्त आहे. आमचे बुद्धिबळधारी विचारवंत आणि पुस्तकी ज्ञानधारी तज्ज्ञ मंडळी कारखाने काढायला कधीच पुढाकार घेत नाही. मात्र कारखाना निघणार आहे अशी बातमी

ऐकल्याबरोबर नोकरी मिळावी म्हणून रांगा लावायला धावतात. याला आमची शिक्षणपद्धती जबाबदार आहे. आजची शिक्षणप्रणाली म्हणजे कारकून घडवणारे आणि बेरोजगार निर्माण करण्याचे कारखाने ठरले आहेत. शाळा कॉलेज किंवा उच्च शिक्षणाचे मुख्य सूत्र 'लाथ मारीन तिथे पाणी काढीन' असा विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देईल एवढे ताकदवान असायला हवे; पण दुर्दैवाने तेच घडत नाही. या देशावर वसाहतवादी राज्यसत्ता चालविण्यासाठी इंग्रजांना कारकुनांची गरज होती. त्यानुरूप कारकून तयार करणारी शिक्षणप्रणाली त्यांनी स्थापित केली. आम्ही इंग्रजांना घालवले पण त्यांची शिक्षणपद्धती आजतागायत कवटाळून बसलोच आहोत.

शाळा-कॉलेज शिकताना विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षण व्यवस्था या सर्वांचे मिळून अंतिम ध्येय काय असते तर विद्यार्थ्याने शिकून सवरून या देशाच्या प्रशासन व्यवस्थेचा एक हिस्सा होणे. अगदी कलेक्टरपासून चपराशापर्यंत कोणतीही नोकरी मिळाली तरी चालेल; पण सरकारी कारकून व्हायचंय सर्वांना. नोकरी मिळवून सहाव्या-सातव्या-आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार पगार उचलून स्वर्गमय जीवन जगायचे आहे सर्वांना. आहे याच आयुष्यात स्वर्गासारखे जीवन जगायला मिळाले तर मरणानंतर नरकवास मिळाला तरी चालेल; पण भ्रष्टाचार घाऊकपणे करायचाच आहे सर्वांना. मुख्य प्रश्न हा की ३ टक्के नोकरीच्या जागा असताना १०० टक्के विद्यार्थ्यांना आम्ही एकाच मार्गाने का ढकलत आहोत? किमान ५० टक्के विद्यार्थ्यांना तरी व्यावसायिक शिक्षण द्यायला काय हरकत आहे? याचे उत्तर कोणीच देत नाहीत.

डिग्री घेऊन १०० पदवीधर विद्यापीठाबाहेर आले की त्यापैकी ३ पदवीधरांना नोकरी मिळते, ते मार्गी लागतात. उरलेले ९७ पदवीधर नोकरीच्या शोधात भटकत फिरतात. कारण १५-२० वर्षे शाळा-कॉलेजात घालवूनही व्यवसाय, स्वयंरोजगार वा अन्य उद्योग करण्यासाठी लागणारे कौशल्य, व्यावसायिक ज्ञान आणि मुख्य म्हणजे आत्मविश्वास यापैकी त्याच्याकडे काहीही आलेले नसते. उद्योग व्यवसाय करायचे म्हटले तर बँका कर्ज देत नाहीत. कारण बँकेला माहीत असते हा शंभराचे साठच करणार. स्वत: आणि सोबत बँकेलाही घेऊन बुडणार. म्हणून बँका टाळाटाळ करतात. जसे शेतकऱ्याला प्रक्रिया उद्योगासाठी कर्ज देणे नाकारले जाते तसेच बेरोजगारांनाही बँका कर्ज देण्यास अनुत्सुक असतात. कारण पदवी मिळवल्याने व्यवसायज्ञान मिळाले हे बँकेलाही मान्य नसते.

शेवटी एक दिवस घरात खायचे वांधे पडायला लागले किंवा लग्नाचे वय घसरायला लागले की मग मिळेल तो रोजगार करण्याशिवाय त्या बेरोजगारासमोर गत्यंतर नसते आणि मग अशा तऱ्हेने आमच्या तरुणाईचे खच्चीकरण होते.

त्यासोबतच प्रक्रियाउद्योग मोठ्या प्रमाणावर काढण्याच्या कल्पना मग केवळ वल्गना सिद्ध व्हायला लागतात.

**कौशल्य आणि राजा हरिश्चंद्र**

यासंदर्भात राजा हरिश्चंद्राचे उदाहरण फारच बोलके आहे. विश्वामित्री कारस्थानात राज्य गेल्यानंतर पोटाची खळगी भरण्यासाठी काहीतरी कामधंदा करावा म्हणून राजा हरिश्चंद्र मजुरांच्या बाजारात जाऊन उभा राहिला. तुला काम काय करता येते? या प्रश्नावर हरिश्चंद्राचे उत्तर होते. मला राज्य चालविता येते; पण ज्यांना काम करण्यासाठी मजूर हवे होते त्यांच्याकडे राज्य कुठे होते, याला चालवायला द्यायला? राजा हरिश्चंद्रास कामच मिळेना. शेवटी स्मशानात राहून प्रेताची रखवाली करण्याखेरीज राजा हरिश्चंद्राला दुसरे कामच मिळाले नाही.

राज्य चालविण्याखेरीज इतर कसलेच कौशल्य नसलेला राजा हरिश्चंद्र आणि प्रशासन चालविण्याखेरीज अन्य कसलेच कौशल्य अवगत नसलेला पदवीधर यांच्यात फरक काय उरतो?

कदाचित आज जर विश्वामित्र पुन्हा एकदा भूलोकात अवतरला आणि शासकीय व प्रशासकीय मंडळींच्या स्वप्नात जाऊन त्याने त्यांची पदे व नोकऱ्या दानात मागून घेतल्या तर अंगभूत कौशल्याच्या बळावर जगताना या तमाम पुस्तकी ज्ञानाच्या महामेरूंची गत अत्यंत दयनीय होईल. राजा हरिश्चंद्राला स्मशानात जाऊन प्रेताची राखण तरी करता आली; पण आधुनिक काळातील राजा हरिश्चंद्र कायम पोलिसांच्या बंदोबस्तात फिरत असल्याने त्यांना केवळ स्मशानाचे नाव ऐकवले तरी भीतीपोटी भुताच्या भयाने अर्धमेले होतील. ही मंडळी भीक मागूनसुद्धा जगू शकणार नाहीत, कारण शेवटी भीक मागायलाही कौशल्य आणि अनुभव लागतोच लागतो.

हे सगळे बदलायचे असेल तर आहे त्या शिक्षणव्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करावे लागतील आणि या बदलासाठी प्रचंड इच्छाशक्ती लागेल... वरना कुछ नही बदलनेवाला... असंभव...!

■■

# वर्धापनदिनाच्या निमित्ताने

ही गोष्ट आहे १९८६-८७ मधली. सुरेश चोपडे सकाळी ६च्या सुमारास माझ्या वर्ध्यातील खोलीवर आला आणि आल्याआल्या अगदी दारावरूनच हुकूम सोडला.

''ए आवर रे पटकन, आपल्याला तातडीने निघायचे आहे.'' मीसुद्धा कुठे, कशाला, कशाने वगैरे कोणताही उपप्रश्न न विचारताच तयारी केली आणि बाइकवर बसलो. तो येताना रवीभाऊ काशीकर यांच्याकडून बाइक घेऊन आला होता. रस्त्याने निघालो आणि मग सांगायला लागला. मुरलीचा (मुरलीधर खैरनार) फोन होता. 'आठवड्याचा ग्यानबा' अंक प्रिंटिंगला गेलाय; पण कागदाला पैसे नाहीत म्हणून छपाई थांबली आहे. आपल्याला आजच्या आज किमान शंभर तरी नवीन वर्गणीदार करून दुपारपर्यंत डीडी पाठवायचा आहे आणि मग सुरू झाली युद्धपातळीवर वर्गणीदार नोंदविण्याची मोहीम. तो काळच वेगळा होता. शेतकरी समाज शेतकऱ्यांची संघटना निर्माण झाल्यामुळे भारावला होता. संघटनेचे कार्यकर्ते एका ध्येयाने झपाटले होते. काहीतर चक्क वेडे झाले होते. परभणी अधिवेशनावरून परतलेल्यांना 'परभणी पागल' अशी उपाधीच बहाल झाली होती. मग आम्ही मोर्चा वळवला नेमक्या अशाच घरांकडे. त्यातील बहुतांश आधीच वर्गणीदार होते आणि तरीही प्रत्येकाने पावत्या फाडल्या. पैसे दिले. यामागे 'आठवड्याचा ग्यानबा' चालला पाहिजे ही भावना होतीच; पण त्याहीपेक्षा शरद जोशींच्या माणसांना नाही म्हणायचे नाही हीच प्रबळ भावना होती. आम्ही दुपारपर्यंत उद्दिष्ट पूर्ण केले आणि डीडी काढून नाशिकला रवाना केला.

शेतकऱ्यांमध्ये कार्य करणे किंवा शेतकऱ्यांसाठी साप्ताहिक चालविणे किती कठीण असते याची जाणीव चळवळीबाहेरच्या जनतेमध्ये असतेच असे नाही. शेतकरी संघटनेचा विचार अधिक प्रभावीपणे आणि बिगर शेतकरी, शहरी माणसांपर्यंत पोहोचला पाहिजे या उद्देशाने नाशिक येथून 'आठवड्याचा ग्यानबा' हे साप्ताहिक सुरू करण्यात आले होते; पण तो प्रयोग काही फारसा यशस्वी झाला नाही आणि

साप्ताहिक ८-९ महिन्यांतच बंद पडले. पुन्हा 'शेतकरी संघटक'ची धुरा म्हात्रे सरांच्या खांद्यावर आली.

शेतकरी संघटनेसारख्या व्यापक जनाधार असलेल्या आणि इतिहासातल्या सर्वांत मोठ्या शेतकरी आंदोलनाच्या आंबेठाण येथील मध्यवर्ती कार्यालयाचा संपूर्ण कार्यभार एकट्या प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे सरांनीच एकहाती सांभाळावा, असे विधिलिखितच असावे, असे वाटते. कारण सरांच्यामागचा कामाचा व्याप कमी करण्याचे सर्वच प्रयोग असफल ठरलेत. प्रशिक्षण शिबिरे असोत की शेतकरी संघटक, कार्यालयीन पत्रव्यवहार असो की आणखी काही, सर्व सांभाळायचे काम म्हात्रे सरांकडेच. शरद जोशींना पर्याय बनू पाहणारे संघटनेत खूप झाले, शरद जोशींपेक्षा आपण कांकणभर सरसच आहोत, अशी दिवास्वप्नेही अनेकांना पडली; पण म्हात्रे सरांना पर्याय सोडाच निदान मदतगार तरी व्हावे, या वाटेला चुकूनदेखील कोणी गेले नाही. सरांवरचा प्रशिक्षण शिबिरांचा भार कमी करण्यासाठी चंद्रकांत वानखेडे आंबेठाणला होते; पण काही महिनेच. त्यानंतर अमर हबीब, ब.ल. तामस्कर, कालिदास आपेट आणि मीसुद्धा आंबेठाणला होतो; पण वर्षभरच. म्हणजे गेल्या तीस वर्षांमध्ये केवळ वर्ष-दीड वर्षाचा अल्पकाळ सोडला तर मध्यवर्ती कार्यालय आणि शेतकरी संघटक या दोन्ही जबाबदाऱ्या म्हात्रे सर एकटेच समर्थपणे सांभाळत होते.

शेतकरी संघटक औरंगाबादवरून प्रकाशित व्हायला लागल्यापासून सरांवरील भार कमी व्हायला नक्कीच मदत झाली असावी. कार्यकारी संपादक श्रीकांत उमरीकर यांच्या अथक प्रयत्नाने संघटकच्या स्वरूपातही आमूलाग्र बदल झालेला आहे. अंक देखणा आणि वाचनीय झाल्याने वर्गणीदार संख्याही वाढायला लागली आहे; पण शेतकरी आंदोलनाचा विचार अधिक व्यापकपणे रुजविण्यासाठी एवढे पुरेसे नाही. शेतकरी संघटक प्रत्येक गावात, प्रत्येक घरात पोहोचायला हवा. महाराष्ट्रातील सर्व बुक स्टॉलवर दिसायला हवा. हे उद्दिष्ट सोपे नसले तरी कठीण नाही. शेतकरी संघटना किंवा शेतकरी संघटकसारखे पाक्षिक चालवणे किती कठीण असते, हे चळवळीत काम करणाऱ्यांनादेखील पक्के ठाऊक आहे. म्हणूनच शेतकरी संघटनेला वेडेपीर मिळाले. घरचं खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणारे सैनिक मिळाले आणि पदरचे पैसे खर्च करून शेतकरी संघटनेची आपल्या आईसमान जोपासना करणारे पाईक कार्यकर्तेही मिळाले.

६ एप्रिलला शेतकरी संघटकला २७ वर्षे पूर्ण होत आहेत. जाहिराती न घेता निव्वळ वर्गणीदारांच्या बळावर एवढा प्रदीर्घ काळ वाटचाल करणे वाटते तेवढे सोपे नाही. शिवाय ज्या पाक्षिकाचा वर्गणीदार बहुतांश प्रमाणावर शेतकरी आहे, ज्याचे लिहिण्यावाचण्याशी हाडवैर आहे अशा वर्गणीदारांना घेऊन, त्यांच्यात वाचनाची

आवड निर्माण करून त्यांना निदान शरद जोशींचे लेख वाचायला लावण्याइतपत त्यांच्यात वाचनाची रुची निर्माण केली, ही शेतकरी संघटकची फार मोठी उपलब्धी मानावी लागेल. शेतकरी संघटक वेळेवर आला नाही आणि शरद जोशींचा लेख वाचायला मिळाला नाहीतर लोक कसे कसावीस होतात, हे मी अनेकदा अनुभवलं आहे. शरद जोशींना आणि शेतकरी संघटनेच्या विचारांना शेतकऱ्यांच्या माजघरातील देव्हाऱ्यापर्यंत पोहोचविण्याचं ऐतिहासिक कार्य शेतकरी संघटकने आजवर चोखपणे बजावलं आहे, हे सत्य आहे, निर्विवाद आहे आणि यापुढेही ते अधिक जोमाने चालत राहील याची खात्री आहे.

■■

# बरं झालं देवबाप्पा...

दोन दिवसांपूर्वी मी एका वृत्तपत्राच्या कार्यालयात गेलो होतो. तिथे काही अनोळखी राजकीय मंडळी बसली होती. माझ्या छातीवरचा बिल्ला बघून चर्चेला तोंड फुटले. तसा हा नेहमीचाच प्रकार आहे. बिल्ला बघितल्याबरोबर काही विशिष्ट लोकांच्या टाळक्यात प्रसुतिवेदनेच्या कळा उठायला लागतात आणि शेतकरी संघटना व शरद जोशी यांच्याविषयी काहीतरी खोचक वाक्य प्रसवल्याशिवाय त्यांचे मन काही शांत होत नाही. लालबिल्लेवालेसुद्धा शरद जोशी नावाच्या जागतिक दर्जाच्या विद्यापीठाचे विद्यार्थी असल्याने तितक्याच ताकदीने त्यांचे वार परतवून लावत असतात. विषय आर्थिक असो की सामाजिक, मुद्दा धोरणात्मक असो की तार्किक, शेतकरी संघटनेच्या पाईकाजवळ शेतीच्या अर्थकारणाची जेवढी खोलवर जाणीव आहे तेवढी क्वचितच कुणाकडे असेल. चार वर्ग शिकलेले शेतकरी संघटनेचे पाईक मोठमोठ्या अर्थतज्ज्ञांना निरुत्तर करू शकतात, हे जवळजवळ सर्वमान्य झाले आहे.

तर झाले असे की चर्चेला सुरुवात झाली. खरं तर या चर्चेला वादविवाद स्पर्धेचे नाव देणे अधिक योग्य राहील. केंद्र सरकारची धोरणं कशी शेतकरी हिताची आहेत, कापूस निर्यातबंदीचा निर्णय कसा ग्राहकांच्या हिताचा आहे, हे तो राजकारणी माझ्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करीत होता; परंतु त्या समर्थनार्थ तो ज्या मुद्द्यांचा आधार घेत होता ते मुद्दे एवढे तकलादू होते की माझ्या एकाच उत्तराने तो गारद व्हायचा. त्या उत्तरावर प्रतिप्रश्न करण्यासाठी त्याच्याजवळ काहीच उरत नसल्याने मग तो लगेच दुसरा मुद्दा पुढे रेटायचा. सरतेशेवटी केंद्र सरकारच्या धोरणांची बाजू घेऊन आपला टिकाव लागणार नाही हे लक्षात आल्यावर मग चक्क वैयक्तिक पातळीवर घसरणे आणि शरद जोशींवर टीका करणे ही बहुतेकांना सवयच असते तसाच तोही घसरला; पण इथेही त्याचा टिकाव काही लागला नाही. शेवटी युद्धात हार पत्करल्याच्या मानसिकतेने शस्त्र खाली ठेवावीत, अशा हावभावाने त्याने कान पाडले आणि चर्चा संपली.

विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी चर्चा करावयाची असते. चर्चेतून जे सकस, चांगले, अधिक तार्किक असेल ते स्वीकारायचे असते. आपल्या मनातील अर्धवट किंवा कोणत्याही निष्कर्षाप्रत न पोहोचलेल्या विचारांना अधिक तर्कसंगत करण्यासाठी किंवा एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी चर्चा हे प्रात्यक्षिकासारखे माध्यम ठरू शकते. वादविवादातून आपण जोपासलेल्या विचारांची खोली पडताळण्याची संधी निर्माण होते. चर्चा ही समुद्रमंथनासारखी असते. प्रचंड समुद्रमंथनानंतर जे काही विष किंवा अमृत निघेल तेव्हा त्यातील काय स्वीकारायचे आणि काय अव्हेरायचे, याचा विवेकाच्या आधाराने सारासार विचार करून मग त्यापुढील निर्णय घ्यायचे असतात.

दुर्दैवाने असे फारसे घडताना मात्र दिसत नाही. बहुतांश चर्चा एकतर जिंकण्याच्या, फड गाजवण्याच्या किंवा आपापले घोडे दामटण्याच्या उद्देशानेच केल्या जातात. विधानभवन आणि संसदही याला अपवाद नाही. एखाद्या विधेयकावर किंवा धोरणात्मक मसुद्यावर सांगोपांग चर्चा झाली आणि त्या चर्चेला अनुरूप असे धोरण आखले गेले, असेही फारसे घडत नाही. संसदेतील चर्चा रंगणे म्हणजे आखाड्यात दोन पहिलवानांची कुस्ती रंगावी अशासारखाच प्रकार असतो. सत्ताधारी पक्ष एका बाजूने तर विरोधी पक्ष दुसऱ्या बाजूने तावातावाने आपापले घोडे दामटत असतात. त्यात विषयाचे मूळ गांभीर्य कुठेच दिसत नाही किंवा उकल करण्याच्या उद्देशाने मुद्देसूद ऊहापोह होत आहे, असेही दिसत नाही. चर्चेच्या माध्यमातून एखादा जटिल किंवा सर्वसामान्य जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न मार्गी लागला आहे, असे फारसे कधीच घडत नाही आणि मग,

झाले आता पुरेसे, ते बोलले बहू
बाळंत होत ना ती, चर्चा झडू नये

असे म्हणायची वेळ येते. त्या दिवशी माझ्यावरही तीच वेळ आली होती. त्यामुळे मी केवळ उत्तरे तेवढी देत होतो. तो निरुत्तर होत असला तरी त्याला माझे म्हणणे पटवून घ्यायचेच नव्हते. त्याला त्याचे विचार, चर्चेच्या नावाखाली माझ्यावर लादायचे होते. शेती आणि शेतकरी हा जरी विषय असला तरी शेतीचे बरे किंवा वाईट यापैकी काहीतरी व्हावे हा त्याचा उद्देशच नव्हता. केवळ मला हरवून जिंकायच्या ईर्ष्येनेच तो तावातावाने माझ्यावर तुटून पडत होता.

फळाच्या अपेक्षेने केलेले कर्म म्हणजे सकाम कर्म आणि फळाची अपेक्षा न बाळगता केलेले कर्म म्हणजे निष्काम कर्म. भगवान श्रीकृष्णाने भगवद्‌गीतेत दोनच

कर्मयोग सांगितले; पण काही माणसं अशीही असतात की कुठल्याही स्थितीत फळ मिळता कामा नये, असा पक्का निर्धार करूनच कर्म करतात. त्याला कोणता कर्मयोग म्हणावे, याचा उलगडा बहुतेक भगवान श्रीकृष्णालासुद्धा झाला नसावा. म्हणून तर त्याने एवढी मोठी गीता कथन करूनही त्यात अशा कर्मयोग्याबद्दल अक्षरसुद्धा उच्चारले नाही. वृत्तपत्राच्या कार्यालयातील माझे काम आटोपून मी जेव्हा बाहेर पडत होतो, तेव्हा त्याने परत एकदा उचल खाल्ली अन् म्हणाला, तू शरद जोशींचा आंधळा समर्थक आहेस. मी मागे वळून पाहिले, स्मित केले अन् पुढे निघून आलो.

शरद जोशींचे शिष्य बगलबच्चे, पित्तू, चमचे ही विशेषणे संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी कुणी ना कुणी यापूर्वी वापरलेलीच आहेत. शेतकरी संघटनेचा मी पाईक आहे, हे प्रत्येक कार्यकर्ता अभिमानाने सांगतच असतो; पण आंधळा समर्थक हे विशेषण माझ्यासाठी नवीन होते. शेतकरी संघटनेच्या विचारांवर माझी श्रद्धा आहे, शरद जोशींनी दिलेल्या 'शेतमालास उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव' या एककलमी कार्यक्रमाचा मी समर्थक आहे. मात्र डोळस समर्थक की आंधळा समर्थक याचा मी कधी विचारच केला नव्हता. गावाच्या गरिबीचे शाळेतील गुरुजनांनी सांगितलेले कारण, महाविद्यालयात प्राध्यापकांनी आणि लायब्ररीतील पुस्तकांनी वर्णन केलेले कारण यापेक्षा शरद जोशींनी सांगितलेले कारण हे अधिक प्रामाणिक, तर्कशुद्ध आणि वास्तवाच्या जवळ जाणारे असल्याने ते मला पटले होते. याच कारणाने मी अल्पवयातच शेतकरी संघटनेकडे खेचला गेलो, हे मला माहीत होते. तरीही मी आंधळा समर्थक तर नाही ना? या विचाराने मला ग्रासायला सुरुवात केली होती. श्रद्धा की अंधश्रद्धा, आंधळा समर्थक की डोळस समर्थक हे सिद्ध करण्यासाठी काही शास्त्रशुद्ध फूटपट्ट्याही उपलब्ध नाहीत. आपापल्या सोयीनुसार, कुवतीनुसार व आकलन शक्तीनुसार प्रत्येक जण यासंबंधात वेगवेगळ्या फूटपट्ट्या ठरवत असतो. या फूटपट्ट्यांचे निकषही व्यक्तिसापेक्षा किंवा समूहसापेक्ष असतात. त्यामुळे या अशास्त्रीय फूटपट्ट्यांनी माझ्या गोंधळात आणखी भर घातली. मग त्या रात्री काही केल्या झोपच येईना.

आणि अचानक मला एक फूटपट्टी गवसली. आंधळे की डोळस याचा हमखास निकाल लावून देणारे सूत्र गवसले.

गेल्या तीस-बत्तीस वर्षांतील शेतकरी संघटनेची वाटचाल ही एकखांबी तंबूसारखीच राहिली आहे. शेतकरी संघटना म्हणजे शरद जोशी आणि शरद जोशींचे विचार म्हणजेच शेतकरी संघटनेचे विचार. जेव्हा जेव्हा शेतकरी संघटनेला राजकीय स्वरूपाचे किंवा अत्यंत महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घ्यायची वेळ आली तेव्हा तेव्हा शेतकरी संघटनेने अधिवेशन बोलावून खुलेपणाने चर्चा घडवून आणली गेली.

अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात शरद जोशींनी बीजभाषण करायचे आणि मग त्यावर प्रतिनिधींनी चर्चा करायची. शरद जोशींनी केलेले बीजभाषण शेतकरी प्रतिनिधींना खूप रुचायचे, शरद जोशींच्या शब्दांमध्ये शेतीची दशा पालटवण्याचे सामर्थ्य दिसायचे आणि मग त्या बीजभाषणाला एवढे समर्थन मिळायचे की शरद जोशींचे वाक्य हेच ब्रह्मवाक्य ठरायचे. शेतकरी संघटनेच्या पहिल्या / दुसऱ्या फळीतील काही नेते मंडळी वेगळा किंवा अगदीच उलट सूर काढायची; पण त्याला अजिबातच समर्थन न मिळाल्याने ते मुद्दे आपोआप बाजूला पडायचे. विचार शरद जोशींचेच पण त्याला लोकमान्यता मिळाल्याने ते विचार शेतकरी संघटनेचे विचार ठरायचे. महत्त्वाचे निर्णय शरद जोशींचेच असले तरी ते अधिवेशनाच्या माध्यमातून जनमान्यता पावल्याने त्याला लोकशाही प्रक्रियेचे अधिष्ठान प्राप्त व्हायचे आणि म्हणूनच अधिवेशनात घेतलेले सर्व निर्णय शेतकरी संघटनेच्या पाईकांनीच घेतले होते, असे म्हणावे लागेल.

आंधळे की डोळस याचा हमखास निकाल लावून देणारे मला गवसलेले सूत्र असे की, आजपर्यंतच्या शेतकरी संघटनेच्या प्रवासात जेवढे काही निर्णय घ्यायची वेळ आली आणि निर्णय घेतले गेले, ते निर्णय जर मला अजिबात चुकीचे वाटत नसतील किंवा योग्यच वाटत असतील तर मला ते योग्यच का वाटतात, याचा शोध घेणे गरजेचे ठरते. ते मला मनोमन पटले म्हणून मी समर्थन केले की केवळ शरद जोशींवर नितांत श्रद्धा आहे म्हणून मी डोळे मिटून समर्थन केले? याचा जर शोध घ्यायचा असेल तर शरद जोशींऐवजी जर मी असतो तर काय निर्णय घेतले असते, असा विचार करून शक्यता पडताळून पाहणे यापेक्षा अधिक चांगला दुसरा मार्ग असू शकत नाही. मी जेव्हा असा विचार करतो तेव्हा असे दिसते की, अनेक निर्णय मी तसेच घेतले असते जसे शरद जोशींनी घेतले आहेत. त्यात मला आजवर कुठलाच विरोधाभास आढळला नाही. मला असा एकही निर्णय दिसत नाही की येथे शरद जोशींचे चुकले, असे मी म्हणू शकेन. मात्र असे काही निर्णय आहेत की मी अगदी त्याच्या उलट निर्णय घेतले असते, असे मला वाटते. जसे की जर अभ्यास आणि आकलन शक्तीच्या बळावर निर्णय घ्यायची माझ्यावर वेळ आली असती तर मी डंकेल प्रस्तावाला, गॅट कराराला, बिटी तंत्रज्ञानाला, मुक्तअर्थव्यवस्थेला कडाडून विरोध केला असता.

मी नक्की असेच केले असते कारण की मी आयुष्यातली १६-१७ वर्षे शाळा-कॉलेजात शिक्षण घेण्यात खर्ची घालवली, अवांतर साहित्याची पुस्तके वाचून डोळेफोड केली, पुढाऱ्यांची भाषणे मन लावून, कानात तेल ओतून ऐकली; त्याबदल्यात या सर्वांनी मिळून त्यांना ऐदीने जीवन जगता यावे यासाठी शेतीला

लुटून आपापले ऐश्वर्य वाढविण्यासाठी त्यांचा एक हस्तक/दलाल म्हणून मला घडविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला होता. सरकार हे शेतकऱ्यांसाठी मायबाप असते व व्यापारी मात्र लुटारू असून ते पावलोपावली शेतकऱ्यांची लूट करतात असेच माझ्या मनावर ठसविण्यात या शिक्षणप्रणालीने कुठलीच कसर बाकी ठेवली नव्हती. शरद जोशी जर भारतात आले नसते आणि या शेतीच्या लुटीच्या रहस्याचा सप्रमाण भेद शेतकरी समाजासमोर खुला केला नसता तर आमच्यासारख्या शेतकरीपुत्रांना मुक्तअर्थव्यवस्थेतच शेतकऱ्यांचे हित आहे हे कधी कळलेच नसते.

शेतकरी संघटनेचा विचार कानावर पडला आणि माझ्या आयुष्याची दिशा बदलली. हे गमक ज्याक्षणी मला कळले त्याच क्षणी मुखातून शब्द बाहेर पडले होते,

सरकारच्या धोरणापायी, छक्के-पंजे आटले
बरं झालं देवबाप्पा, शरद जोशी भेटले

संघटना शेतकऱ्यांची असली तरी या संघटनेचा विचार केवळ शेतकऱ्यांचे हित साधण्यापुरताच मर्यादित नाही. शेतकरी संघटनेने देश वाचविण्याचा विचार मांडला आहे. हा विचार म्हणजे अनेक तुकडे एकत्र करून बांधलेले गोधड्यांचे गाठोडे नसून एकाच धाग्याने विणलेले महावस्त्र आहे. बेरोजगारीपासून महागाईपर्यंत सर्व समस्यांचे निराकरण करण्याची ताकद या विचारसरणीत आहे. संघटनेचा विचार म्हणजे एक मार्ग आहे. ज्याला ज्याला संघटना कळली त्या सर्वांची वाटचाल ह्याच मार्गावरून व्हायला हवी. विचारधारेतच दिशानिर्देशन करायचे सामर्थ्य असेल तर त्या विचारांशी बांधिलकी जोपासणारे एकाच मार्गाने जात आहेत, असे म्हणावे लागेल. त्यात कुणी कुणाचे अंधानुकरण करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

१९८०च्या सुमारास संघटना, चळवळ आणि संप-आंदोलनाचे पेवच फुटले होते. शिक्षकांचा संप, कामगारांचा संप, आसामचे आंदोलन, कर्मचाऱ्यांच्या संघटना, हमालांच्या संघटना, उग्रवादी चळवळीमध्ये बोडोलँड, नागालँड, काश्मीर, खलिस्तान वगैरे. कुणाच्याच पदरात काहीच न पडताच या सर्व चळवळी संपून गेल्या. फक्त शेतकरी संघटनाच एवढा प्रचंड काळ टिकून आहे त्याचे कारण विचारांची ताकद हेच आहे. शरद जोशी नावाचा विचार शेतकऱ्यांच्या घराघरात पोहचला आहे. शेतीतील दारिद्र्याचा नायनाट करण्याची क्षमता केवळ शरद जोशींनी दाखविलेल्या मार्गात आहे, याची सर्वांना खात्री पटली आहे.

मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करण्यासाठी या देशातले मोठमोठे उद्योगपती,

नामवंत अर्थशास्त्रज्ञ, अर्थशास्त्राचे प्राध्यापक जेव्हा कचखाऊ वृत्ती बाळगून आहेत, तेव्हा या देशातला अनपढ-अनाडी शेतकरी मात्र मुक्त अर्थव्यवस्थेच्या बाजूने खंबीरपणे उभा ठाकला आहे. जे भल्याभल्यांना समजत नाही ते अर्थशास्त्र शेतकऱ्यांना कळलेले आहे आणि हा चमत्कार शरद जोशी नावाच्या वादळाने घडवून आणला आहे.

अडीच तपाएवढा प्रदीर्घ काळ कोटी कोटी शेतकऱ्यांच्या हृदयावर अनभिषिक्त अधिराज्य गाजवणारे वादळ ३ सप्टेंबरला वयाचे ७६ टप्पे पूर्ण करून ७७व्या टप्प्यात पदार्पण करीत आहे, त्यांना उदंड आयुष्य लाभावे म्हणून समस्त शेतकरी बांधवांतर्फे यानिमित्ताने माझ्या लाख लाख शुभेच्छा...!

■■

# कापसाची दशा, दिशा आणि दुर्दशा

यंदा पुन्हा एकदा कापसाच्या भावाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे आणि या निमित्ताने कापसाच्या उत्पादन खर्चाचा प्रश्न चव्हाट्यावर मांडला जात आहे. शेतमालास उत्पादन खर्चानुसार रास्त भाव मिळावेत, ही शेतकरी संघटनेची पूर्वीपासूनची भूमिका राहिली आहे. शेतकरी संघटनेचे प्रणेते मा. शरद जोशी यांनी विदेशातील गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून भारतात आल्यानंतर केंद्र सरकारचा कृषिमूल्य आयोग उत्पादन खर्च काढण्याच्या चुकीच्या पद्धती वापरून व त्याआधारे शेतमालाच्या किमती कमी ठेवून भारतीय शेतकऱ्यांचे कसे शोषण करतो, हे पहिल्यांदाच शास्त्रशुद्ध पद्धतीने भारतीय शेतकऱ्यांना शिकविले.

सरकार हे शेतकऱ्यांचे मायबाप असते मात्र शेतमालाला कमी भाव मिळण्याचे कारण व्यापारी असून व्यापारीच शेतकऱ्यांना लुबाडतात, असाच सार्वत्रिक समज शरद जोशी भारतात येईपर्यंत तरी प्रचलित होता. शरद जोशींनी या प्रचलित गृहितकालाच कलाटणी देऊन 'शेतकऱ्याचे मरण हेच सरकारचे अधिकृत धोरण असते, शेतीमालाला त्याचा उत्पादन खर्च भरून निघणार नाही एवढे कमी भाव देण्यासाठी सरकार नानाविध क्लृप्त्या वापरून शेतीमालाचे भाव नियंत्रित करत असते' असे ठामपणे मांडले.

तीस वर्षांच्या शेतकरी संघटनेच्या इतिहासाकडे पाहताना एक बाब अगदी स्पष्टपणे जाणवते की शेतीच्या दुर्दशेला केवळ सरकार आणि सरकारची शेतीविरोधी धोरणेच कारणीभूत आहेत, शेतकरी संघटनेच्या या विचाराला आता जगन्मान्यता मिळाली आहे. शेती विषयात वैचारिक क्रांती घडवून आणण्यात शेतकरी संघटनेला निर्भेळ यश प्राप्त झाले आहे.

**कापसाचे उत्पादन मूल्य काढण्याची सदोष शासकीय पद्धत :**

खरीप २०१०-११मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कृषिमूल्य निर्धारण समितीने कापसाचा

उत्पादन खर्च जाहीर केला (तक्ता क्र. १) त्यात अनेक दोष आहेत. पुरुष शेतमजुरीचा दर ९२/- रुपये तर महिला शेतमजुरीचा दर ५६/- रु. हिशेबात धरला आहे. वास्तविकत: शेतमजुरीचा दर निश्चित करताना पुरुष आणि महिला असा भेदभाव करण्याचे काहीच कारण नाही. शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन पुरुषांना वेगळे आणि महिलांना वेगळे देण्याची खुद्द शासनाची पद्धत नाही. केंद्र सरकारच्या १९४८च्या किमान वेतन कायद्यानुसार, किमान वेतन दरांमधील दुरुस्ती १ ऑक्टोबर २०१० रोजी करण्यात आली. राज्य सरकारी पातळीवर यामधील दुरुस्त्या वेळोवेळी झाल्या आहेत. अधिसूचित रोजगारांसाठी ठरवून दिलेले किमान वेतनाचे दर शेतीक्षेत्रासहीत सर्व संघटित तसेच असंघटित उद्योगांना लागू आहेत. केंद्र आणि राज्य सरकारी पातळीवरील सर्व अधिसूचित रोजगारांमधील अकुशल कामगारांसाठीच्या किमान वेतनाची तसेच शेतीक्षेत्रातील अधिसूचित रोजगारांमधील अकुशल कामगारांसाठीचे किमान वेतनाचे दर केंद्र पातळीवर रु. १६३/- आणि महाराष्ट्र राज्य पातळीवर रु. १२०/- असताना आणि त्यात महिला व पुरुष असा भेदभाव केला नसताना कृषिमूल्य निर्धारण समितीने कापसाचा उत्पादन खर्च काढताना किमान वेतन कायद्याने ठरवून दिलेल्या वेतनापेक्षा कमी धरणे हा कायदेशीर गुन्हाच ठरायला हवा.

तक्ता क्र. १वरून नजर फिरविली तरी शासकीय उत्पादन खर्च काढताना झालेल्या किंवा जाणूनबुजून केलेल्या चुका व त्रुटी सहजपणे लक्षात येतील. शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना सदोष कार्यपद्धती आणि चुकीची आकडेवारी वापरून सरकार दुहेरी बदमाशी करत असल्याचे ठळकपणे जाणवायला लागते. कृषिमूल्य आयोग किंवा कृषिमूल्य निर्धारण समिती ज्या सदोष पद्धतीने कापसाचा उत्पादन खर्च काढते, त्याच तक्त्यात जर वस्तुनिष्ठ आकडे घातले तरी कापसाचा उत्पादन खर्च ७९६६/- रु. प्रति क्विंटल एवढा निघतो. (तक्ता क्र. २)

तक्ता क्र. २ मध्ये कापसाचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल ७९६६/- रुपये निघत असला तरी या उत्पादन खर्चाला शास्त्रशुद्ध उत्पादनखर्च म्हणता येणार नाही, कारण यामध्ये अनेक लागवडी व अन्य खर्च समाविष्ट झालेले नाहीत, उदा. हिशेबामध्ये शेतीला ६ टक्के व्याजदराने वित्तपुरवठा केला जातो असे गृहीत धरून सहा महिने खेळते भांडवल या तऱ्हेने ३ टक्के व्याज धरले गेले आहे; परंतु बँका शेतकऱ्याच्या घरात नसतात, तालुक्याच्या ठिकाणी असतात. बँकेपर्यंत जायला प्रवासखर्च येतो, नोड्यूज काढायला अवांतर बँकांकडे रीतसर पैसे भरावे लागतात. शेत गहाण करायला स्टॅम्प ड्युटी लागते, अन्य कागदपत्रे गोळा करायला खर्च येतो याकडे साफ दुर्लक्ष केले गेले आहे.

# तक्ता क्र. १

Per hectare item-wise cost of cultovation of kharif crop "Cotton (Long staple)" in Maharashtra for 2010-11 Marketing Season

| Sr. No. | Items | | Units | Inputs per hectare | Cost per unit of inputs (Rs) | | Total cost per hectare (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Hired Human Labour | Male | Days | 19.47 | 92.00 | | 1,791.24 |
| | | Female | Days | 92.71 | 56.00 | | 5,191.76 |
| 2 | Bullock Labour | | Pair Days | 19.62 | 295.00 | | 5,787.90 |
| 3 | Machinery Charges | | Rs | - | - | | 1,007.55 |
| 4 | Seed | | Kg | 1.62 | 1,518.00 | | 2,459.16 |
| 5 | Manure | | Cartload | 6.15 | 256.00 | | 1,574.40 |
| 6 | Fertilizers (In terms of nutrients) | N | Kg | 61.12 | 10.50 | 641.76 | |
| | | P | Kg | 43.00 | 21.63 | 930.09 | |
| | | K | Kg | 19.95 | 7.43 | 148.23 | |
| | Sub Total 6 | | Rs | | | 1,720.08 | 1,720.08 |
| 7 | Irrigation Charges | | Rs | | | | 243.47 |
| 8 | Insecticides | | Rs | | | | 1,155.43 |
| 9 | Insurance Charges | | Rs | | | | 1,239.04 |
| 10 | Incidental Charges | | Rs | | | | 242.55 |
| | Working Capital (Item 1 to 10) | | Rs | | | | 22,412.58 |
| 11 | Interest on working capital | | Rs | | | | 672.38 |
| 12 | Land revenue, cess,& taxes | | Rs | | | | 39.69 |
| 13 | Depreciation on implements & farm buildings | | Rs | | | | 441.73 |
| | Cost A1 | | Rs | | | | 23,566.38 |
| | Cost A2 (A1+rent paid for leased in land) | | Rs | | | 3,249.27 | - |
| | Cost A2F1 (A2+Family Labour) | | Rs | | | | 26,815.65 |
| 14 | Interest on Fixed capital | | Rs | | | | 770.24 |
| | Cost B1(A1+Interest on fixed capital) | | Rs | | | | 24,336.62 |
| 15 | Rental Value of Land | | Rs | | | | 6,215.31 |
| | Cost B2(B1+Rental Value of Land+ rent paid for leased in land) | | Rs | | | | 30,551.93 |
| 16 | Family Human Labour | Male | Days | 23.12 | 92.00 | | 2,127.04 |
| | | Female | Days | 20.04 | 56.00 | | 1,122.24 |
| | Cost "C1" (B1+Family labour) | | Rs | | | | 27,585.90 |
| | Cost "C2" (B2+Family labour) | | Rs | | | | 33,801.21 |
| 17 | yield per hectare | | Qtls | | | | 12.51 |
| 18 | Per Quintal cost C2 | | Rs/Qtls | | | | 2,701.93 |
| | Per Quintal Marketing Charges | | Rs/Qtls | | | | 133.50 |
| | Per Quintal Transport Charges | | Rs/Qtls | | | | 45.00 |
| | Cost C2 (Per Quintal) | | Rs/Qtls | | | | 2,880.43 |
| 19 | Cost C3 (C2+10% of C2)* | | Rs/Qtls | | | | 3,168.48 |
| 20 | Value Of main produce per hectare | | Rs | | | | 39,637.66 |
| 21 | Value Of bi-produce per hectare | | Rs | | | | - |
| 22 | Per Quintal cost of cultivation | | Rs | | | | 3,168.48 |

* It is suggested that following additional amt (per Qtls cost) be consider other than price quoted above for the benefit of farmer interest on working capital (half yearly) 53.79 53.75

15% Profit on cost of cultivation 475.27

Per quintal proposed cost of cultivation 3,697.54

*Note : Transport Charges & Marketing Charges are included in cost C2 as recommonded by Alagh Committee.*

## तक्ता क्र. २

*Per Hectare cost of cultovation of kharif crop "Cotton" in Maharashtra for 2011-12 Marketing Season*

| Sr. No. | Items | | Units | Inputs per hectare | Cost per unit of inputs (Rs) | | Total cost per hectare (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Hired Human Labour | Male | Days | 19.47 | 200.00 | | 3,894.00 |
| | | Female | Days | 92.71 | 200.00 | | 18,542.00 |
| 2 | Bullock Labour | | Pair Days | 19.62 | 600.00 | | 11,772.00 |
| 3 | Machinery Charges | | Rs | - | - | | 2,500.00 |
| 4 | Seed | | Kg | 1.62 | 1,518.00 | | 2,459.16 |
| 5 | Manure | | Cartload | 10 | 400.00 | | 4,000.00 |
| 6 | Fertilizers (In terms of nutrients) | DAP | 50 Kg/Bag | 3 | 956.00 | 2,868.00 | |
| | | Urea | 50 Kg/Bag | 3 | 281.00 | 843.00 | |
| | | Potash | 50 Kg/Bag | 1 | 595.00 | 595.00 | |
| | Sub Total 6 | | Rs | | | 4,306.00 | 4,306.00 |
| 7 | Irrigation Charges | | Rs | | | | - |
| 8 | Insecticides | | Rs | | | | 1,155.43 |
| 9 | Insurance Charges | | Rs | | | | - |
| 10 | Incidental Charges | | Rs | | | | 5,000.00 |
| | Working Capital (Item 1 to 10) | | Rs | | | | 53,634.59 |
| 11 | Interest on working capital | | Rs | | | | 2,896.27 |
| 12 | Land revenue, cess,& taxes | | Rs | | | | 39.69 |
| 13 | Depreciation on implements & farm buildings | | Rs | | | | 4,000.00 |
| | Cost A1 | | Rs | | | | 60,570.55 |
| | Cost A2 (A1+rent paid for leased in land) | | Rs | | | 3,249.27 | - |
| | Cost A2F1 (A2+Family Labour) | | Rs | | | | 63,819.82 |
| 14 | Interest on Fixed capital | | Rs | | | | 770.24 |
| | Cost B1(A1+Interest on fixed capital) | | Rs | | | | 61,340.79 |
| 15 | Rental Value of Land | | Rs | | | | - |
| | Cost B2(B1+Rental Value of Land+ rent paid for leased in land) | | Rs | | | | 61,340.79 |
| 16 | Family Human Labour | Male | Days | 23.12 | 200.00 | | 4,624.00 |
| | | Female | Days | 20.04 | 200.00 | | 4,008.00 |
| | Cost "C1" (B1+Family labour) | | Rs | | | | 69,972.79 |
| | Cost "C2" (B2+Family labour) | | Rs | | | | 69,972.79 |
| 17 | yield per hectare | | Qtls | | | | 12.00 |
| 18 | Per Quintal cost C2 | | Rs/Qtls | | | | 5,831.07 |
| | Per Quintal Marketing Charges | | Rs/Qtls | | | | 133.50 |
| | Per Quintal Transport Charges | | Rs/Qtls | | | | 150.00 |
| | Cost C2 (Per Quintal) | | Rs/Qtls | | | | 6,114.57 |
| 19 | Cost C3 (C2+10% of C2)* | | Rs/Qtls | | | | 6,726.02 |
| 20 | Value Of main produce per hectare | | Rs | | | | 80,712.27 |
| 21 | Value Of bi-produce per hectare | | Rs | | | | - |
| 22 | **Per Quintal cost of cultivation** | | **Rs** | | | | **6,726.02** |

* It is suggested that following additional amt (per (Qntls cost) be consider other than price quoted above for the benefit of farmer interest on working capital (half yearly) 231.70
15% Profit on cost of cultivation 1,008.90 **Per quintal minimum cost of cultivation 7,966.63**
*Note :Marketing Charges are included in cost C2 as recommonded by Alagh Committee & Transport Charges as per market freight rates.*

**शास्त्रशुद्ध उत्पादन खर्च कसा असेल?**

कापसाचा उत्पादन खर्च

**प्रमाण :** १ शेतकरी १० एकर कापसाची शेती.

उत्पादनखर्च १० एकर कापूस पिकाचा खालीलप्रमाणे.

**अ) भांडवली खर्च :**

| | | |
|---|---|---|
| १) शेती अवजारे-खरेदी/दुरुस्ती | : | २०,०००.०० |
| २) बैलजोडी | : | ८०,०००.०० |
| ३) बैलांसाठी गोठा | : | १,००,०००.०० |
| ४) साठवणूक शेड | : | १,००,०००.०० |
| एकूण भांडवली खर्च | : | ३,००,०००.०० |

**ब) चालू खर्च** (खेळता भांडवली खर्च)

| | | |
|---|---|---|
| १) शेणखत | : | १,२०,००० रु. |
| २) नांगरट करणे | : | ८,००० रु. |
| ३) ढेकळे फोडणे, सपाटीकरण | : | ४,००० रु. |
| ४) काडीकचरा वेचणे | : | ८,०००.०० रु. |
| ५) बियाणे | : | १८,६०० रु. |
| ६) लागवड खर्च | : | ८,००० रु. |
| ७) खांडण्या भरणे | : | २,००० रु. |
| ८) निंदणी / खुरपणी खर्च (दोन वेळा) | : | १५,००० रु. |
| ९) रासायनिक खत मात्रा | : | २४,००० रु. |
| १०) रासायनिक खत मात्रा- मजुरी खर्च | : | ८,००० रु. |
| ११) सूक्ष्म अन्नद्रव्य | : | ७,००० रु. |
| १२) कीटकनाशके | : | ३०,००० रु. |
| १३) फवारणी मजुरी | : | ६,००० रु. |
| १४) कापूस वेचणी (६० क्विंटल) | : | ५२,००० रु. |
| १५) वाहतूक/ विक्री खर्च | : | ५,००० रु. |
| १६) बैलाची ढेप/पेंड | : | ३,००० रु. |
| १७) बांधबंदिस्ती/सपाटीकरण खर्च | : | २०,००० रु. |
| एकूण खेळते भांडवली खर्च | : | ३,३८,६०० रुपये |

| | | |
|---|---|---|
| १) भांडवली खर्चावरील व्याज | : | ३२,०००.०० |
| २) चालू गुंतवणुकीवरील व्याज | : | ३०,०००.०० |
| ३) भांडवली साहित्यावरील घसारा | : | ३२,०००.०० |
| क) एकूण खर्च १+२+३ | : | ९४,०००.०० |
| अ) खेळत्या भांडवली खर्चावरील व्याज | : | ६६,००० रु. |
| ब) एकूण खेळते भांडवली खर्च | : | ३,६८,६०० रु. |
| **क) एकूण उत्पादन खर्च १+२+३** | **:** | **४,९८,६०० रु.** |

**निष्कर्ष**

१) १० एकरात ६० क्विंटल कापूस पिकविण्याचा खर्च: ४,९८,६०० रु.

२) १ एकरात ६ क्विंटल कापूस पिकविण्याचा खर्च : ४९,८६० रु.

म्हणजेच प्रतिक्विंटल कापसाचा किमान उत्पादन खर्च हा ८३१० रु. एवढा निघतो.

**टीप :**

१) दर चार वर्षांतून एकदा शेतीमध्ये ओला किंवा कोरडा दुष्काळ हमखास पडतच असतो. त्यामुळे उत्पादन खर्च काढताना चार वर्षांच्या लागवडीचा खर्च तीन वर्षांच्या उत्पादनावर/पिकांवर लावणे गरजेचे आहे. अशा तऱ्हेचा निकष औद्योगिक उत्पादनाचे मूल्य ठरविताना लावले जातच असतो. त्या हिशेबाने प्रतिक्विंटल कापसाचा उत्पादन खर्च १०,४०० रुपयांवर जातो.

२) लागवडी खर्चामध्ये किरकोळ खर्च, बैलांचा चारा, बैलांचा इन्शुरन्स धरला तर प्रति क्विंटल कापसाचा उत्पादन खर्च ११,५०० रुपयांवर जातो.

३) दुष्काळ, महापूर किंवा अवर्षणामुळे होणारी हानी तसेच माकड, डुक्कर व वन्य श्वापदांपासून होणारे नुकसान हिशेबात धरल्यास प्रतिक्विंटल कापसाचा उत्पादनखर्च १३००० रुपयांवर जातो.

वरीलप्रमाणे मी काढलेला कापसाच्या शेतीचा उत्पादन खर्च निर्दोष आहे, असे म्हणता येणार नाही; पण जाणकारांनी यावर चर्चा केल्यास, त्रुटी निदर्शनास आणल्यास यात बरीच सुधारणा करता येईल.

**उत्पादन खर्च काढताना मी गृहीत धरलेल्या काही मुद्द्यांचे स्पष्टीकरण असे :**

१) एक शेतकरी व एक बैलजोडी १० एकर कापसाची शेती करू शकतो, असे

गृहीत धरले आहे.

२) सर्व भांडवली खर्च १० वर्षांसाठी गृहीत धरला आहे. व्याज १० टक्के गृहीत धरले आहे.

३) सर्व भांडवली सामुग्रीचे सरासरी आयुष्य १० वर्षे गृहीत धरून त्यावर १० टक्के घसारा गृहीत धरला आहे.

४) शेणखत, नांगरट, बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, सूक्ष्मखते आणि फवारणी यांच्या मात्रा कृषी विद्यापीठे यांच्या शिफारसींवर आधारित आहेत किंवा त्यापेक्षाही कमी खर्च हिशेबात धरला आहे.

५) शेतमजुरीचा दर २०० रुपये धरलेला आहे.

६) कपाशीच्या दुबारपेरणीचे संकट निर्माण झाल्यास त्यापोटी वाढणारा बियाणाचा खर्च हिशेबात धरलेला नाही.

७) शेतजमिनीची किंमत आणि त्या भांडवली गुंतवणुकीवरील व्याज हिशेबात धरलेले नाही. त्यामुळे वडिलोपार्जित शेतजमीन ज्यांच्याकडे नाही, त्यांनी शेतजमीन खरेदी करून कापसाची शेती करायची म्हटले तर उत्पादन खर्च आणखी वाढेल.

८) वरील उत्पादनखर्चात काटकसर आणि बचत करायचा प्रयत्न केल्यास उत्पादन घटत जाते. तसेच खर्च वाढवायचा प्रयत्न केल्यास उत्पादनात वाढ होण्याची शक्यता बळावत जाते.

९) शेतीमधील खेळत्या भांडवल तुटवड्याचा पहिला मार जमिनीच्या पोत सुधारणीच्या कामावर पडतो. उदा. शेणखताचा खर्च हिशेबात १,२०,०० रुपये धरला आहे. जमिनीचा पोत कायम राहण्यासाठी एकरी १० गाड्या शेणखत घालणे गरजेचे आहे; पण आर्थिक टंचाईमुळे शेणखत किंवा सेंद्रिय खताचा वापर टाळला किंवा कमी केला जातो. त्यामुळे जमिनीचा पोत घसरतो. कालांतराने जमीन नापीक होऊन अपेक्षित उत्पन्न येत नाही. शेणखत किंवा सेंद्रीय खतावरील खर्च टाळल्याने लागवडीचा खर्च कमी होतो; पण उत्पन्नातही घट येते. सेंद्रीय खर्चात बचत केल्याने लागवड खर्च कमी होतो; पण उत्पन्नातही घट आल्याने उत्पादन खर्च कमी होत नाही.

९) बागायती शेतीत उत्पन्नात वाढ होत असली तरी ओलिताची सुविधा निर्माण करण्यास लागणारी भांडवली गुंतवणूक, ओलितासाठी लागणारा मजुरी खर्च आणि विद्युत/डिझेलचा खर्च वाढत जातो म्हणून शेवटी जिरायती शेती असो की बागायती शेती; उत्पादन खर्च सारखाच निघतो.

**तोट्याच्या शेतीचे दुष्परिणाम**

१) शेतीत येणारी तूट भरून काढताना शेतकऱ्याचे कुपोषण होते, म्हणून

शेतकरी शरीराने कृश व हडकुळा दिसतो. शेतकऱ्याचे सरासरी आयुष्यमान कमी होते.

२) सुखाचे व सन्मानाचे जीवन जगता येत नाही.

३) मूलभूत गरजा पूर्ण करता येत नाही.

४) शेतकरी ज्या प्रदेशात राहतो तो भाग, गाव ओसाड आणि भकास होतो.

५) शेतीत येणारी तूट भरून निघत नाही म्हणून शेतकरी वारंवार कर्जबाजारी होतो.

६) कापसाची शेती करताना कधीच भरून निघणार नाही एवढी तूट आली आणि सात जन्मात फेडता येणार नाही एवढ्या कर्जाचा डोंगर उभा राहिला की शेतकऱ्यात नैराश्य येते.

७) आयुष्य जगण्याचे सर्व मार्ग बंद झाले की तो मग नाईलाजाने विषाची बाटली किंवा गळफासाशी सोयरीक साधून तुम्हा आम्हा सर्वांना सोडचिठ्ठी देतो.

■■

# गरिबी निर्मूलनाची क्षमता केवळ शेती व्यवसायातच

शेती व्यवसायातील गरिबी संपवायची असेल तर शेती व्यवसायातून अतिरिक्त मनुष्यबळ कमी केले पाहिजे, असे वक्तव्य मागे एकदा एका शेतकरी मेळाव्यात बोलताना एका मंत्र्याने केले होते. त्याच दिवशी दुसऱ्या एका सभेत बोलताना शेती व्यवसायाला बरकत येण्यासाठी शेतकऱ्यांनी जोडधंदे करायला हवेत, त्यासाठी शेतकऱ्यांना मदत करायला सरकार निधीची अजिबात कमतरता भासू देणार नाही, असेही जाहीर करून ते मोकळे झाले होते.

दोन्ही वक्तव्यांतून शेतीमध्ये प्रत्यक्ष कामाच्या गरजेपेक्षा अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे ध्वनित होते; परंतु प्रत्यक्षात मात्र परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. जे प्रत्यक्ष शेतीव्यवसायात आहेत किंवा ज्यांची नाळ प्रत्यक्ष शेतीव्यवसायाशी जुळलेली आहे त्यांना पक्के ठाऊक आहे की शेतीमध्ये मनुष्यबळाची प्रचंड कमतरता आहे. अनेक वेळा शेतीची कामे एकाच हंगामात एकाच वेळी येत असल्याने मजुरांचा प्रचंड तुटवडा जाणवतो. पेरणी, लागवड, खुरपणी किंवा पीक काढणीसारखी कामे योग्य त्या वेळी करणे शक्य होत नाही. शेतीतील कामाच्या वेळापत्रकाला अनन्यसाधारण महत्त्व असल्याने व वेळची कामे वेळेत न आटोपल्याने मग उत्पन्नात जबरदस्त घट येते. उत्पादनवाढीसाठी जिवाचा आटापिटा करणे हा उत्पादकवर्गाचा मूलभूत पैलू असल्याने व शेतकरी हा उत्पादकवर्गामध्ये मोडत असल्याने वेळची कामे वेळेत उरकण्यासाठी प्रयत्न करणे हा गुण त्याच्या रक्तामांसातच भिनला असतो. उत्पादन वाढविण्यासाठी मजुरांची मदत घेणे क्रमप्राप्त ठरल्याने मग मजूर कमी आणि गरज जास्त अशी परिस्थिती उद्‌भवताच अचानक मजुरीच्या दरात प्रचंड उलथापालथ होते. शेतमजुरीची दरनिश्चिती सरकारच्या नियोजनामुळे होत नाही किंवा शेतमजुरांच्या युनियनने संप पुकारला म्हणून शेतमजुरीच्या दरात वाढ होत नाही तर शेतमजुरीच्या दरातील बदल मागणी-पुरवठ्याच्या सिद्धांतानुरूप बदलत असते.

आजपर्यंत कामाच्या शोधात खेड्याकडून पावले शहराकडे धावायची; पण गेल्या काही वर्षांपासून अकस्मातच काळ बदलला आहे. गंगा उलटी वाहायला लागून वळणीचे पाणी आड्यावर जायला सुरुवात झाली आहे. मोलमजुरी आणि कामधंदा शोधण्यासाठी शहरातील पावले गावाकडे वळायला लागली आहेत. आम्ही शाळा शिकत असताना आम्हाला सांगितले जायचे की अमेरिकेतील मोलकरीण स्वत:च्या चारचाकी गाडीने भांडी घासायला मालकाच्या घरी जात असते, एवढा तो देश समृद्ध आहे. आम्हाला ते ऐकताना मोठे कुतूहल वाटायचे. एक दिवस भारतातील शेतमजूरही चारचाकी गाडीमध्ये बसून शेतावर काम करायला जाईल असे जर भाकीत त्याकाळी कुणी वर्तवले असते तर त्याची रवानगी थेट वेड्यांच्या इस्पितळात केली गेली असती; मात्र अगदी पंधरा-वीस वर्षांच्या काळातच इतिहासाला कलाटणी मिळाली असून शहरातील मजूरवर्ग चारचाकी वाहनात बसून थेट खेड्यात येऊन शेतीच्या बांधावरच उतरायला लागला आहे. फरक एवढाच की अमेरिकेतील मोलकरीण भांडी घासायला मालकाच्या घरी स्वतःच्या चारचाकी गाडीने जात असते, आमचा मजूरवर्ग मात्र किरायाच्या गाडीने जातो. त्यासोबतच परप्रांतीयाचे लोंढेही आता गावामध्ये उतरायला लागले आहेत.

मुंबई-पुण्यासारख्या शहरांना परप्रांतीयाचे लोंढे नकोनकोसे होत असताना आणि त्यांना हुसकावण्यासाठी शर्थीचे प्रयत्न होत असताना खेड्यात मात्र याच परप्रांतीयांचे दिलखुलासपणे स्वागत केले जात आहे. खेड्यातील शेतकरी परप्रांतात जाऊन तेथील कामगारांना आपल्या गावात येण्याचे निमंत्रण देऊ लागला आहे. गावामध्ये आल्यानंतर त्यांची निवासाची व्यवस्था राजीखुशीने करायला लागला आहे.

शेतमजुरीचे सतत वाढते दर आणि शेतकरीवर्गाकडून परप्रांतीयांचे स्वागत ह्या दोन्ही बाबी शेती व्यवसायात मनुष्यबळाची प्रचंड कमतरता आहे, हे अधोरेखित करणाऱ्या आहेत; पण आमच्या शासनकर्त्यांचे पाय जमिनीला लागत नसल्याने वास्तविक स्थितीपासून ते बरेच लांब असतात. १९९०मध्ये जे वाचले, पाहिले त्या आधाराने ते २०१०मध्ये बोलत असतात. काळाचा प्रवाह सतत बदलत असतो, याचाही त्यांना विसर पडायला लागतो. त्यामुळेच मग त्यांना शेतीमध्ये अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध असल्याचा साक्षात्कार व्हायला लागतो.

औद्योगिक विकासासाठी शेतीमध्ये तयार होणारा कच्चा माल स्वस्तात स्वस्त भावाने उपलब्ध होईल अशाच तऱ्हेने स्वातंत्र्योत्तर काळात ध्येयधोरणे राबविली गेली. तरीही बेरोजगारीचा प्रश्न सुटला नाही कारण भारतासारख्या प्रचंड जनसंख्या असलेल्या देशाला गरजेएवढा रोजगार पुरविण्याची क्षमता औद्योगिक क्षेत्राकडे कालही नव्हती, आजही नाही व उद्याही असणार नाही, हे जेवढे लवकर नियोजनकर्त्यांना कळेल

तेवढे लवकर भारताच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने पाऊल पडण्यास सुरुवात होईल. शहरातील मनुष्य कामधंद्याच्या शोधात खेड्याकडे वळायला लागला, ही घटनाच मुळात शेती व्यवसायामध्ये रोजगाराच्या अमाप संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता असल्याचे द्योतक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यांतील श्रमशक्तीचे शोषण करून शहरे फुलविणाऱ्या धोरणात्मक नियोजनकर्त्यांच्या मुस्कटात काळाच्या महिम्याने सणसणीतपणे हाणलेली ही चपराक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शेतीकडे जर अक्षम्य दुर्लक्ष झाले नसते तर आज देशात वेगळे चित्र पाहायला मिळाले असते. शेतीमध्ये जर भांडवली बचत निर्माण व्हायला लागली तर शेतीमध्ये रोजगाराचे अमाप दालन खुले होऊन देशाचा कायापालट होऊ शकतो. देशांतर्गत दूध आणि मांसाची आवश्यक गरज जरी पूर्ण करायची म्हटले तरी पशुपालन व्यवसायामध्ये प्रचंड रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. शेती करून किंवा शेतीशी निगडित व्यवसाय करून जर सन्मानजनक जीवन जगता आले तर सुशिक्षित बेरोजगारांची पावले एमआयडीसीऐवजी रानमाळाकडे वळू शकतात. एका घरात दोन भाऊ असतील तर एक भाऊ शेती आणि दुसरा भाऊ पशुपालन अशी विभागणी होऊन एका घरात दोन स्वतंत्रपणे व्यवसाय उभे राहू शकतात. उद्योगात किंवा कारखान्यात एक रोजगार निर्माण करायला कोट्यवधीची गुंतवणूक करावी लागते. त्याउलट शेतीनिगडित व्यवसायात केवळ दोन-तीन लक्ष रुपयांच्या भांडवली गुंतवणुकीत आठ-दहा लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. यातूनच ग्रामविकासाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. गरिबी आणि दारिद्र्याचा समूळ नायनाट होऊ शकतो. हजारो कोटी रुपये खर्चाच्या भिकेच्या अनुदानात्मक योजना राबविण्याची गरजही संपुष्टात येऊ शकते.

आणि एवढे सगळे घडून येण्यासाठी शासनाला तिजोरीतून एक दमडीही खर्च करण्याची गरज नाही. एका दाण्यापासून हजार दाणे निर्माण करण्याचे सामर्थ्य मातीला आणि गवत-कडब्यापासून दूध निर्माण करण्याची कला गाई-म्हशीला निसर्गानेच दिलेली आहे. केवळ शेतीतून किंवा शेतीशी निगडित व्यवसायातून उत्पादित होणाऱ्या मालावर शासनकर्त्यांनी निष्कारण निर्बंध लादणे तेवढे थांबवले पाहिजे...

बस्स एवढेच पुरेसे ठरेल शेतीच्या विकासासाठी!

■■

# असा आहे आमचा शेतकरी

मुंबईतील चतुरंग प्रतिष्ठान संस्थेचा या वर्षीचा सामाजिक क्षेत्रासाठी असलेला जीवनगौरव पुरस्कार शेतकरी संघटनेचे प्रणेते श्री. शरद जोशी यांना प्रदान करण्यात आला. मुलूंड, मुंबई येथील कालिदास नाट्यगृहात १८ डिसेंबर २०१२ रोजी संपन्न झालेल्या भव्य संमेलनात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी उपस्थितांनी सुमारे पाच मिनिट उभे राहून प्रचंड टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट करून मा. शरद जोशींना मानवंदना दिली. त्या क्षणापासून सतत एक विचार मनात घोळतोय, अनेक प्रश्न मनात निर्माण होतात ज्याची उत्तरे मिळत नाहीत. उत्तर मिळाल्यासारखे वाटत असतानाच पुन्हा एक नवीन प्रश्न निर्माण होतो.

त्या सभागृहात उपस्थित असलेल्या सुमारे अडीच हजार उपस्थितांपैकी बहुतांश शहरी आणि मुख्यत्वेकरून मुंबईकरच होते. ज्यांचा कधीही शेती विषयाशी दूरान्वयानेही संबंध आलेला नव्हता. शेतीमालाला रास्त भाव मिळाले तर त्याचा त्यांना लाभ मिळण्याऐवजी फटकाच बसणार होता. दूध आंदोलनाने दुधाचे भाव वाढले तेव्हा त्यांच्याच खिशातून जास्तीची रक्कम खर्च झाली होती. उसाचे दर वाढून साखर महाग झाली तेव्हा त्यांच्याच घरगुती बजेटवर आघात झाला होता. शेतमालास उत्पादनखर्चानुसार रास्त भाव द्यायच्या प्रयत्नापोटी अन्नधान्याचे दर वाढले तर त्याचा तडाखाही त्यांनाच बसणार होता आणि तरीही ही शहरी मंडळी शरद जोशींच्या व्यक्तिमत्त्वासमोर नतमस्तक होऊन मानवंदना देण्यासाठी पाच मिनिटे उभे राहून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करीत होती. याचे कारणही स्पष्ट होते; की त्यांना शरद जोशी आणि त्यांचे कर्तृत्व कळले होते.

मात्र याउलट स्थिती ग्रामीण महाराष्ट्रात पाहायला मिळते. शेतीमालाला रास्त भाव हा एककलमी कार्यक्रम घेऊन ज्यांच्यासाठी शरद जोशींनी उभे आयुष्य खर्ची घातले, संसाराची राखरांगोळी होत असतानाही अविचल राहून ऋषितुल्य जीवन जगून नेटाने शेतकरी चळवळ पुढे नेली, अडगळीत पडलेला शेतीच्या अर्थवादाचा

विषय कृतिशीलतेने केंद्रसरकारच्या अजेंड्यावर आणून ठेवला, त्या शरद जोशींविषयी ग्रामीण महाराष्ट्र उदासीनता का दाखवतो? असा प्रश्न वारंवार पडणे स्वाभाविक आहे. ज्या शेतकरी संघटनेने अनेकदा आंदोलने करून शेतमालाला भाव मिळवून दिले, शेतकऱ्याकला स्वाभिमानाने जगायला शिकविले, दोनदा हजारो कोटी रकमेची कर्जमुक्ती मिळवून दिली त्या संघटनेला राजकीय यश मिळवून देताना शेतकरी समाज कंजूषी का दाखवतो, असाही प्रश्न उपस्थित होऊन मनात निराशा येणे स्वाभाविक आहे. मात्र ग्रामीण महाराष्ट्राला शरद जोशी आणि त्यांचे कर्तृत्व कळले नाही, असे म्हणता येत नाही. इतिहासातला एकमेव शेतकरी नेता म्हणून शरद जोशी यांचे नाव जनमान्यता पावून प्रत्येक शेतकर्योंच्या हृदयात कोरले गेले आहे. शेतकऱ्यांना संघटित करून भीक नको हवे घामाचे दाम असा मंत्र देऊन शेतकऱ्यांना सन्मानाने जगायला शिकविण्याचे त्यांचे योगदान वादातीत आहे. शेतकऱ्याच्या मरणाचे कारण सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामध्ये दडले आहे, याविषयीसुद्धा आता कुणाचेच दुमत राहिलेले नाही, पण जातिभेदांचे अडथळे दूर सारून शरद जोशींच्या पाठीशी एकसंघ उभे राहण्याची ऊर्मी शेतकरी समाजामध्ये का निर्माण होत नाही, हाच खरा कळीचा मुद्दा आहे. शेतकरी आंदोलनामुळे शेतमालाला बरे भाव मिळालेत, असे खाजगीत मान्य करणारा शेतकरी जाहीरपणे तसे मान्य करेलच याची खात्री देता येत नाही. शरद जोशींमुळेच कर्जमुक्ती मिळाली असे चार भिंतीच्या आड बोलणारा शेतकरी चावडीवर बसल्यानंतर गावच्या राजकीय धेंडासमोर बोलताना कृषिमंत्र्यांनी कर्जमुक्ती केली असावी, असे कसे काय म्हणू शकतो, हाही चिंतनाचाच विषय ठरतो.

मात्र शेतकरी समाजाविषयी माझी काहीही तक्रार नाही आणि तक्रार असण्याचे कारणही नाही. हजारो वर्षे आर्थिक गुलामगिरीचे, लाचारीचे व अपमानास्पद जीवन जगता-जगता स्वाभिमान व सन्मानाचे जीवन जगण्याची प्रेरणा देणारी जनुकेच या शेतकरी समाजाच्या रक्त-मांस-पेशीतून हद्दपार झालेली असणार हे उघड आहे. आंदोलनाने शेतमालाचे भाव वाढून शेतकऱ्याच्या घरात स्वतःच्या हक्काचे वीस-पंचेविस हजार रुपये जास्त आले तरी त्याला ते महत्त्वाचे वाटत नाही व संघटनेचा झेंडा हातात घ्यावा, असेही वाटत नाही, मात्र; एखाद्या पुढाऱ्याने कोंबडी-बकरी घेण्यासाठी हजार दोन हजार रुपयांची अनुदान स्वरूपातील भीक मिळवून दिली तर त्या शेतकऱ्याला त्या पुढाऱ्याचा झेंडा हातात घेऊन नाचावेसे वाटते; एवढेच नव्हे तर आयुष्यभर त्या पुढाऱ्याचे धोतर धूत बसावेसे वाटते, हा स्वाभिमान निर्माण करणारी जनुके निष्क्रिय किंवा नष्ट झाल्याचा पुरावाच मानावा लागेल. पन्नास रुपयाची तूर बियाणाची पिशवी अनुदानावर फुकटात मिळविण्यासाठी साठ-सत्तर रुपये बसचे

तिकीट खर्च करून तालुक्याच्या ठिकाणी सोसायटीसमोर चार तास रांग लावणारी माणसे शेतकरी समाजात मूबलक आणि घाऊक प्रमाणात उपलब्ध आहेत. शेतमालाचा उत्पादन खर्च दर्शविणाऱ्या हिशेबाशी शेतकऱ्याचे हाडवैर आहे. ताळेबंद आणि अंदाजपत्रक या दोन शब्दांची त्याला ॲलर्जी आहे. वर्षभराचा शेतीचा खर्च एका वहीत लिहून नफा-तोटा याचा आढावा घेणारा शेतकरी लाखात एखादा मिळाला तर आश्चर्य वाटावे, अशी स्थिती आहे.

शेतकऱ्यांची संघटना असावी असे त्याला वाटते, पण त्यात आपलेही योगदान असावे, हे त्याला मान्य नाही. शिवाजी जन्माला यावा; पण तो शेजाऱ्याच्या घरात, आपल्या घरात नको, हीच त्याची मनोधारणा कायम आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आपली लोकशाही प्रगल्भ झाल्याचा आपण कितीही दिंडोरा पिटत असलो तरी जात आणि धर्म बाजूला ठेवून विकास किंवा अर्थकारणाच्या आधारावर मतदान करून देशाला उज्ज्वल भविष्याकडे नेणाऱ्या नेत्याला किंवा उमेदवाराला मतदान करायचे असते, या मूलभूत जाणीवेपासून आमची लोकशाही हजारो मैल दूर आहे.

एका-एकुल्या 'व्होटा'साठी, थैली-थैली नोटा
कुणी पिलवती इंग्लिश-देशी, कोणी हाणती सोटा
कोणी करिती लांगूलचालन, कोणी लोटांगण जाती
भले-शहाणे-सुविद्यही खाती, जातीसाठी माती

ज्या लोकशाहीत सज्जन असो वा दुर्जन, पुढारी असो वा पत्रकार, वकील असो वा न्यायाधीश, शिक्षित असो वा अशिक्षित, श्रीमंत असो वा गरीब, थोर विचारवंत असो वा महान कलावंत; या सर्वांना जाती-पाती धर्म-पंथाच्या आधारावर मतदान करण्याचा रोगच जडला आहे, त्या लोकशाहीत केवळ शेतकरी तितुका एक-एक होऊन जाती-धर्माला तिलांजली देऊन पोटापाण्याच्या प्रश्नाच्या आधारावर मतदान करेल, ही कल्पनाच व्यर्थ ठरते. त्यामुळे मतपेटीतून प्रश्नाची उकल होण्याची शक्यता निकाली निघते.

लोकशाहीत दबावगटाला अनन्यसाधारण महत्त्व असते. शासकीय निर्णयप्रक्रियेवर प्रभाव पाडण्याची दबावगटाची क्षमता निर्विवाद असते; पण तेथेही आमचा शेतकरी तोकडा पडतो. अन्यायाविरुद्ध शेतकरी पेटून उठत नाही, पूर्ण ताकतीनिशी संघटित शक्तीचे प्रदर्शन करीत नाही त्यामुळे कधीकधी संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये नैराश्य येते आणि संघटनेचे कार्य थांबवून द्यावे, अशी दबक्या आवाजात कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू होते. अडीच तपाएवढा प्रदीर्घ काळ शेतकरी चळवळीसाठी खर्ची

घालूनही जर शेतकरी समाजामध्ये हव्या त्या प्रमाणात जनजागृती होत नसेल तर या समाजासाठी पुढील उर्वरित आयुष्य खर्ची घालून वेळ दवडायचे थांबवून द्यावे काय, असाही एक मतप्रवाह अधूनमधून उचल खात असतो.

अशावेळी सर्वांनी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, अनेक पिढ्या शेतकरी समाजाला शुद्रतेची वागणूक मिळाल्याने या समाजातून सन्मानाने जीवन जगण्याची प्रेरणाच लोप पावलेली आहे. 'ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान' हाच त्याने जीवन जगण्याचा मूलभूत सिद्धांत म्हणून स्वीकारलेला आहे. देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगण्याचा आपलाही जन्मसिद्ध अधिकार आहे, याचा त्याला विसर पडलेला आहे. शेतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करण्याचा एक भाग म्हणून शेतकरी संघटना स्थापन झाली ती शरद जोशींना तशी आवश्यकता वाटली म्हणून; शेतकऱ्यांना संघटनेचे महत्त्व पटले होते म्हणून नव्हेच. शेतकऱ्यांना ना संघटनेची गरज होती ना शेतमालाच्या भावाची. लाखो शेतकरी एकत्र येऊन पहिल्यांदा संघटना स्थापन करण्यात आली आणि त्यांनी नंतर आपला नेता निवडला असे कधी घडले नाही. शरद जोशी परदेशात असताना भारतातल्या शेतकऱ्यांनी त्यांना पत्र लिहून भारतात येऊन संघटना स्थापन करण्याची विनंती केलेली नव्हती की, आदरणीय साहेब, भारतातील आम्हा शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे, तेव्हा तुम्ही तातडीने भारतात या आणि आमच्यासाठी शेतकरी संघटना स्थापन करून या हलाखीच्या स्थितीतून आमची मुक्तता करा. अगदी गावपातळीवरसुद्धा सर्व शेतकऱ्यांनी स्वयंप्रेरणेने एकत्र येऊन बैठक घेतली आणि शेतीच्या मुक्तीसाठी शेतकरी समाजामध्ये एकोपा घडवून आणायचा प्रयत्न केल्याचा इतिहास सांगत नाही; निदान माझी तरी तशी माहिती नाही.

शेतकरी समाजाची स्थिती अत्यंत दयनीय व हलाखीची आहे, यातून काहीतरी मार्ग निघायलाच हवा. त्यासाठी आपले सर्वस्व पणाला लागले तरी चालेल, अशातऱ्हेची मानसिक बैठक असणाऱ्या काही मंडळींना तशी गरज वाटायला लागली आणि त्यातूनच शेतकरी संघटनेचा उदय झाला. शेतकऱ्यांचे लाचारीचे जिणे संपवून त्यांना देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगता यावे याकरिता पक्ष, धर्म, जात वा इतर कोणत्याही भेदाभेदांचा अडथळा न येऊ देता प्रयत्न झाले पाहिजेत, असे ज्यांना-ज्यांना वाटले ते शेतकरी संघटनेचे पाईक झालेत.

शरद जोशींनी मांडलेले विचार आणि भारताच्या आर्थिक स्वातंत्र्याचे अर्थशास्त्र गावागावात जाऊन शेतकऱ्यांना समजावून सांगण्याचे कार्य गेली अनेक वर्षे संघटनेचे पाईक करत आहेत. त्यातून नव्या लढाईची बीजे रोवली जात आहे. शेतकरी समाजात पावलोपावली व्हिलेज-बॅरिस्टर असूनही शेतमालास उत्पादनखर्च भरून

निघेल एवढेसुद्धा भाव मिळत नाही म्हणून शेतीत अठराविश्व दारिद्र्य आहे एवढा साधा उलगडा देखील त्यांना आजवर झालेला नव्हता. शेतकऱ्याच्या घरात जन्माला येणे म्हणजे कर्जात जन्मणे, कर्जात जगणे आणि कर्जात मरणे, हे विधिलिखित असते, यावर शेतकऱ्यांचा ठाम विश्वास होता. त्याला सुखाने व सन्मानाने जगण्याचे स्वप्नही अजून पडलेले नसावे. तसे नसते तर शेतकऱ्याने नक्कीच काही ना काही हालचाल करून उपाय शोधलेच असते. नाकतोंडांच्या वर पाणी आले तर तो आत्महत्या करून मरायला तयार आहे पण रणांगणात उतरून लढायला तयार नाही, यातच सारे काही आले.

एवढ्या विपरीत परिस्थितीत शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची बांधणी केली. शेतकऱ्यांना लढाऊ बाणा शिकवला. शेतीच्या अर्थशास्त्राची शास्त्रशुद्ध पायाभरणी केली. मोठमोठ्या अर्थशास्त्र्यांना झेपणार नाही असे अर्थशास्त्र शेतकर्यांच्या भाषेत शेतकर्यांना समजावून सांगितले. हे काम नक्कीच सोपे आणि सहजसाध्य नव्हते. महात्मा गांधींना स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करून स्वातंत्र्यचळवळ उभारणे सोपे गेले कारण देशाला स्वातंत्र्य मिळाले तर सत्तेची खुर्ची आपल्याच ताब्यात येईल याची खात्री बाळगणाऱ्यार व त्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असणाऱ्या पुढाऱ्यांच्या फळीचा त्यांना भक्कम पाठिंबा लाभला होता. याउलट शरद जोशींचे तत्त्वज्ञान स्वीकारले तर शेतकऱ्याला आर्थिक स्वातंत्र्य मिळून राजकीय सत्ताकेंद्रेच प्रभावहीन होण्याची भीती या राजकीय मंडळींना कायम वाटत आली आहे. शेतकऱ्यांची लाचारी संपून जर तो स्वावलंबी झाला तर राजकारणाचा पायाच ढासळेल म्हणून कोणताही मजबूत राजकीय नेता किंवा पक्ष कधीच शरद जोशींच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिलेला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलित समाजात जागृती घडवून आणणे तुलनेने सोपे गेले कारण दलित समाजाचा सवर्णांकडून झालेला छळवाद याला दलित समाज आधीच कंटाळला होता आणि त्यातूनच त्या समाजात सन्मानाने जगण्याची प्रेरणा जागृत झालेली होती. शिवाय आंबेडकरांनी ज्या समाजासाठी कार्य केले तो समाज त्यांच्याच जातीचा होता. दलित समाज सर्वच जातींमध्ये विखुरलेला नव्हता. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला वर्णसंघर्षाची धार प्राप्त झाली. मात्र शेतकरी चळवळीबाबत असे म्हणता येत नाही. शेतकरी समाज अनेक जाती-धर्मांमध्ये विभागला असल्यामुळे या चळवळीला वर्गसंघर्ष किंवा वर्णसंघर्ष अशी जोडही मिळाली नाही. या अनुषंगाने विचार केला तर या जातिव्यवस्थेमुळे संघटनेला काही फायदा होण्याऐवजी नुकसानच अधिक झाले आहे. जातीच्या आधारावर संघटनेत फूट पाडण्याचे काही राजकीय पक्षांकडून वेळोवेळी जाणीवपूर्वक प्रयत्न

झालेले आहेत. त्या प्रयत्नांना प्रतिसाद देऊन दुसऱ्या व तिसऱ्या फळीतील नेते संघटनेला रामराम ठोकून अन्य पक्षात गेलेलेही आहेत. मात्र वैचारिक मतभेद झाल्याची सबब पुढे करून शरद जोशींना सोडून जाणारे तुरळक अपवाद वगळता बहुतेक सर्व थेट आपापल्या जातीच्या नेत्यांच्या कळपातच का जातात, हेसुद्धा एक न सुटणारे कोडेच ठरले आहे.

या सर्व पार्श्वभूमीचा विचार केला तर शेतकरी समाजासाठी कार्य करणे हे तुलनेने अधिक कठीण काम असले तरी ऐतिहासिक आणि महानकार्य आहे, याची खूणगाठ मनाशी पक्की बांधून घेणे गरजेचे आहे.

■■

# लेखकाचा परिचय



| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | गंगाधर महादेव मुटे |
| **जन्म** | : | २७ फेब्रुवारी १९६२ |
| **शिक्षण** | : | बी.एस्सी (गणित) |
| **व्यवसाय** | : | मुक्त पत्रकार, शेतीविषयक संशोधन, बिजोत्पादन आणि विपणन, कापसाच्या अनेक संकरित वाणांची निर्मिती. |

**प्रकाशित साहित्य**

१) रानमेवा (कवितासंग्रह) नोव्हेंबर २०१०

२) लोकमत, तरुण भारत, सकाळ, लोकसत्ता व अन्य विविध वृत्तपत्रांतून सातत्याने लेखन

३) पुणे, नाशिक व औरंगाबाद येथून प्रकाशित होणाऱ्या शेतकरी संघटनेचे मुखपत्र असलेल्या 'पाक्षिक शेतकरी संघटक'मध्ये 'वाङ्मयशेती' हे नियमित सदर.

**अन्य लेखन**

www.baliraja.com
http://www.ganadharmute.com
http://gangadharmute.wordpress.com
http://www.sharadjoshi.in
या संकेतस्थळांची निर्मिती आणि त्यावर सातत्यपूर्ण लेखन

**पुरस्कार**

१) स्टार माझा या लोकप्रिय मराठी वृत्तवाहिनीतर्फे आयोजित 'ब्लाग माझा' या जागतिक स्पर्धेत http://gangadharmute.wordpress.com या ब्लॉगला नोव्हें. २०१० मध्ये पुरस्कार.

२) मेहता पब्लिशिंग हाऊस व मी मराठी डॉट नेट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरजालीय लेखन स्पर्धेत पारितोषिक

३) मी मराठी डॉट नेट द्वारा आयोजित कविता स्पर्धा २०११ या स्पर्धेत 'कुठे तृप्त झाले फुले-भीम-बापू?' या कवितेला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार.